# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०९/२००६.** **दिनांक १६.०९.२००६**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक १६ सप्टेबर, २००६ रोजी दुपारी २.०० वाजता शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१२०८४-२००६, दिनांक ०६ सप्टेबर, २००६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक १६ सप्टेबर, २००६ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील |
| ०३. | मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग | ०४. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. |
| ०५. | मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव | ०६. | मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे |
| ०७. | मा.श्रीमती रिम्पल लोहिया | ०८. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०९. | मा.श्री रमाकान्त गणेश कर्णिक | १०. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर |
| ११. | मा.डॉ.पी.एल.तिवारी | | |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष, व मा.श्री. कैलास गोविंदराव कोते यांनी दूरध्वनीद्वारे तसेच मा.श्री प्रकाश रामदास काळे,मा.श्री समि खतिब,मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा व मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डये यांनी पत्राव्दारे कळविले आहे.त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१.** **व्यवस्थापन समितीचे दि.१९.०८..२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६७९.** व्यवस्थापन समितीचे दि.१९.०८..२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रति सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**०१. <u>निर्णय क्र.६६३-</u>** श्रीसाईबाबाचे सध्याचे चांदीचे सिंहासनाऐवजी ते सोन्याचे सिंहासन बनवावे असे मत श्रीसाईभक्तांनी व्यक्त केल्याने मा.अध्यक्ष महोदय यांनी भक्तांचे इच्छेचा आदर करुन सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.७.२००६ रोजीचे सभेमध्ये मांडला होता. त्यास मान्यता मिळून सोन्याचे सिंहासन बनविण्यासाठी स्वतंत्र निधी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सुवर्ण सिंहासनासाठी नामांकित डिझाईनर/सुवर्णकार /चित्रकार यांचकडून संकल्पना मागविण्यात येऊन, त्यांना व्यवस्थापन समितीचे दि.१९.८.२००६ चे सभेत आमंत्रित करण्यात आले होते.

सदर योजनेस साईभक्तांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळून रुपये ९२,७७,६६३/- इतका निधी जमा झालेला आहे. तथापि याबाबत विविध टी.व्ही.चॅनेल व वृत्तपत्रामध्ये उलट-सुलट मते व्यक्त करण्यात आल्याने सदरचा मुद्दा वादाचा होऊ नये म्हणून सुवर्ण सिंहासन बनविणेबाबत झालेला निर्णय रद्द करण्यात यावा. तसेच व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.८.२००६ चे सभेतील निर्णय क्र. ६३५ अन्वये संस्थानकडे उपलब्ध असलेले शुध्द व इतर सोने सुवर्ण सिंहासनासाठी राखून ठेवावे असे ठरले होते. सुवर्ण सिहासन बनविणेबाबतचा निर्णय रद्द झाल्याने उपरोक्त शिल्लक शुध्द सोन्यापासुन प्रचलित पध्दतीनुसार श्रीसाईभक्तांन लॉकेटस् व नाणी उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करावी.

तथापि याकामी खालीलप्रमाणे रक्कम जमा झालेली आहे.

| अ.नं | सुवर्ण सिंहासन निधी | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | रोख रक्कम रुपये | ५२४७९३६ |
| ०२ | चेकव्दारे रुपये | ३६७५७७५ |
| ०३ | डि.डी.व्दारे रुपये | १८११६१ |
| ०४ | परकीय चलनातील चेकव्दारे रक्कम रुपये | १६२४७ |
| ०५ | परकीय चलनातील रोख रक्कम रुपये | १५६५७४ |
| ०६ | १ सप्टेबर २००६ पर्यन्त जमा झालेली रक्कम रुपये | ९२७७६९३ |

| | | |
|---|---|---|
| ०७ | १६ सप्टेबर २००६ पर्यन्त जमा झालेली रक्कम रुपये | ९५४११९४ |

वरील सर्व रक्कम आहे तशीच ठेवण्यात यावी. तसेच उपरोक्त सर्व रक्कम रुपये ९५,४१,१९४.०० व त्या रकमेत बचत खात्यातील रकमेची भर घालून एकत्रित रक्कम रुपये १ कोटीची "सुवर्ण सिंहासन निधी योजना" या नावाने मुदतठेव पावती बनविण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी/आय.टी. विभाग प्रमुख/अधिक्षक, मंदिर विभाग/मुख्य लेखाधिकारी)

**०२. निर्णय क्र.६६६ अन्वये -**श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील नेत्रविभागाचे शुभारंभनिमित्त मोफत नेत्र चिकित्सा व शस्त्रक्रिया शिबीर दि.१८.८.२००६ ते दि.२०.८.२००६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले होते. या शिबीरामध्ये मोतीबिंदू, डायबेटीक रेटेनोपथी, रेटायनल डिचेंटमेंट, तिरळेपणा इ.आजांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्याचे अवाहन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये मोठ्या प्रमाणात रुग्णांची नाव नोंदणी झालेली आहे. परंतू तीन दिवसांचा कालावधी कमी असल्याने सर्वच रुग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया झालेली नसल्याने या शिबीरात नाव नोंदविलेल्या सर्वच रुग्णाचे मोफत उपचार व शस्त्रक्रिया ऑक्टोबर,२००६ अखेर पूर्ण करण्यात याव्यात, असें ठरलें.

तसेच कर्णबधिर रुग्णांसाठी संस्थानमार्फत श्रवणयंत्रेही माफक दरात उपलब्ध करुन द्यावीत, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**०३. निर्णय क्र.६७४ मध्ये -**

"देशातील सर्व देवस्थानांचे टेंम्पलमिंट सिध्दी विनायक ट्रस्ट, मुंबई यांचे वतीने गेल्या वर्षी मुंबईमध्ये आयोजित करण्यात आलेले होते. त्याच धर्तीवर संस्थानचे वतीने सर्व देवस्थानांचे टेम्पलमीट येत्या डिसेंबर,२००६ मध्ये शिर्डी येथे भरविण्यात यावे. तसेच सर्व साईभक्तांचे भव्य संमेलन शिवाजीपार्क दादर येथे भरविण्यात यावे."

**या ऐवजी,**

देशातील सर्व देवस्थानांचे टेंम्पलमिंट सिध्दी विनायक ट्रस्ट, मुंबई यांचे वतीने गेल्या वर्षी मुंबईमध्ये आयोजित करण्यात आलेले होते. त्याच धर्तीवर संस्थानचे वतीने सर्व देवस्थानांचे टेम्पलमीट येत्या फेब्रुवारी-मार्च,२००७ मध्ये शिर्डी येथे भरविण्यात यावे. तसेच सर्व साईभक्तांचे भव्य संमेलन शिवाजीपार्क दादर व श्री शैलेश श्रीहरी कुटे, विश्वस्त यांचे पत्रानुसार नाशिक येथे भरविण्यात यावे. त्यासाठी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच विश्वस्त मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे यांचे दिनांक १७.८.२००६ रोजी प्राप्त झालेल्या पत्रान्वये मागविलेली माहिती त्यांना समक्ष दिल्याने त्यांनी त्यांचे सदरचे पत्र मागे घेतले त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-सर्व प्रशासकीय अधिकारी/मंदिर विभागप्रमुख/आय.टी.विभागप्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२.** **व्यवस्थापन समितीचे दि.२६.०८.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.६८०.** व्यवस्थापन समितीचे दि.२६.०८.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१. पुरग्रस्तांसाठी सोलापूरी चादरी खरेदी..दरपत्रके उघडून निर्णय घेणे.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.८.२००६ चे सभेमध्ये संस्थानमार्फत पुरग्रस्तांसाठी सोलापूरी चादरी खरेदी करुन त्या तातडीने वाटप करावयाच्या आहेत अशी चर्चा व निर्णय झालेला आहे. त्यानुसार तूर्त ५० हजार चादरी खरेदी करावयाच्या झाल्यास त्यासाठी प्रती चादरीस रुपये १२५/- प्रमाणे ६२,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. मा.उपसमितीचे सदस्यांनी चादरी खरेदीबाबत त्वरीत कार्यवाही करावी असे दि.१९.०८.२००६ चे मा.व्यवस्थान समितीचे सभेत ठरलेले आहे. त्यानुसार दिनांक २०.८.२००६ रोजी मा.उपसमिती सदस्य मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी शिर्डी येथे त्वरीत कार्यवाहीच्या दृष्टीने समन्वयाची चर्चा केलेली आहे. सदरील खरेदी ही तातडीची असल्याने निविदा विक्रीस न ठेवता निविदासादकर्त्याकडून त्यांचेच लेटरहेडवर दरपत्रके मागविण्यात यावीत व मा.उपसमिती समोर दरपत्रके उघडण्यात यावीत. तसेच नमूने पाहून नमुने सिलेक्ट करुन खरेदीची शिफारस करण्यात यावी असे ठरलें.

त्यानुसार दिनांक २३.८.२००६ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्धीस देऊन, मालाचा नमुना, आवश्यक ती कागदपत्रे तसेच एक टक्का बयाणा रक्कम व सिलबंद दरपत्रकांसह दिनांक २६.८.२००६ रोजी दुपारी १.०० वाजता संस्थानचे शिर्डी कार्यालयात हजर रहाणेबाबत पुरवठादारांना कळविलेले आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे दरपत्रके व पुरवठादार आजचे सभेत समक्ष उपस्थित होते. त्यांचेशी चर्चा/वाटाघाटी करण्यात येऊन त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | पुरवठादाराचे नाव | ब्रॅण्ड | अंदाजे वजन | निविदेतील दर (प्रती नग रुपये ) | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केले दर |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | (प्रती नग रुपये ) |
| ०१. | मे.हिरामाणिक टेक्सटाईल्स,सोलापूर | --- | ७५० ते ७८० ग्रॅम | ११८.०० | अनुपस्थित |
| ०२. | मे.संगम क्लॉथ, संगमनेर | राजेश<br>राजेश | ८३० ते ८५० ग्रॅम<br>७८० ते ७०० ग्रॅम | ९२.००<br>८२ | ९०.००<br>८०.०० |
| ०३. | मे.सुनिलकुमार गांधी आणि कंपनी सोलापूर | किरण | ७५० ग्रॅम | ११०.०० | गैरहजर |
| ०४. | मे.सारडा इंटेरियर ,अहमदनगर | चाटला<br>देशप्रेमी | ७८० ते ८०० ग्रॅम<br>७८० ते ८०० ग्रॅम | १०२.००<br>९९.०० | ९५.००<br>९५.०० |
| ०५. | मे.शिंगी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | हर्ष<br>हर्ष | ७०० ते ७७० ग्रॅम<br>७७० ते ८१० ग्रॅम | ८८.००<br>९२.०० | ८८.००<br>९२.०० |
| ०६. | मे.बुर्गुल टेक्सटाईल्स,सोलापूर | डिलक्स | ८०० ग्रॅम | ९०.०० | ९०.०० |
| ०७. | मे.ओम गुरुदेव एजन्सी सावळीविहीर | गोल्डकिंग<br>डिलक्स | ८०० ते ८२० ग्रॅम<br>८०० ते ८५० ग्रॅम | ९२.००<br>९४.०० | ८८.००<br>९२.०० |
| ०८. | मे.पंजाब सिलेक्शन, कोपरगाव | जेकॉर्ड<br>सपोटा | ८०० ग्रॅम<br>७५० ग्रॅम | ८१.५०<br>७१.५० | ८१.००<br>७१.५० |
| ०९. | मे.सुयोग फॅब्रीकेशन ॲण्ड इंजिनिअरींग वर्क्स,राहाता | क्षिरसागर | --- | १३५.०० | १२५.०० |
| १०. | मे.ठकराल क्लॉथ सेंटर कोपरगाव | जेकॉर्डे<br>सपोटा | ८०० ग्रॅम<br>७५० ग्रॅम | ८१.५०<br>७१.५० | ८१.५०<br>७१.५० |
| ११. | नरेंद्र एंटरप्राईजेस, संगमनेर | राठी | ८३० ते ८६० ग्रॅम<br>७८० ते ८०० ग्रॅम | ९२.००<br>८३.०० | ८९.००<br>८०.०० |
| १२. | मे.कृष्णा कलेक्शन्स, श्रीरामपूर | सॅम्पल नाही<br>क्युंबरा | ८०० ग्रॅम<br>९०० ग्रॅम | ९०.००<br>१००.०० | ८८.००<br>९८.०० |
| १३. | मे.बन्सी कलेक्शन्स, श्रीरामपूर | --<br>-- | ८०० ग्रॅम<br>९०० ग्रॅम | ९१.००<br>९८.०० | ९०.००<br>९६.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तक्त्यातील अ.नं.०५ चे पुरवठादार मे.शिंगी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर व अ.नं.७ चे पुरवठादार मे.ओम गुरुदेव एजन्सी सावळीविहीर यांनी सादर केलेल्या चादरींचा नमूना चांगला असल्याने त्यांचे दर स्वीकारणेत येऊन, मे.शिंगी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर यांचेकडून दोन्ही दरांच्या प्रत्येकी १० हजार नग (एकूण २० हजार नग) व मे.ओम गुरुदेव एजन्सी सावळीविहीर यांचेकडून दोन्ही दरांच्या प्रत्येकी १५ हजार (एकूण ३० हजार नग) अशी एकूण ५० हजार नग चादरी खरेदीकामी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**०२. पुरग्रस्त रुग्णांचे उपचारासाठी औषधे खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

सध्या अहमदनगर जिल्ह्यात सर्वत्र जोरदार पाऊस चालू आहे. सदरच्या पावसामुळे जिल्ह्यातील जवळजवळ सर्व नद्यांना पुर चालू आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकांना सध्या सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलेले आहे. तसेच सतत चालू असलेल्या पावसामुळे सर्वत्र ठिकाणी दलदलीची परिस्थीती निर्माण झाली आहे. त्यामुळे साथीच्या रोगाचे आजार पसरण्याची दाट शक्यता आहे. अशा साथीच्या आजारामध्ये लोकांना जुलाब , उलटी, ताप , मळमळ, थंडी अशा प्रकारचे आजार होऊ शकतात. शिर्डी परिसरातील बहुतेक लोक हे संस्थानचे रुग्णालयात उपचारासाठी हजर झाल्यावर त्यांचे उपचारासाठी आपल्याकडे खालील प्रकारची औषधे उपलब्ध असणे गरजेचे आहे. त्यासाठी अंदाजे रु. ८,८०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No. | Name of Medicine | Qty. | Rate per Approx | Total Amt. in Rs |
|---|---|---|---|---|
| 1 | Metronidazle 100 ml | 10000 | 9.00 | 90000.00 |
| 2 | I/V. Ringer Lacted 500ml | 5000 | 22.00 | 110000.00 |
| 3 | I/V. D.N.S. 500ml | 5000 | 14.00 | 70000.00 |
| 4 | Inj.Taxim 1gm | 10000 | 22.00 | 220000.00 |
| 5 | Inj.Perinorm Amp. | 10000 | 2.00 | 20000.00 |
| 6 | Inj.Ranitidine Amp. | 5000 | 3.00 | 15000.00 |
| 7 | Inj.Ceftrixome 1gm | 10000 | 22.00 | 220000.00 |
| 8 | Tab.Taxim o 200mg | 10000 | 10.00 | 100000.00 |
| 9 | Tab.Lomotil | 10000 | 0.50 | 5000.00 |
| 10 | Tab.Norflox TZ | 10000 | 3.00 | 30000.00 |
| | | | | 880000.00 |

वरीलप्रमाणे औषधे ही तातडीने खरेदी करावयाची असल्याने त्यासाठी शिर्डी, संगमनेर, कोपरगांव, श्रीरामपुर, अहमदनगर, नाशिक येथील अधिकृत विक्रेते यांचेकडून फॅक्सद्वारे कोटेशन मागवून निम्नतम दराने खरेदी करण्यात आलेली आहेत तरी सदरची औषधे खरेदीस व रु.८,८०,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता

देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,)

**०३. कोपरगाव नगरपालिकेस दिलेल्या औषधांस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत**

कोपरगाव नगरपालिका यांनी नुकत्याच गोदावरी नदीस आलेल्या पुरामुळे उद्‌भवणाऱ्या परीस्थितीमुळे तेथील रुग्णांचे उपचारासाठी खालील औषधांची मागणी केलेली आहे. त्यातील जी औषधे आपणाकडे उपलब्ध आहे ती त्यांना देण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | औषधांचे नाव | मागणी | दिलेली औषधे | दिलेल्या औषधांचे दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Tab. Paracetamol | 25000 | 25000 | 0.1466 | 3665.00 |
| 2 | Tab. Ciplox 250 Mg | 4000 | 4000 | 0.99 | 3960.00 |
| 3 | Syr. Sneeza 60 ml 200 Mg | 500 | 288 | 10.00 | 2880.00 |
| 4 | Tab. Metronidazole | 10000 | 10000 | 0.16 | 1600.00 |
| 5 | Tab. Antacid | 10000 | 7000 | 0.098 | 686.00 |
| 6 | Tab. Mexipar | 5000 | 5000 | 0.39 | 1950.00 |
| 7 | Tab. C.P.M. | 10000 | 10000 | 0.03 | 300.00 |
| 8 | Syr. Cephelexin Oral | 120 | 120 | 8.85 | 1062.00 |
| 9 | Syr. Nise | 200 | 200 | 8.20 | 1640.00 |
| | | | | एकुण - | 17743.00 |

उपरोक्तप्रमाणे औषधे संस्थानचे औषध भांडारातून दिलेली आहेत. त्याची किंमत रु. १७,७४३/- इतकी होते.

तरी उपरोक्तप्रमाणे औषधे खर्ची टाकणेस व रु. १७,७४३/-चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०४. ट्रिपल ल्यूमेन कॅथेटर खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात बायपासच्या शस्त्रकिया करणेसाठी उपरोक्त टिपल ल्युमेन कॅथेटरआवश्यकता असते. यापुर्वी सदरच्या कॅथेटर व इतर हत्यांरासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदामधील दरांवर चर्चा / वाटाघाटीनंतर मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०६/२००६ चे सभेत चर्चा होऊन निर्णय कमांक ३४५ नुसार मे. लाईफ केअर डिव्हाईसेस, ठाणे यांना उपरोक्त कॅथेटरची ऑर्डर इकडील पत्र ६०८७ दि. ०८/०५/२००६ अन्वये देण्यात आली होती.

सदरच्या कॅथेटरचा साठा शिल्लक नसून पुन्हा ४० नग खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Description | Qty. | Make | Rate Per | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Arrow Triple Lumen Catheter | 40 | Medex | 1542.80 | 61712.00 |
| | | | | **Total -** | **61712.00** |

तरी वरीलप्रमाणे प्रत्येकी १० नग मे. लाईफ केअर डिव्हाईसेस, ठाणे यांचेकडून मंजुर दराने खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०५. इंजेक्शन आयोमेरॉन खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पीटलचे सी.टी.स्कॅन विभागात सी.टी.स्कॅन करणेसाठी उपरोक्त इंजेक्शनची आवश्यकता असते. सदरचे इंजेक्शन ही यापुर्वी आपण विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन व मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.१२.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७७ अन्वये मे.युनिव्हर्सल ट्रेडर्स,पुणे यांचेकडून रु.४,१५२०७/- ची खरेदी करण्यात आली होती. सदरचे इंजेक्शनचा साठा सध्या संपलेला असून पुन्हा त्याच मंजुर दराने प्रत्येकी ५० इंजेक्शन खरेदीचा प्रस्ताव आहे.

| Sr.No. | Name of Injection | Qty | Rate per | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| १ | Iomeron ३५० mg १००ml | ५० | १३८३.०२ | ६९१५१.०० |
| २ | Iomeron ४०० mg १००ml | ५० | १५०५.४० | ७५२७०.०० |
| | | | **Total Rs.-** | **१४४४२१.००** |

तरी उपरोक्त प्रमाणे इंजेक्शन मे.युनिव्हर्सल ट्रेडर्स ,पुणे यांचेकडून पूर्वीचे मान्य दराने प्रत्येकी ५० व्हायल खरेदी करणेस व याकामी येणारा खर्च रु.१,४४,४२१.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०६. लेड अॅप्रॉन खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयाच्या क्ष-किरण विभागासाठी मे. युनीव्हर्सल ट्रेडर्स, पुणे व मे. अनिता मेडीकल, मुंबई यांचेकडून मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०६/२००६ चे सभेतील निर्णय क्र. ३४० अन्वये दोघांचेही दर सारखेच असल्याने त्यांना इकडील पत्र क. ६४९५ व ६४९४ दि. २०/०५/२००६ अन्वये प्रत्येकी ३ नग याप्रमाणे ६ नग लेड अॅप्रनचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. सदरच्या पुरवठा धारकांनी लेड अॅप्रनचा पुरवठा केला आहे ते कॅथलॅब व क्ष-किरण विभागास वापरण्यास दिले आहे.

सदरच्या लेड अॅप्रनसाठी डि.पी. क्र. ८१६६ दि. ०७/०८/२००६ अन्वये आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने ६ नगांची मागणी केली आहे.

त्यानुसार मागील मंजुर दराने दोन्ही पुरवठा धारकांकडून प्रत्येकी ३ याप्रमाणे अजून ६ नग खरेदी करता येईल ते खालीलप्रमाणे-

| अ.नं. | वर्णन | संख्या | दर प्रती नग | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | लेड अॅप्रन (किरण कं) | ६ | ७५३५.८४ | ४५२१५.०४ |
| | | | **एकुण-** | **४५२१५.०४** |

तरी वरीलप्रमाणे ६ नग लेड अॅप्रन मे. युनीव्हर्सल ट्रेडर्स, पुणे व मे. अनिता मेडीकल, मुंबई यांचेकडून मंजुर दराने खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु. ४५,२१५.०४ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०७. नेबुलायझर व एक्स-रे व्ह्यू बॉक्स खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयाचे विविध वॉर्डमध्ये व वैद्यकिय अधिकारी यांच्या कक्षेत क्ष-किरण व्ह्यू बॉक्स, नेबुलायझर व वजनकाटा इत्यादींची आवश्यकता असते. याकामी एकुण १० अधिकृत विकेते यांचेकडून बंद पाकीटात कोटेशन मागविण्यात आले होते ते खालीलप्रमाणे-

| अ.नं | कोटेशन्सादरकर्त्यांचे नांव | अ.नं | कोटेशन्सादरकर्त्यांचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मे. लाईफ लाईन सर्जीकल, कोपरगाव | ०२ | मे. कुंदन सर्जीकल, अहमदनगर |
| ०३ | मे. युनीव्हर्सल मेडेक्स, पुणे | ०४ | मे. सास एंटरप्रायजेस, पुणे |
| ०५ | मे. डीजीटेक सर्व्हीसेस, पुणे | ०६ | मे. पॅनासिया बायोमेडीकल्स, पुणे |
| ०७ | मे. पुर्नीमा सर्जीकल, नाशिक | ०८ | मे. सुप्रीया सर्जीकल, नाशिक |
| ०९ | मे. वॉर्डन सर्जीकल, मुंबई | १० | मे. एम.आर.के. हेल्थकेअर, मुंबई |

उपरोक्त पैकी अ.नं. ९ यांचे कोटेशन हे प्रशासन शाखेमार्फत उघडून मिळाले आहेत. तर उर्वरीत कोटेशन मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडण्यात आलेली आहेत. सदर कोटेशनचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Name of Item → <br> Name of Supplier | Nebuliser 8 Nos | Baby Weighing Machin 04 Nos | X-Ray View Box 1 Film | X-Ray View Box 2 Film | X-Ray View Box 4 Film | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01. | Lifi Line, Kopargaon | Omran 2075.00 MRK 1265.00 | Deterco 928.00 | N.Q. | N.Q. | N.Q. | |
| 02. | Kundan, A'Nagar | **Nuneb-pro 1100.00** | Kohinoor 600.00 | N.Q. | N.Q. | N.Q. | |
| 03. | Universal, Pune | 4275.00 | 9450.00 | 3262.50 | 4050.00 | 6525.00 | |
| 04. | Sass, Pune | 4162.00 | 9562.50 | 2700.00 | 3206.25 | 5400.00 | |
| 05. | Digitech, Pune | 3100.00 | 7150.00 | 2264.00 | 2613.00 | 4225.00 | |
| 06. | Panacea,Pune | 4050.00 | 9787.50 | 2925.00 | 3600.00 | 5850.00 | |
| 07. | Purnima Nashik | 1450.00 | Detecto 850.00 | **1375.00** | 1870.00 | **3375.00** | |
| 08. | Supriya,Nashik | Nulife,MRK 1181.25 | Crown **573.75** | N.Q. | N.Q. | N.Q. | |
| 09. | Warden,Mumbai | Nulife,Piston 1181.25 | Detecto 1063.25 | 1406.25 | **1800.00** | | Grand Total |
| 10. | M.R.K. | 1300.00 | -- | -- | -- | -- | |
| | Total | 8800.00 | 2295.00 | 11000.00 | 27000.00 | 50625.00 | 99720/- |

उपरोक्त तक्त्यातील शिफारसीनुसार निम्नतम दराने साहित्य खरेदीस व याकामी येणारे रक्कम रु. ९९,७२०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०८. ऑप्थॅलमिक उपकरणांसाठी CVT आणि स्टॅबिलायझर खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील ऑप्थॅलमिक विभागात डोळयांचे ऑपरेशन करणेकामी खरेदी करण्यात आलेले इन्स्ट्रुमेंटसाठी सी.व्ही.टी.(कॉन्स्टंट व्होल्टेज ट्रान्सफॉर्मर) व स्टॅबिलायझरची आवश्यकता आहे असे बॉम्बे हॉस्पिटलचे डॉ.नागेंद्र शाह यांनी तसेच मे.कार्ल झैस (इं) प्रा.लि.,मुंबई या कंपनीचे इंजिनिअर आणि संस्थानचे बायोमेडिकल इंजिनिअरींग विभागाने कळविले आहे. सदर इन्स्ट्रुमेंट/मशिनरीसाठी सी.व्ही.टी. (1 KVA) ४ नग व स्टॅबिलायझर (4 KVA) १ नगाची आवश्यकता आहे. सदरचे सी.व्ही.टी आणि स्टबिलायझर न जोडता ऑप्थॅल्मीक विभागातील इन्स्ट्रुमेंट/मशिनरी वापरल्यास सदर मशिनला हानी पोहोचू शकते. त्यामुळे सदरचे इन्स्ट्रुमेट/मशिनरी वापरता येत नाही. त्यासाठी तातडीने सदर इन्स्ट्रुमेंटच्या आवश्यकतेप्रमाणे लागणारे सी.व्ही.टी. आणि स्टॅबिलायझरसाठी एकूण ०४ कोटेशन मागवून दिनांक ५.८.२००६चे मंजूरीनुसार दिनांक १५.८.२००६ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडून घेण्यात आले आहेत.

सदर कोटेशनमध्ये दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कंपनी | प्रकार | दर प्रती नग | मागणी | एकूण किंमत रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मे.भवानी डिजीटल प्रा.लि.,मुंबई | १ के.व्ही.ए. | ८,१५६.२५ | ०४ | ३२,६२५.०० |
| | | ४ के.व्ही.ए. | १०,१२५.०० | ०१ | १०,१२५.०० |
| | | | | **एकूण-** | **४२,७५०.००** |
| ०२. | युनिव्हर्सल कॉम्प्युटर्स, अहमदनगर | १ के.व्ही.ए. | १२,२००.०० | ०४ | ४८,८००.०० |
| | | ४ के.व्ही.ए. | १४,३५०.०० | ०१ | १४,३५०.०० |
| | | | | **एकूण-** | **६३,१५०.००** |
| ०३. | जयश्री एंटरप्रायझेस, अहमदनगर | १ के.व्ही.ए. | १०,९५०.०० | ०४ | ४३,८००.० |
| | | ४ के.व्ही.ए. | १२,५००.०० | ०१ | १२,५००.०० |
| | | | | **एकूण-** | **५६,३००.००** |
| ०४. | सॅम कॉम्प्युटर्स, अहमदनगर | १ के.व्ही.ए. | १४,०६२.०० | ०४ | ५६,२५०.०० |
| | | ४ के.व्ही.ए. | १४,३४३.७५ | ०१ | १४,३४३.७५ |
| | | | | **एकूण-** | **७०,५९३.७५** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.०१ चे मे.भवानी डिजीटल प्रा.लि.,मुंबई यांचे दर निम्नतम असून, त्यांचेकडून सी.व्ही.टी. ०४ नग आणि स्टॅबिलायझर ०१ नग खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ४२,७५०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेबाबतची शिफारस करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०९ श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे आणखी नविन ७ जादा डॉक्टर्स देणेबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयात असणाऱ्या सुविधा व रुग्णांची संख्या विचारात घेता येणाऱ्या अडचणी करिता आणखी ७ डॉक्टरांची (R.M.O.) मागणी वैद्यकीय अधिक्षीका यांनी केली, त्यास मान्यता देण्यात येऊन याबाबत वैद्यकीय अधिक्षीका यांनी सविस्तर प्रस्ताव तयार करुन व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**१०. श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे सब स्टोअर सुरु करणेबाबत.**

वैद्यकीय अधिक्षीका,श्रीसाईनाथ रुग्णालय यांनी सभेस असे सांगितले की, दोन्ही रुग्णालयाचे एकत्र मध्यवर्ती औषध भांडार श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये आहे. श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधुन औषधे पोहोच करणे, तातडीचे उपचारासाठी औषधे मिळणे वा खरेदी करणेस त्यामुळे विलंब होतो, परिणामी रुग्णांचे उपचारांची गैरसोय होते. त्यामुळे श्रीसाईनाथ रुग्णालयात उप-भांडार विभाग सुरु करावा जेणेकरुन रुग्ण व रुग्णालयाची गैरसोय दूर होईल.

यावर सांगोपांग चर्चा होऊन श्रीसाईनाथ रुग्णालयात उप-भांडार चालु करणेस मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**११ अपघातग्रस्त पेशेंट दोन्ही रुग्णालयाकडे वेगवेगळे भरती करणेबाबत.**

सध्या श्रीसाईनाथ रुग्णलयाकडील अपघात विभाग बंद करुन तो फक्त श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये सुरु करण्यात आलेला आहे. त्यामुळे बरेचदा रुग्णांची गैरसोय होते. पैशाअभावी गरीब रुग्णावर इलाज होणेस अडचण निर्माण होते, असे सभेस सांगणेत आले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णांचे तातडीचे उपचारांची गैरसोय होऊ नये म्हणून सदरचा विभाग दोन्ही रुग्णालयात पूर्वीप्रमाणेच चालु ठेवण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**विषय नं.०३. नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता ऑगस्ट,२००६.**

**(ब) माहे ऑगस्ट, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे ऑगस्ट,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे ऑगस्ट,२००६ मध्ये श्री साईबाबांनी अर्पण झालेली वस्त्र व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.६८१.** (A) माहे ऑगस्ट, २००६ मधील जमा रुपये १२,९६,६१,४४१.४४ जमा-खर्चाचे तक्ते, माहे ऑगस्ट, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्च रुपये २,५३,३६६.०० चे खर्चाचे तक्ते माहे ६ सप्टेबर,२००६ अखेरीस रुपये २४३७२३८३८७.२० गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे ऑगस्ट,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या एकूण रुपये ३,३१,९०,६९८.०० देणगीचा तक्ता, माहे ऑगस्ट,२००६ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये १,२७,१२४.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. माहे ऑगस्ट, २००६ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र.६८१.** **(B).** माहे ऑगस्ट,२००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान रुपये ९०,३५,७९०.०० चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०३. रुग्णालयातील रुग्णांना माहे ऑगस्ट, २००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.६८१.** **(C).** माहे ऑगस्ट,२००६ मध्ये रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या रुपये ८१,४९२/-सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०४. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे ऑगस्ट,२००६ देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीबाबत.**

**निर्णय क्र.६८१.** **(D).** माहे ऑगस्ट,२००६ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या रुपये ४२४७६०/- सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०५. माहे ऑगस्ट,२००६ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.६८१.** **(E).**माहे ऑगस्ट, २००६मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४०६७३/-कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.६८१.** **(F)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता ज्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

तसेच तक्ता "ब" मध्ये नमूद केलेली खालील अंतिम बीले अदा करणेसाठी मंजूरी देणेत आली.

०१. संस्थान स.नं.१०७मधील संरक्षण भिंत बांधकाम करणे.

०२. नविन मिटींग हॉलमध्ये फर्निचर तयार करणे.

०३. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये काऊंटर टेबल व मेडिकल स्टोअर रॅक तयार करणे

०४. श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे नविन इमारतीमध्ये वाढीव बांधकाम करणे- याकामासाठी दि.१३.५.२००६ अखेरपर्यंतच्या मुदतवाढीस तसेच झालेल्या वाढीव खर्चासह अंतिम बील रक्कम रुपये १,१८,१५,६३४/- मात्र अदा करणेसाठी मंजूरी देण्यात आली.

**०७. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र.६८१.** **(G).** माहे ऑगस्ट, २००६ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४. दक्षिणा पेटीतील लूज नोटा मोजणेकामी लुज नोट काऊंटींग मशिन खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.६८२.** दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीकामी सध्या सहा लुज नोट काऊंटींग ( पैकी ३ दिर्घकाळ वापरल्यामुळे निर्लेखनाचे स्थितीत ) दोन बंडल नोट काऊंटींग मशिन, व सुटी नाण्यांची सॉर्टींग करण्यासाठी मॅच-५ व ६ हे दोन मशिन अशा यंत्रसामुग्रीचा वापर केला जातो. या सर्व मशिन्स डे-ला-रु, इंग्लड या उत्पादक कंपनीच्या असुन, मे.कोरस ( इंडिया ) लि. या अधिकृत वितरकाव्दारे खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त उल्लेखीत ६ लुज नोट काऊंटीग मशिन पैकी ४ मशिन या डे-ला-रु इंग्लड या उत्पादक कंपनीचे वितरक मे.कोरस ( इंडिया ) यांचेकडून सन २००० मध्ये खरेदी केलेल्या आहेत.

दिवसेंदिवस दक्षिणापेटीतीत रक्कम वाढत असल्याने व सध्या वापरात असलेल्या या मशिनवर मोजल्या जाणा-या नोटांच्या संख्येत वाढ होत असल्याने या मशिन नेहमी दुरुस्त करुन घ्याव्या लागत आहे. या मशिन खरेदी करण्यात आल्या त्यावेळी दक्षिणापेटीतून प्राप्त होणा-या नोटांचे प्रमाण हे सरासरी रक्कम रु. ३० ते ३५ लाख इतके होते परंतु सध्या नोटांचे प्रमाण वाढत असुन सरासरी रक्कम रु.७५ ते ८० लाख रुपयांच्या नोटा याच मशिनवर मोजल्या जातात. या मशिनवर मोजल्या जाणा-या नोटांचे प्रमाण खुपच वाढल्याने तसेच या मशिनचा वापरही सुमारे ६ वर्ष करण्यात आल्याने मशिनची कार्यक्षमता कमी झालेली असुन त्यामध्ये वेळोवेळी दुरुस्ती करावी लागत आहे. काही वेळेला यातील दोन किंवा तीन मशिन बंद अवस्थेत असतात अशावेळी एक किंवा दोन मशिनवर संपूर्ण नोटा मोजणे अशक्य होत आहे. त्यामुळे सध्यातरी २ लुज नोट काऊंटींग मशिन खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे.

सध्या बाजारात डे-ला-रु, इंग्लड या उत्पादक कंपनीच्या मशिनचा वापर मोठया प्रमाणात केला जात आहे.बहुतांशी मोठ-मोठया बँकांकडे या मशिन वापरल्या जातात. या कंपनीच्या मशिनची गुणवत्ता चांगल्याप्रकारची असुन नोटा मोजण्याची गती व अचुकता यामुळे या मशिनने संपूर्ण बाजारात नांव लौकीकता मिळविलेली आहे. याच कारणामुळे संस्थानने या मशिनचे पुणे येथील वितरक मे.कोरस ( इं) लि.पुणे यांचेकडून पूर्वीच्या मशिन खरेदी केलेल्या आहेत. तसेच सदर कपंनीबरोबर दि.१.४.२००६ ते ३१.०३.२००७ पर्यंत वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार करण्यात आलेला असल्याने प्रत्येक दक्षिणा पेटी मोजणीचे वेळी त्यांचा प्रतिनीधी मशिनची दुरुस्ती व देखभालीसाठी दक्षिणापेटी मोजणीचे वेळी हजर असतो. आता नव्याने खरेदी करण्यात येणा-या मशिनही याच कंपनीकडून खरेदी केल्यास यापुढेही त्यांचेकडून संस्थानला वेळोवेळी चांगल्या प्रकारच्या सेवा मिळतील.

डे-ला-रु या उत्पादक कंपनीचे मे. कोरस ( इं ) हे वितरक असल्याने मशिन खरेदीसाठी त्यांचेकडे चौकशी केली असता, सध्या बाजारात डी-ला-रु या कंपनीचे ८६७२ हे नवीन लुज नोट काऊंटींग मशिन उपलब्ध असुन, या मशिनची नोटा मोजण्याची गती ही पूर्वीच्या मशिनपेक्षा जास्त असुन मिनीटाला १७०० नोटा हे मशिन मोजु शकते. या एका मशिनसाठी रक्कम रु.२,५०,०००/-(सर्व करासहीत ) इतकी रक्कम त्यांनी कळविलेली आहे. तसेच पुर्वीच्या जुन्या झालेल्या डे-ला-रु, इंग्लड या कंपनीच्या मशिन मे.कोरस (इं) लि. पुणे हे संस्थानकडून प्रती मशिन रक्कम रु.५०००/- या दराने घेण्यास तयार आहेत. तरी नविन डे-ला-रु मॉडेल-८६७२ या मशिन खरेदीसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांचे दि.२.९.२००६ चे मंजुरीन्वये कंपन्यांकडे कोटेशन मागविण्यात आलेले आहेत. तरी सदरचे कोटेशन मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडण्यात येऊन निर्णय घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीकामी लुज नोट काऊंटींग मशिन खरेदीकामी उपसमितीचे सभेत निविदा उघडून पुढील निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०५. व्यवस्थापन निधीमधून सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात झालेल्या खर्चास मान्यता मिळणेकामी शासनास प्रस्ताव सादर करणे बाबत.**

**निर्णय क्र.६८३. (अ)**श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ मधील तरतुदीप्रमाणे दिनांक २३ ऑगस्ट,२००४ चे अधिसुचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन शासननियुक्त मा.व्यवस्थापन समितीने करणेस सुरुवात केलेली आहे.

या अधिनियमातील "व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग" या संबंधीत कलम २२ मधील तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

१. व्यवस्थापन निधी नावाचा एक स्वतंत्र निधी घटित करण्यात येईल व तो समितीकडे निहित असेल व समितीच्या नियंत्रणाखाली असेल.

२. व्यवस्थापन निधीत शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन, विश्वस्त व्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम,राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी, निर्देश देता येईल.

३. व्यवस्थापन निधीचा, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, पुढील प्रयोजनांसाठी उपयोग करण्यात येईल -

(क) समितीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांना मानधन, फी व भत्ते देणे,

(ख) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे,

(ग) या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कर्तव्ये व कामे पार पाडताना, समितीने किंवा कोणत्याही सदस्याने किंवा अधिका-याने किंवा कर्मचा-याने कायदेशीररीत्या केलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम देणे.

उपरोक्त अधिनियमातील कलम २२ (२) मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम व्यवस्थापन निधीत वर्ग करणेबाबत तरतूद करणेत आलेली आहे. मागील तीन आर्थिक वर्षांचे स्थूल वार्षिक उत्पन्न, उपरोक्त नमूद प्रयोजनांच्या बाबींवर झालेला खर्च व त्याचे स्थूल उत्पन्नाशी प्रमाण आदि गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.नं. | आर्थिक वर्ष | लगतपूर्व वर्षातील स्थूल उत्पन्न | प्रयोजनाच्या बाबींवरील एकूण खर्च व स्थूल उत्पन्नाशी त्याचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| ०१. | २००१-२००२ | रु. ५३,७८,७१,७४८/- | रु. १२,९५,३३,९७८/- | २४.०८ टक्के |
| ०२. | २००२-२००३ | रु. ६१,३६,५१,७२३/- | रु. १३,३१,२९,६२३/- | २१.६९ टक्के |
| ०३. | २००३-२००४ | रु. ६१,३५,६५,४२३/- | रु. १४,६८,७३,८६८/- | २३.९४ टक्के |
| ०४. | २००४-२००५ | रु. ६८,७७,५८,७४१/- | रु. १६,३३,५७,५०७/- | २३.७५ टक्के |

उपरोक्त तपशील विचारात घेता, प्रयोजित बाबींवरील, खर्चांच्या पूर्ततेसाठी व्यवस्थापन निधीत वर्ग करावयाची रक्कम, लगतच्या वर्षाच्या स्थूल उत्पन्नाच्या १० टक्केऐवजी २५ टक्के इतका वाढविल्यास, हा व्यवस्थापन निधी समिती सदस्यांचे मानधन व भत्ते, कर्मचारी वेतन व भत्ते, कंत्राटी स्वरुपातील कुशल-अकुशल व सुरक्षा कर्मचारी आदि बाबींवरील वार्षिक खर्चविषयक बाबींसाठी पुरेसा होईल. यादृष्टीने अधिनियमातील कलम २२ (२) यातरतुदीत सुधारणा करणेसाठी संदर्भ क्रमांक ०३ चा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भ क्रमांक ०५ च्या प्रस्तावानुसार विश्वस्तव्यवस्था निधीतून सन २००४-०५ या आर्थिक वर्षासाठी प्रयोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी त्यांचे अहवालात प्रमाणित केल्यानूसार एकूण रुपये १६,३३,५७,५०७/- एवढी रक्कम व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल करण्यात आलेला आहे. उपरोक्त दोन्ही प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहेत.

**(ब)** सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण अद्याप होणे बाकी आहे. सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी, मागील आर्थिक वर्ष सन २००४-०५ चे एकूण वार्षिक स्थूल उत्पन्न रुपये ७८,९७,९७,६५९/- च्या दहा टक्के म्हणजेच रुपये ७,८९,७९,७६५/- मात्र इतकी रक्कम व्यवस्थापन निधीकडे वर्ग करता येईल. परंतु अधिनियमातील कलम २२ (२) मधील तरतुदींनुसार उपरोक्त १० टक्के रक्कम ही व्यवस्थापन निधीतुन करावयाच्या खर्चाच्या विहीत बाबींसाठी अत्यंत अपुरी आहे. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात, व्यवस्थापन निधीतुन करावयाच्या विविध बाबीवर झ ालेला खर्च साधारणतः अंदाजे रुपये १८ कोटी पर्यत आहे.

उपरोक्त परिच्छेद ब मध्ये नमुद केलेल्या अधिनियम कलम २२ (२) अन्वये व्यवस्थापन निधीत वर्ग करावयाच्या रक्कमेची मर्यादा सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी प्रयोजित बाबीसाठी व्यवस्थापन निधीमध्ये होण्याच्यादृष्टीने विश्वस्तव्यवस्था निधीतुन एकुण रुपये १८ कोटी मात्र व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

त्यानुसार उपरोक्त प्रस्ताव शासनाकडे सादर करणेसाठी मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०६.** **सोने-चांदी वस्तू अलंकार तपासणीकामी सराफाची (Gold Valuer)नेमणूक करणे बाबत.**

**निर्णय क्र.६८४.** **अ)** श्रीसाईबाबा संस्थानला दक्षिणा पेटीव्दारे मिळणाऱ्या सोने-चांदीच्या वस्तु-अलंकार, तसेच वेळोवेळी लेखाशाखेत देणगी येणारे सोने-चांदी वस्तु, संस्थान परिसरात सापडलेल्या बिनधनी सोने-चांदीच्या वस्तु आदींचे कस लावुन प्रमाणीकरण करणे व त्या दिवशीच्या सोने-चांदी बाजारभावाप्रमाणे किंमती ठरविण्याचे काम श्री. रघुनाथ माधव नागरे, सराफ रा.शिरडी हे सन १९९० पासून मानद तत्वावर काम करीत आहेत. तथापी ते शासनमान्य मुल्यांकनकार नाहीत. याकामी त्यांना मासिक रुपये २,०००/- मानधन देण्यात येत असुन त्यांची
नेमणुकीची मुदत माहे डिसेंबर, २००६ अखेर संपत आहे.

**ब)** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ दिनांक २३ ऑगस्ट,२००४ चे अधिसूचनेनुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासान नियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. उपरोक्तप्रमाणे प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तु अलंकार, खडे यांचेबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि२००५/४०७/(६४) का.सोळा दिनांक ११ ऑक्टोबर, २००५ अन्वये, वस्तु-अलंकारांचे शासन मान्यताप्राप्त परवानाधारक अधिकाऱ्यांकडून मूल्याकन केले किंवा कसे, त्या वस्तु-अलंकारांची Off-Set Value ठरविण्यात आली आहे काय याबाबत विचारणा केलेली होती. त्यानूसार लेखाशाखेकडील दिनांक १३ जुन,२००६ चे

मंजुर टिपणी नुसार संस्थानकडे संचित असलेले सोने-चांदी वस्तु अलंकार मुल्यांकनासाठी पुणे व - नाशिक येथील प्रत्येकी दोन शासनमान्य मुल्यांकनकारांची नेमणुक करण्यात आलेली आहे. परंतु सदरचे मुल्यांकनकार हे स्थानिक नसल्याने प्रत्येकवेळी ते उपलब्ध होऊ शकणार नाहीत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३ मे,२००५ चे सभेतील निर्णय क्रमांक १८१ अन्वये मे.खरोटे ज्वेलर्स, मनमाड यानी त्यांचे दिनांक नसलेल्या पत्रान्वये मुल्यांकनाची विनामुल्य देऊ केलेली सेवा स्वीकारणे बाबत निर्णय झालेला होता. मा.अध्यक्ष महोदय व मा. सदस्य श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे यानी मे.खरोटे ज्वेलर्स, मनमाड यांची मुल्यांकनकार म्हणून नेमणुक करणेत यावी, असे समक्ष सुचित केलेले होते. तसेच मे.खरोटे ज्वेलर्स, मनमाड ही संस्था "जेम्स ॲण्ड ज्वेलरी प्रमोशन" या संस्थेची सदस्य असून, त्यांना मा.मुख्य आयुक्त (आयकर), नाशिक यांची मान्यताप्राप्त आहे.

दिनांक १९ ऑगस्ट,२००६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यानी मे.खरोटे ज्वेलर्स,मनमाड यांची मुल्यांकनकार म्हणून नेमणूक करणेबाबत तोंडी निर्देश दिलेले आहे. मे.खरोटे ज्वेलर्स, मनमाड यांनी दिनांक ३१ ऑगस्ट,२००६ रोजीचे विंनती अर्जाने त्यांनी मुल्यांकनकामी सर्व खर्चासह एकत्रित रक्कम रुपये २,५००/- मानधनाची मागणी केलेली आहे. स्थानिक परिसरात शासनमान्य मुल्यांकनकार उपलब्ध नाहीत. मे. खरोटे ज्वेलर्स, मनमाड हे स्थानिक मुल्यांकाकार नसल्याने दक्षिणापेटी मोजणीचे व्यतिरीक्त इतर दिवशी त्यांची सेवा वेळेवर उपलब्ध होऊ शकणार नाही त्यासाठी स्थानिक मुल्यांकनकाराची नेमणुक करणे आवश्यक आहे.

उपरोक्त परिस्थितीचा विचार करता श्री.रघुनाथ माधव नागरे, हे स्थानिक आहेत तसेच त्यांचेकडून याकामी वेळोवेळी मिळत असलेली सेवा विचारात घेता त्यांच्या नेमणुकीचा कालावधी पुढील दोन वर्षासाठी वाढविण्यात यावा असे वाटते. संस्थानला दक्षिणापेटीव्दारे व लेखाशाखेत देणगीरुपाने येणाऱ्या सोने चांदी वस्तुंमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे व पुढेही होत रहाणार आहे. याकामी श्री.नागरे यांचा अधिक वेळ खर्च होत आहे. त्यांच्या कामाचे स्वरुप,वेळ व श्रम तसेच संस्थान व भक्तांच्या सोयीनुसार ते विना तक्रार देत असलेली सेवा विचारात घेता त्यांचे सध्याचे मानधनात मासिक रुपये २०००/- ऐवजी रुपये २,५००/- पर्यत वाढ करणे उचित होईल असे नम्र मत आहे.

तरी श्री.रघुनाथ माधव नागरे ,शिर्डी तसेच मे.खरोटे ज्वेलर्स, मनमाड यांची मुल्यांकनकार म्हणुन प्रत्येकी दोन वर्षासाठी मासिक रुपये २,५००/- या मानधनावर नेमणुक करणेस मान्यता मिळणेस तसेच मे. खरोटे ज्वेलर्स, मनमाड (शासनमान्यताप्राप्त मुल्यांकाकार ) यांचे नेमणुकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली व त्या अनुषंगाने दोन्हीही मुल्यांकनकारांना नेमणूक आदेश देण्यात यावेत,असें ठरलें.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०७. नवीन पिंपळवाडी रस्ता कॉंक्रीटीकरणाचे काम संस्थानतर्फे करणेविषयी शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचे विनंती बाबत.**

**निर्णय क्र.६८५.** मा.नगराध्यक्ष व मा.मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचेकडील जा.क्र.नं.पं./बांध/कावि-०५/३०३/ २००६ दि. ३०/०६/२००६ चे पत्राव्दारे नविन पिंपळवाडी रस्त्याबाबत मा.अध्यक्षसो यांचेकडे खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

"शिर्डी शहरातील नविन पिंपळवाडी रस्ता हा प्रमुख अंतर्गत रस्ता आहे. सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वहातूक व वर्दळ असते. सदर रस्ता यापुर्वी डांबरीकरण करण्यात आलेला आहे. सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वर्दळ असलेमुळे तसेच गतवर्षीचे पावसाळ्यात तो बराच खराब झालेला आहे.

सदर रस्ता हा शहरातील प्रमुख अंतर्गत रस्ता असून संपूर्ण वहातूक त्या रस्त्यावरुन होत आहे. जुना पिंपळवाडी रस्ता हा नो पार्किंग झोन करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी साहेब अ.नगर यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सदर रस्ता एकेरी मार्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर रस्त्यावरील एकेरी वहातुक ही नविन पिंपळवाडी रस्त्याने सुरु होईल. या सर्व दृष्टीने हा रस्ता अत्यंत महत्वाचा आहे. नविन पिंपळवाडी रस्त्याचे १२ मी. रुंदीच्या बाहेर प्रत्येकी १.५० मी. अंतराचा फुटपाथ करण्याचे काम नगरपंचायती मार्फत प्रगतीपथावर आहे. त्याचप्रमाणे पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी नगरपंचायतीने पाईप लाईनचे काम केलेले आहे. सदर रस्त्याचा वापर श्री साईभक्त तसेच नागरीक मोठ्या प्रमाणावर करतात. सदर रस्त्याची रुंदी १२ मी. असून लांबी ६५०.०० मी. आहे.

तरी कृपया आपणास विनंती करण्यात येते की, नविन पिंपळवाडी रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाचे काम श्री साईबाबा संस्थानमार्फत करणेस विनंती आहे".

शिर्डी नगरपंचायत यांनी उपरोक्त पत्रासोबत रु. ७०,४६,४७२.०० मात्र अपेक्षित खर्चाचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रकानुसार शिर्डी नगरपंचायत यांनी उपरोक्त रस्ता नव्याने कॉंक्रीटींग करण्याचे प्रस्तावीत केले आहे. त्यासाठी सध्याचा रस्ता ३० सेंमी. खोदून नवीन काम करावे लागेल.

संस्थानतर्फे उपरोक्त रस्त्याचे डांबरीकरण मार्च,२००५ अखेर पूर्ण करण्यात आलेले असून त्यासाठी रु.२६,०४,३३५/- मात्र इतका खर्च करण्यात आलेला आहे. सदर रस्त्यावर पावसाचे पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक व्यवस्था शिर्डी नगरपंचायत यांनी केलेली नाही. त्यामुळे काही ठिकाणी पाणी साचून खड्डे पडलेले आहेत. तथापी जेमतेम दिड वर्षापुर्वी डांबरीकरण केलेला रस्ता खोदून कॉंक्रीटीग करणे व्यवहार्य होणार नाही. त्याऐवजी सध्या फक्त रस्त्याचे पृष्ठभागाची दुरुस्ती करणे योग्य होईल. अथवा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत करावयाच्या नियोजित शिर्डी शहर रस्ते विकास प्रकल्पात सदर रस्त्याचा समावेश करुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ, पुणे यांचे तज्ञ सल्ल्याने पुढील कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त रस्ता हा शिर्डी नगरपंचायत यांचे अखत्यारीत असल्याने त्यावर संस्थानतर्फे खर्च करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियम,२००४ कलम २१ पोटकलम (२) अन्वये राज्य शासनाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक असून असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत करावयाच्या नियोजित शिर्डी शहर रस्ते विकास प्रकल्पात सदर रस्त्याचा समावेश करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०८. संस्थानचे रुग्णालयामध्ये करावयाचे फर्निचर व ॲल्युमिनियम पार्टीशनचे कामांबाबत.**

**निर्णय क्र.६८६.** वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल व वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय यांनी अनुक्रमे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे खालील कामे करुन मिळणेबाबत कळविले आहे.

०१) साईनाथ रुगणालय धर्मशाळा नं. ०१ हॉलमध्ये गायनिक सर्जरी व ऑर्थोपेडीक ओपीडी करीता ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये कॅबीन तयार करणे .

०२) श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये ओ.पी.डी.,स्पेशल रुम, सेमी.प्रा.वॉर्ड, C.R.U.विभागात ०४ नर्सिंग काऊंटर तयार करणे.

०३) श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये केसपेपरसाठी कांउटर तयार करणे.

०४) श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये डिलक्स रुममध्ये T.V. करीता ब्रॅकेट सेल्फसह तयार करणे.

०५) श्री साईबाबा हॉस्पीटलचे ए- बिल्डींग पॅसेजमध्ये ॲल्युमिनीअम दरवाजे तयार करणे.

वरिलप्रमाणे कामे साईबाबा हॅास्पीटल व साईनाथ रुग्णालय यांनी कळविले असून, त्यानुसार आवश्यक ती मोजमापे घेऊन आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचे कडून प्लॅन व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आले आहे. त्यानुसार सदर कामास रु. ५,७४,४९३.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त कामास व त्याकरीता येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदर कामासाठी आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचेकडून सेवा घेऊन वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

सदरहू चर्चेच्या वेळी श्री साईनाथ रुग्णालयासाठी धर्मशाळा क्र.०२ मधील इमारतीत तळमजल्यावर डॉक्टरांचे केबीन इ.साठी पूर्वी तात्पूरते बांधकाम करण्यात आलेले आहे. ते काढून त्याऐवजी सुनियोजित पध्दतीने नविन पक्क्या स्वरुपाचे बांधकाम, ॲल्युमिनियम पार्टीशन इ.अनुषंगिक कामे करणे गरजेचे असल्याचे मत उपस्थित सदस्यांनी व्यक्त केले.

यावर सदर कामासाठी काबरे चौधरी आर्किटेक्ट,नाशिक यांचेकडून प्लॅन व एस्टिमेट तयार करुन घ्यावे तसेच काम लवकर पूर्ण होण्याचे दृष्टीने धर्मशाळा परिसरातील व्दरावती इमारतीचे ठेकेदार मे.गोलानी बिल्डर्स,मुंबई हे सदर काम त्याच मंजूर निविदा दरात करण्यास तयार असल्यास त्यांचेकडून करुन घेण्याबाबत प्रस्ताव येत्या उपसमिती सभेपूढे सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-बाधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०९. नगर-मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण कामाचे ठेकेदार मे.न्यु महावीर कंन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या भाव फरक (Price Escalation) बिलाबाबत.**

**निर्णय क्र.६८७.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत सुरु असणारे शिर्डी गावातील नगर-मनमाड रस्ता (लांबी १६०५ मी.) रुंदीकरण व डांबरीकरण काम अंतिम टप्प्यात असून ठेकेदार मे.न्यु महावीर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी दि.२९/०४/२००६ रोजीचे पत्राव्दारे भावफरक (Price Escalatioion) मिळणेबाबतचे बील सादर केले आहे. सदर बिलानुसार ठेकेदार यांनी रु.२१,२८,७१३.२६ मात्र इतक्या भाव फरक (Price Escalation) रकमेची मागणी केलेली आहे. सदर कामाचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | **शिरडी शहरातून जाणारा नगर-मनमाड रस्ता लांबी - १६०५ मि. रुंदीकरण व डांबरीकरण करणे.** |
| ०२ | आर्किटेक्ट | ०१.मे.प्रासाद आर्किटेक्ट, ॲण्ड टाऊन प्लॅनर्स प्रा.लि., पुणे |

| | | |
|---|---|---|
| | | (दि.१४/०३/२००५, सातवे बिला पर्यंत )<br>०२.मे. निकम पाटील असो.श्रीरामपूर, दि. १५/०३/२००५ पासून |
| ०३ | ठेकेदाराचे नांव | मे.न्यु महावीर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| ०४ | अंदाजपत्रकीय रक्कम | २,०३,१०,०००.०० |
| ०५ | निविदा टक्केवारी | अंदाजपत्रकीय रक्कमेवर २% अधिक |
| ०६ | मंजूर निविदा रक्कम | रु. २,०७,१६,२००.०० निर्णय क्र. ५२ दि. २१-२२/०२/२००४ |
| ०७ | कार्यादेश क्रमांक | जा.नं. बांधकाम/ ४७३८/०४ दि. ०६/०५/२००४ |
| ०८ | मंजुर सुधारीत अंदाजपत्रक रक्कम क्र.०१<br>मंजुर सुधारीत अंदाजपत्रक रक्कम क्र.०२<br>M-२५ पेव्हिंग ब्लॉकसह<br>मा.श्री.सी.डी. फकिर यांचे अभिप्रायानुसार अपेक्षित खर्च | रु. २,५६,४०,८५०.०० निर्णय क्र. २२७ दि. २९-३०/०५/२००४<br>रु. २,९७,४०,३००.०० निर्णय क्र. १४९ दि. २७/१२/२००४<br>रु. ३,०१,३५,९०४.०० निर्णय क्र. ३४४ दि. १८/०७/२००५<br>रु. ३,५४,४२,०२३.०० निर्णय क्र.७४३ दि.१८/१२/२००५ |
| ०९ | काम सुरु केल्याचा दिनांक | ०९/०५/२००४ |
| १० | निविदेनुसार काम पूर्ण करण्याची मूदत | पाच महिने (दि. ०८/१०/२००४ पर्यंत) |
| ११ | मंजूर प्रथम मूदतवाढ | १३/०८/२००५ पर्यंत, निर्णय क्र.२५८, दि.०९/०७/२००५ |
| १२ | सुरक्षा ठेव | रु. १०,३५,८१०.०० (करार रकमेच्या ५%) |
| १३ | अतिरिक्त सुरक्षा ठेव<br>(निविदा शर्त क्र.३१, पृष्ठ क्र.८९) | झालेल्या कामाचे रकमेचे ५% (१५ वे बिलाअखेर रु. १६,८५,८१०/- मात्र जमा) |
| १४ | निविदेनुसार असलेल्या पाच महिने कालावधीत पूर्ण झालेले कामाची रक्कम | रु. ६०,९७,२६५.०० (चौथे बिल दि. ०९/१०/२००४ अखेर) |
| १५ | आता पर्यंत झालेल्या कामाची किमंत | रु. ३,३७,१६,१९२.०० (१५ वे बिला अखेर) |
| १६ | दोष दायित्व कालावधी | २४ महिने |
| १७ | कामाची सद्यस्थिती | किरकोळ बाबी वगळता काम पूर्ण |

०१) सदर कामासाठी ठेकेदार यांना जा.नं. ४७३८ दि. ०६/०५/२००४ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यातील अ.नं.३ नुसार काम पूर्ण होईपर्यंत अथवा त्यानंतरही Escalation देय होणार नाही, असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

०२) सदर कामासाठी ठेकेदार यांचे बरोबर दि. ०८/०६/२००४ रोजी करारनामा करण्यात आला आहे. त्यातील शर्त क्र.५(b) नुसार " The Contractor shall not be entitled to any price escalation during the validity of the contract & thereafter." असे नमूद केलेले आहे.

०३) सदर कामाच्या निविदेमध्ये ठेकेदार यांना Price Escalation देय असलेबाबत कुठल्याही प्रकारची अट दिसून येत नाही.

०४) सदर भाव फरक बिलासाठी ठेकेदार यांनी शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दि.१०/०१/१९९२ व दि. १६/०५/२००५ चा संदर्भ दिलेला आहे. तथापी सदरहू शासन निर्णय हे सा.बां.विभागाचे अंतर्गत चालणाऱ्या बांधकामांसाठी असून उपरोक्त कामासाठी सदरहू शासन निर्णय लागू होत नाही.

०५) ठेकेदार यांनी त्यांचे उपरोक्त मागणी पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, ज्याप्रमाणे शासन निर्णयानुसार त्यांचे बिलातून VAT ची कपात करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर शासन निर्णयानुसार B-१ tender साठी price Escalation अदा करावे. तथापी निविदा पृष्ठ क्र. ११५ शर्त क्र. ४७(A) नुसार ठेकेदार यांचे दर सर्व करांसाहित आहेत. त्यामध्ये Work contract Act, १९८५ त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह लागू असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे ठेकेदार यांचे वरील म्हणणे संयुक्तिक नाही.

०६) निविदेमध्ये सिमेंटचा स्टार रेट रु. १२५/- प्रती गोणी देण्यात आलेला आहे. त्यानुसार ठेकेदार यांना बाजार भावाप्रमाणे येणाऱ्या फरकापोटी रु. ७५,०००/- मात्र इतकी रक्कम रनिंग बिलातून अदा करण्यात आलेली आहे.

अशाप्रकारे ठेकेदार यांना Price Excalation देय होत नाही, असे मत आहे. सदर कामाचे तांत्रिक सल्लागार मे. निकम पा.असो. श्रीरामपूर यांनीही दि. ३०/०५/२००६ चे पत्राव्दारे सदर Price escalation बिल देय होत नसल्याचे कळविले असून दि. २०/०६/२००६ रोजी दिलेल्या पत्रानुसार ' यापूर्वी या कामासाठी संस्थानने मा. फकीर साहेब, रिटा.चिफ इंजिनियर यांचा तज्ञ म्हणून सल्ला घेतलेला आहे. सदर विषयाकरीता सुध्दा तज्ञ म्हणून त्यांचा सल्ला घेण्यास हरकत नाही '. असल्याचे कळविले. त्याबाबत मा. कार्यकारी अधिकारी यांचे दि. २०/०६/२००६ चे आदेशान्वये मा.श्री.सी.डी.फकीर सो., यांचेकडून जा.क्र.८२४०/२००६ दि. २१/०६/२००६ चे पत्राव्दारे ठेकेदार यांनी मागणी केलेली भाववाढ (Price escalation) देय होते किंवा कसे याबाबत अभिप्राय मागविण्यात आला. सदर पत्राचे अनुषंगाने मा.श्री.सी.डी. फकीर सो., यांनी दि. ०५/०७/२००६ रोजी शिर्डी येथील शासकीय विश्रामगृहात संस्थानचे अभियंता, तांत्रिक सल्लागार श्री.पी.आर. निकम व ठेकदार श्री.ए.सी.देवसाळे यांचेशी चर्चा केल्यानंतर त्यांचे दि. ०८/०७/२००६ चे पत्रान्वये त्यांचा अभिप्राय कळविला आहे. मा.श्री.सी.डी. फकीर सो., यांचेकडील सदरचे पत्र सोबत अवलोकनार्थ ठेवले असून कृपया त्याचे अवलोकन होणेस विनंती.

मा.श्री.सी.डी.फकीर सो., यांनी उपरोक्त पत्रामध्ये ठेकेदार यांचे भाववाढीचे मागणीबाबत नमूद केलेल्या अभिप्रायाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

" कामाच्या मूळ नकाशात झालेला बदल, कामास लागलेला कालावधी,बदलामुळे निर्माण झालेल्या अतिरिक्त बाबी, निविदेतील बाबींचे वाढलेले परिमाण या बाबी लक्षात घेता व कंत्राटदाराने न्यायालयाकडे धाव घेतल्यास मोठ्या प्रमाणात होणारे संभाव्य नुकसान टाळण्याच्या दृष्टीने माझे अभिप्राय असे आहेत की -

१. भाववाढ काढताना अतिरिक्त बाबी कामाच्या रकमेतुन वजा करावे. संस्थेने भाववाढ देण्याची कोणतीही पध्दत निश्चित न केल्यामुळे, करार करताना सार्वजनिक बांधकाम खात्याची जी तत्वे अंमलात होती त्यानुसार भाववाढ निश्चित करणे संस्थानाच्या हिताचे राहील.

२. कामाच्या रकमेतून ज्या अतिरिक्त बाबी वजा करण्यात येतील त्याची निश्चिती त्या-त्या वर्षाच्या सा.बां. विभागाच्या दरसुचीनुसार साहित्याचे बाजारभाव व प्रत्यक्ष लागलेली आणणावळ (Actual lead charges) विचारात घेऊन कंत्राटदाराच्या सहमतीने निश्चित करण्यात यावे.

३. भाववाढीच्या रकमेतून यापुर्वी दिलेले सिमेंट भाववाढीचे रु. ७५,०००/- कपात करावे.

४. भाववाढ अदा करणेपुर्वी कंत्राटदाराकडून लेखी स्वरुपात लिहून घ्यावे की अतिरिक्त बाबींच्या दराव्यतिरिक्त या कामाबाबत कोणतीही मागणी राहणार नाही.

०५.कंत्राटदाराने सादर केलेले भाववाढीचे विवरण चुकीचे आहे.अतिरिक्त बाबी वजा न केल्यामुळे त्या वजा करुन तसेच सुरुवातीच्या ५ महिन्यातील काम कमी करुन कामातील घटकाचे प्रमाण पुनश्च निश्चित करुन प्रचलीत नियमानुसार भाववाढीची रक्कम अदमासे रुपये १५.०० लक्ष इतकी येते. ती कंत्राटदारास अदा करणे आवश्यक असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. फकीर साहेब, रिटा.चिफ इंजिनियर, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे बोलविण्यात यावेत व त्यांचेशी चर्चा करुन याबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

याचवेळी मा.विश्वस्तांनी असे सांगितले की, संस्थानचे निधीतून ज्या ठिकाणी रस्ते तयार करुन देण्यात आलेले आहेत त्या रस्त्यांना "श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे निधीतून काम करुन देण्यात आलेले आहे" असे बोर्ड लावण्यात यावेत. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१०. भक्तनिवास कँन्टीन दुरुस्ती वाढीव खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.६८८.** साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारत साईभक्तांचे वापरासाठी सन १९९४ पासून आहे. या इमारतीमध्ये सुमारे २९०० ते ३००० साईभक्तांची रहाण्याची व्यवस्था आहे. कॅन्टीनचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने दुरुस्तीचे तसेच अंतर्गत सुविधा निर्माण करणेकरीता कॅन्टीन मधील फ्लोरींग, भिंतीवरील टाईल्स, रंगकाम, ॲल्युमिनियम पार्टीशन व दरवाजे दुरुस्तीसह नवीन पार्टीशन, ग्रेनाईट टॉप काउंटर, फॉल सिलींग, डॅडो, टेबल टॉप इत्यादी सर्व कामांचा समावेश करुन रु. २३,८७,३००/- एस्टिमेटनुसार निविदा मागविण्यात येवून मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०४/२००६ चे सभेत निर्णय क्र.१८९ अन्वये श्री.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपुर यांची रु.२२,५५,३९९/- निविदा मंजुर करण्यात आली आहे. ठेकेदार यांनी मुख्य हॉल फॉलसिलिंगचे , भिर्तीना व्हेट्रीफाईड टाईल्स लावणे, विंडो सिल व ग्रील काम पुर्ण केले आहे. फ्लोरींगचे काम पुर्ण होत आले आहे. रंगकाम प्रगतीपथावर आहे.

दि.१/०९/२००६ रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी या कामा बरोबरच अद्यापही खालीलप्रमाणे काम करणे आवश्यक असल्याचे कळविले आहे.

१. हॉलमधील गोलाकार खांबाना ॲल्युमिनियम कंपोझीट पॅनलिंग करणे.
२. किचन जवळील टॉयलेट दुरुस्त करणे.
३. त्याचप्रमाणे किचन कन्सल्टंट श्री.देशमुख यांनी सुचविलेल्या बदलानुसार इलेक्ट्रीक व प्लंबिंगचे काही ॲटम करावे लागणार आहेत.

याकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**<u>हॉल :-</u>**

| अ.नं. | तपशिल | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | कॉलमचे बाजुने पडदी व ॲल्युमिनियम कंम्पोझीट पॅनल | १,८४,८६०.०० |
| ०२. | इलेक्ट्रीफिकेशन | ७५,०००.०० |
| ०३ | **किचन :-**<br>विट बांधकाम, प्लास्टर | ३६,६३५.०० |
| ०४. | व्हेट्रीफाईड टाईल्स डॅडो, ग्रेनाईट सील | २,०१,८१५.०० |
| ०५. | विट बांधकाम चेंबर ड्रेनेज, पाईप फिटींग | १,१३,९४०.०० |
| ०६. | व्हेट्रीफाईट टाईल्स क्वॉटीटीत वाढ झाल्यामुळे | ४४,५५०.०० |
| ०७. | **टॉयलेट ब्लॉक :-**<br>सिमेंट प्लास्टर | ११,७४०.०० |
| ०८. | ग्रेनाईट सील, जाम डोअर फ्रेम, युरीनल पार्टीशन | ५९,९९०.०० |
| ०९. | फ्लश डोअर्स | २६,७७५.०० |
| १०. | व्हेट्रीफाईड टाई ल्स | ६१,९३६.०० |

| | | |
|---|---|---|
| ११. | डब्ल्यू.सी., युरिनल, वॉशबेसीन, रंगकाम ड्रेनेज, पाईप फिटींग इत्यादी | ४,५६९.०० |
| | एकूण रुपये | ८,७१,८१०.०० |

उपरोक्तप्रमाणे वाढीव कामासाठी रु. ८,७१,८१०/- मात्र खर्च येईल. सदर वाढीव खर्चाचे एस्टिमेट आर्किटेक्ट श्री.अरविंद वैद्य, संगमनेर यांनी सादर केले आहे. तरी वाढीव खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.११. कोपरगांव रेल्वे स्टेशन, येसगाव ता.कोपरगांव येथे साई संस्थानमार्फत भक्तांसाठी निवासस्थळ बांधणे बाबत.**

**निर्णय क्र.६८९.** याबाबत मा.उपाध्यक्ष श्री शंकरराव गेणूजी कोल्हे यांचे उपस्थितीत चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा, तोपर्यन्त सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१२. शिर्डी नगरपंचायतीच्या दुकान केंद्रासमोर सुशोभित कारंजा उभारणेकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे निधी हस्तांतरीत करणे बाबत.**

**निर्णय क्र.६९०.** शिर्डी गावात नगर-मनमाड रस्त्यालगत पश्चिम बाजुस शिर्डी नगरपंचायत यांचे दुकान केंद्र आहे. हा भाग मध्यवर्ती असुन दर्शनिय आहे. हा भाग सुशोभित व्हावा याकरीता कारंजा व सभोवती छोटा बगीचा तयार करणेसाठी व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ चे सभेतील निर्णय क्र.४०६ अन्वये निविदा मागविण्यात येवून, सदर निविदा दिनांक ०५/११/२००५ रोजीचे सभेत उघडण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मे.अल्फा फाउंटन ॲण्ड इन्स्ट्रुमेंटस्, पुणे यांची निविदा मान्य करण्यात आली. तसेच याकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधिल तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले होते. त्यानुसार न्याय व विधी विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/ ११८९४/दि.१९/१०/२००५ अन्वये सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यावर शासन निर्णय क्रमांक सासंवि/२००५/८८५(८)/ का.१६ दि.२३/०८/२००६ अन्वये खालिलप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे.

मौजे शिर्डी येथील नगर-मनमाड रस्त्यालगत शिर्डी नगरपंचायतीच्या दुकान केंद्रासमोर सुशोभित कारंजा उभारण्यासाठी कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे रु.४,३३,५०९/-(अक्षरी रुपये चार लक्ष तेहतीस हजार पाचशे नउ) मात्र इतक्या खर्चास विशेष बाब म्हणून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. उपरोक्त काम अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या अंदाजीत खर्चापेक्षा जास्त न होण्याची, दक्षता कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर बांधकाम संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करवून घेण्यात यावे.

२. सदर निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सन २००६-२००७ च्या विश्वस्त निधीतून खर्ची टाकण्यात यावा व याचा तपशील त्या वर्षीच्या वार्षिक अहवालात देण्यात यावा.

३. उपरोक्त नमुद कामे विहित मूदतीत पुर्ण होतील हे कार्यकारीअधिकारी यांनी पहावे. तसेच त्यांनी याबाबतचा प्रगती अहवाल अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडून प्राप्त करुन शासनास पाठविण्यात यावा.

तरी उपरोक्त शासन निर्णयानुसार सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यास तसेच अल्फा फाउंटन ॲण्ड इन्स्ट्रुमेंटस्, पुणे यांची निविदा रद्द करणेस व त्यांना त्यांची अनामत रक्कम परत करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१३. जमीन मोजणी व सर्वेक्षणासाठी इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन यंत्र खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.६९१.** मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी क्र.भूमापन/का.वि.२६/२००६, दि. १८/०३/२००६ चे पत्राव्दारे असे कळविले आहे की, अहमदनगर येथिल त्यांचे दालनात मा.आमदार व अध्यक्ष श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था श्री.जयंतरावजी ससाणे यांचे बरोबर शिर्डी संस्थानच्या विकास कामाबाबत चर्चा झाली असता सदर चर्चेमध्ये जमीन मोजणी काम सत्वर होण्यासाठी संस्थान त्यांच्या स्वखर्चाने एक इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन यंत्र खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

उपरोक्त निर्णयाची अंबलबजावणी करण्याकरीता लायका किंवा ट्रिम्बल कंपनीचे यंत्र खरेदी करणे उपयोगाचे आहे, त्याचा खर्च अंदाजे रु. ०९ लाख मात्र इतका आहे. तरी उपरोक्त जमीन मोजणी यंत्र खरेदी करण्यात यावे, अशी विनंती मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी उपरोक्त पत्राव्दारे केलेली आहे.

संस्थानतर्फे सध्या शिर्डी परिसरात व इतर ठिकाणी जमीन खरेदी तसेच संपादनाची प्रक्रीया चालू आहे. त्यासाठी वेळोवेळी मोजणीचे काम करावे लागते. टोटल स्टेशन यंत्राव्दारे जमीन मोजणीचे काम कमी श्रमात, वेगाने व अचूक होईल. तसेच इतरही तांत्रिक स्वरुपाच्या सर्वेक्षणासाठी त्याचा उपयोग होईल. या यंत्राव्दारे केलेल्या सर्वेक्षणाचा तपशिल थेट संगणकात डिजीटल स्वरुपात साठवता येतो. त्यामुळे संस्थानतर्फे हे यंत्र खरेदी करणे उपयुक्त ठरेल. हे यंत्र खरेदी करणेसाठी लायका, ट्रीम्बल

तसेच इतर नामांकीत कंपन्यांकडून थेट कोटेशन्स मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, जमीन मोजणी व सर्वेक्षणासाठी इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन यंत्र खरेदीकामी लायका, ट्रीम्बल तसेच इतर नामांकीत कंपन्यांकडून थेट कोटेशन्स मागविण्यात यावेत. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. सदरहू मशिनची मालकी हक्क संस्थानकडेच ठेवण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१४. श्री वेणूनाथ सुर्यभान गोंदकर,शिर्डी यांची सर्व्हे नं. १४७/१ व सर्व्हे नं. १४७/२ एकुण क्षेत्र १ हेक्टर १८ आर जमीन खरेदी बाबत**

**निर्णय क्र.६९२.** श्री. वेणुनाथ सुर्यभान गोंदकर, राहणार शिर्डी यांनी त्यांची खाली नमुद केलेली जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून दिनांक १७ ऑगष्ट, २००६ रोजी प्रस्ताव दिलेला आहे.

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्र हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|
| ०१ | १४७/१ | ००-८९-००<br>००-०१-०० पोटखराबा<br>००-९०-०० |
| ०२ | १४७/२ | ००- २८-००<br>००-०१-०० पोटखराबा<br>००-२९-०० |
| | **एकुण** | **०१-१९-००** |

अर्जामध्ये, श्री. वेणुनाथ सुर्यभान गोंदकर यांनी असे नमुद केले आहे की, त्यांच्या वडीलांच्या नावावरील रेकॉर्ड त्यांचे नांवावर होतांना वर नमुद केलेले क्षेत्र ०० हे २० आर रेकॉर्डला कमी लागलेले आहे. त्याबाबत ते रेकॉर्ड दुरुस्त करुन घेऊन, दुरुस्त उतारे देणार आहेत.

वर नमुद केलेल्या जागेची पाहणी विश्वस्त मा.डॉ.ए.भा.गोंदकर व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी दिनांक १५ ऑगष्ट, २००६ रोजी केलेली आहे. सदर जागा सर्व्हे नंबर १४८ च्या ( श्री साईबाबा धर्मशाळा परिसराच्या) पश्चिम बांधालगत आहे. तसेच सदर जागा संस्थानच्या धर्मशाळा, भक्तनिवास बांधणेकामी, साईभक्तांच्या सेवा-सुविधा अथवा अन्य लोकोपयोगी कामासाठी उपयुक्त आहे.

उपरोक्त सर्व्हे नंबरच्या ७/१२ चे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | खातेदाराचे नांव | इतर हक्कात |
|---|---|---|---|---|
| ०१ | १४७/१ | ००-९०-०० | वेणुनाथ सुर्यभान गोंदकर | १. शिर्डी वि.का.सोसायटी, शिर्डी<br>२. साईनागरी स.प.मर्यादित,शिर्डी<br>३.गुरुदेवदत्त ग्रा.वि.से.सह.सोसायटी |
| ०२ | १४७/२ | ००-२९-०० | वेणुनाथ सुर्यभान गोंदकर | १. शिर्डी वि.का.सोसायटी,शिर्डी<br>२. साईनागरी स.प.मर्यादित,शिर्डी |

उपरोक्तप्रमाणे इतर हक्कात असलेल्या संस्थांची श्री.वेणुनाथ सुर्यभान गोंदकर यांचेकडे किती येणे बाकी आहे याची माहिती, तसेच उपरोक्त सर्व्हे नंबर आरक्षणात आहेत किंवा कसे याबाबतची माहिती शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून व ७/१२ च्या उताऱ्यावर असलेल्या फेरफारबाबत माहिती संकलीत करण्यात येत आहे. जमीन मोजणीचा नकाशा अर्जदाराकडून मागविणेत येत आहे. अर्जदाराने जमिनीची किंमत वाटाघाटीने ठरविण्यात यावी, असे अर्जात नमुद केले आहे.

तरी याबाबत खालील बाबतीत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. श्री. वेणुनाथ सुर्यभान गोंदकर यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४७/१ क्षेत्र ०० हे ९० आर व सर्व्हे नंबर १४७/२ क्षेत्र ०० हे २९ आर अशी एकुण ०१ हे १९ आर जमीन तसेच त्यांनी नमूद केल्याप्रमाणे ७/१२ च्या रेकॉर्डमध्ये दुरुस्ती करुन ०० हे २० आर जादा जमीन रेकॉर्ड ऑफ राईटला आल्यावर एकुण ०१ हेक्टर ३९ आर जमीन खरेदी घेणेबाबत.

०२. जमीन खरेदीचा निर्णय झाल्यास, मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेपुढे अर्जदार यांना जमिनीची किंमत ठरविणेकामी चर्चा-तथा-वाटाघाटीस बोलविणेबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त जमिनीची संस्थानला आवश्यकता, या जमीनीची रेडिरेकनरनुसार येणारी किंमत तसेच बाजारभावानुसार येणारी किंमत याबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१५. श्री जगन्नाथ सुर्यभान गोंदकर,शिर्डी यांची सर्व्हे नं. १४७/३ क्षेत्र ०० हेक्टर ४२ आर जमीन खरेदी बाबत**

**निर्णय क्र.६९३.** श्री. जगन्नाथ सुर्यभान गोंदकर, राहणार शिर्डी यांनी त्यांची खाली नमुद केलेली जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून दिनांक १७ ऑगष्ट, २००६ रोजी प्रस्ताव दिलेला आहे.

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्र<br>हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|
| ०१ | १४७/३ | ००-४१-००<br>००-०१-०० पोटखराबा |
| | **एकुण** | **००-४२-००** |

वर नमुद केलेल्या जागेची पाहणी विश्वस्त मा.डॉ.ए.भा.गोंदकर व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी दिनांक १५ ऑगष्ट, २००६ रोजी केलेली आहे. सदर जागा सर्व्हे नंबर १४८ च्या ( श्री साईबाबा धर्मशाळा परिसराच्या) पश्चिम बांधालगत आहे. तसेच सदर जागा संस्थानच्या धर्मशाळा, भक्तनिवास बांधणेकामी, साईभक्तांच्या सेवा-सुविधा अथवा अन्य लोकोपयोगी कामासाठी उपयुक्त आहे.

उपरोक्त सर्व्हे नंबरच्या ७/१२ चे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | खातेदाराचे नांव | इतर हक्कात |
|---|---|---|---|---|
| ०१ | १४७/३ | ००-४२-०० | जगन्नाथ सुर्यभान गोंदकर | १. शिर्डी वि.का.सोसायटी, शिर्डी<br>२. आंध्र बँक, शिर्डी |

उपरोक्तप्रमाणे इतर हक्कात असलेल्या संस्थांची श्री. जगन्नाथ सुर्यभान गोंदकर यांचेकडे किती येणे बाकी आहे याची माहिति, तसेच उपरोक्त सर्व्हे नंबर आरक्षणात आहेत किंवा कसे याबाबतची माहिती शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून व ७/१२ च्या उताऱ्यावर असलेल्या फेरफारबाबत माहिती संकलीत करण्यात येत आहे. जमीन मोजणीचा नकाशा अर्जदाराकडून मागविण्यात येत आहे.

अर्जदाराने जमिनीची किंमत वाटाघाटीने ठरविण्यात यावी, असे अर्जात नमुद केले आहे.

तरी खालील बाबतीत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१) श्री. जगन्नाथ सुर्यभान गोंदकर यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४७/३ क्षेत्र ०० हे ४२ जमीन खरेदी घेणेबाबत.

०२) जमीन खरेदीचा निर्णय झाल्यास, मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेपुढे अर्जदार यांना जमिनीची किंमत ठरविणेकामी चर्चा-तथा-वाटाघाटीस बोलविणेबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त जमिनीची संस्थानला आवश्यकता, या जमीनीची रेडिरेकनरनुसार येणारी किंमत तसेच बाजारभावानुसार येणारी किंमत याबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१६. श्रीसाईबाबा हॉस्पिटलसाठी एम.आर.आय मशिन खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.६९४.** श्री साईबाबा रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे एम.आर.आय. मशिन खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०७/२००६ निर्णय क्र. ५२९ अन्वये सदर खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.३ कोटीचे खर्चास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा फॉर्म हे दि. १४/०८/२००६ पासून विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येऊन स्विकारण्याची शेवटची मुदत २८/०८/२००६ ठेवण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात दोन निविदांची विक्री होऊन दोन उत्पादक कंपन्याकडून बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

१. मे. इनोव्हेटीव्ह, चंदीगढ

२. मे. सिमेन्स लि., मुंबई

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले दोन कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| Sr.No | Name of Party | Specification/Model | Quoted rates | Rate after Negotation | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Siements Ltd.Pune | Mgnetom Avento | 7.50 Crore | 5.25 Crore | 2 years Warranty 5 yrs. CMC 20% Advance payment against order & balance payment against proof of dispatch. CMCM Charges Rs 2200000/- for 3rd year & 5% Esclation thereafter. For Magnetom C CMC 1350000/- & amc 350000 & 5% Esclation thereafter + Taxes Extra. |
| | | Magnetom Symphony | 5.75 crore | 4.45 crore | |
| | | Magnetom C(Permant Magnat) | 2.55 Crore | 2.25 Crore | |
| | | OPtional Accessories for above | 1.11 Crore | 1.11 Crore | |
| | | | | | EMD amount is submitted with tender. |
| 02. | Innovative, Chandigarh | Achieva 1.5T. 10 Helium inclueded | 6.25 Crore | 5.55 Crore | 2 yrs. CMC/ 10 yrs. Helium cost. A/C & Electrical work inside MRI Room. AMC Charges 700000/- for 3rd yr. & 5% Escaltion thereafter. |
| | | Achieva 1.5T. 5 year CMC free & 10 Helium & Cold Head inclueded | 6.92 Crore | 5.80 Crore | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Achieva 1.5T. 5 year CMC free & Maintenance & Helium & Spears inclueded | 6.15 Crore | 6.15 Crore | CMA 2200000/- Charges for 3rd yr. & 5% Escaltion thereafter. Taxes Extra. |
| | | Optional Accessories- Camara CCTV, Monitor Rs 10 lakh, Additional Cost for 16 Channel is Rs 1 Crore. | 1.10 Crore | 1.10 Crore | |
| | | | | | No EMD amount is submitted with tender. |
| | | | | | All Electrical False Celing, A.C. work is inclueded in above. |

यावर सविस्तर चर्चा होऊन,याबाबत व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकिय संचालक,रुग्णालय)

**विषय नं.१७. न्युरोसर्जरीसाठी लागणारे हत्यारे खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.६९५.** श्री साईबाबा रुग्णालयात न्युरो सर्जरीच्या शस्त्रकिया कार्यान्वीत करण्यात आल्या आहेत. सदरच्या न्युरो सर्जरीच्या शस्त्रकिया वैद्यकिय संचालक हे स्वत: करणार आहेत.

सदरच्या न्युरो सर्जरीच्या शस्त्रकिया करणेसाठी त्यांनी काही सर्जीकल इन्स्टुमेंटची मागणी केलेली आहे. सदरचे सर्जीकल इन्स्टुमेंट तातडीने खरेदी करण्यासाठी मुंबई येथून बी. ब्रॉन या कंपनीकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. न्युरोसर्जरीचे शस्त्रक्रिया करणेसाठी खालीलप्रमाणे सेट खरेदी करावे लागणार आहेत. सदरची खरेदी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३६,०५,५०५.६० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| Sr.No. | Name of Set | Total in Euro |
|---|---|---|
| 01. | Neurosurgery set skul set Adult | 14,422.33 |
| 02. | CRANIOTOMY SET NO.1 | 23,711.58 |
| 03 | NEW LAMINECTOMY SET | 21,957.85 |
| | Total in Euro | 66,091.76 |
| | Total in Rs. (1Euro=60 Rupees) | 36,05,505.60 |

(कार्यवाही-वैद्यकिय संचालक,रुग्णालय)

**विषय नं.१८. संस्थान कर्मचाऱ्यांना जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देणे बाबत.**

**निर्णय क्र.६९६.** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा. गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

**(अ)**

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री गुरुप्रसाद अरुण कापरे | ६,४५७.०० | ६,४५७.०० |
| २ | श्री सतिष गंगाधर बकरे | ५,०००.०० | ५,०००.०० |
| ३ | सौ.कल्पना रघुनाथ मुसमाडे | १,७००.०० | १,७००.०० |
| ४ | श्रीमती यशोदा भागुजी काळे | ४२,३१२.०० | ४२,३१२.०० |

**(ब)**

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती गिता आप्पासाहेब शिंदे | १,५९८.०० | १,५९८.०० |
| २. | श्री पुरुषोत्तम नामदेव गवळी | १,२६९.०० | १,२६९.०० |
| ३. | श्री गोपीनाथ काशिनाथ चव्हाण | १,३८३.०० | १,३८३.०० |

(कार्यवाही-वैद्यकीयअधिक्षिका,रुग्णालय)

**विषय नं.१९. सध्याचे इन्सिनरेटर इतरत्र हलवून त्या जागेवर फिजिओथेरपी विभाग व गोडावून तयार करुन मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.६९७.** श्री साईबाबा हॉस्पिटलचे आवारात असलेले इन्सिनरेटर तांत्रिक अडचणीमुळे कायमस्वरुपी बंद करण्यात आले आहे. संस्थानचे दोन्हीही रूग्णालयांतील निघणारे बायो मेडीकल वेस्ट मटेरियल सरकारमान्य संस्थेद्वारे नष्ट करण्याचे ठरले असून त्यानुसार कार्यवाहीही सुरू झाली आहे.

उपरोक्त कारणाने सदरचे इन्सिनरेटर पुन्हा वापरता येण्याजोगे नसल्याने ते तेथून हलविल्यास सोईस्कर राहील.

तरी उपरोक्त मशीन हलवून त्या जागेवर तळमाळयावर फिजीओथेरपी विभाग व त्यावरील दोन माळयांवर कायमस्वरूपी वापरता येईल असे गोडावून्स बनविण्यास तसेच सदर गोडावूनमध्ये माल नेणे-आणणेकामी लिफ्टची सोय करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सध्या एम.आर.आय.मशिन खरेदी करणे प्रस्तावित आहे. सदरहू मशिन सध्याचे सी.टी.स्कॅन समोरील खोलीमध्ये बसविण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका/बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२०. डॉ.देवदत्त चाफेकर, नेफ्रॉलॉजिस्ट यांचे फी बाबत.**

**निर्णय क्र.६९८.** संदर्भीय पत्राने डॉ.देवदत्त चाफेकर,नेफ्रॉलॉजिस्ट,नाशिक, यांनी श्री साईबाबा हॉस्पिटलचे डायलेसिस युनिटचे स्टाफला प्रथम त्यांनी योग्य ते ट्रेनिंग देउन त्यानंतर दिनांक १३.०८.२००६ रोजी डायलेसिस युनिट सुरु केले आहे,तसेच सदर युनिटचा बाहयरुग्ण विभाग ते लवकरच सुरु करणेचे विचाराधीन आहेत,असे कळवून सध्या फक्त सहा रुग्णांची नियमीत डायलेसिस करणेकामी नोंद करण्यात आली आहे, असे कळवून प्रती डायलेसिसकरिता त्यांना कन्सल्टेशन फी पोटी रुपये २००/- मात्र मिळावेत, अशी मागणी केली आहे

श्री साईबाबा हॉस्पिटलचे दरांमध्ये प्रति डायलेसिस प्रत्येक वेळी रुपये ६००/- मात्र रकमेची दरनिश्चिती करण्यात आलेली आहे.

डायलेसिस तंत्रज्ञ,यांचेकडून प्राप्त आकडेवारीवरुन,डायलेसिसकामी प्रत्येक वेळी प्रति रुग्णास साधारणतः रुपये ५९०/- मात्र खर्च येतो. तो खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल |
|---|---|
| ०१. | डायलायझर - रुपये- १२०/- (प्रत्येक नग चार वेळा वापरल्यास प्रत्येक वेळी लागणारी सरासरी किंमत.) |
| ०२. | टयुबिंग - रुपये- ४०/- (प्रत्येक नग चार वेळा वापरल्यास प्रत्येक वेळी लागणारी सरासरी किंमत.) |
| ०३ | हिपॅरिन - रुपये- ३०/- |
| ०४. | फिस्टुला निडल्स- रुपये- ५०/- |
| ०५. | आय.व्ही.सेट - रुपये- ५/- |
| ०६. | नॉर्मल सलाईन - रुपये- ४०/- |
| ०७. | ॲसिड/बायकार्ब - रुपये-१००/- |
| ०८. | आर.ओ.वॉटर - रुपये- ५०/- |
| ०९. | इतर खर्च -रुपये - ४०/-(स्पिरीट,डेटॉल वगैरे) |
| एकूण | **एकूण - रुपये - ५९०/-** |

उपरोक्तपैकी अ.नं.१ आणि २ अनुक्रमे डायलाझर व टयुबिंग यांचा वापर किमान चार वेळा होऊ शकतो, त्यांची किंमत प्रत्येकी रुपये ४८० व १६० इतकी आहे. त्यामुळे त्यांचा सेवाआकार उपरोक्त दरांमध्ये कमी दर्शविलेला आहे.

डॉ चाफेकर व आनंदऋषीजी हॉस्पिटल या दोन्हीही रुग्णालयांमध्ये अ.नं.१ ते ४ मध्ये दर्शविलेल्या वस्तू हया रुग्णांस बाहेरुन विकत आणाव्या लागतात.

यां वस्तूंशिवाय डॉ.चाफेकर हॉस्पिटल,नाशिक, यांचेकडे रुपये ७००/- डायलेसिस फी आकारली जाते. तर हीच फी आनंद ऋषीजी हॉस्पिटल,अहमदनगर यांचेकडे रुपये ७५०/- मात्र आकारणी करुन डायलेसिस करण्यात येते.

तरी डॉ.देवदत्त चाफेकर,नेफ्रॉलॉजिस्ट,नाशिक, यांना त्यांचे मागणीप्रमाणे प्रति रुग्ण प्रतिवेळी रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) कन्सल्टेशन फी पोटी अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.चाफेकर यांची मागणी अमान्य करण्यात आली. तथापि त्यांनी आतापर्यंत केलेल्या डायलेसिससाठी रुपये २००/- प्रमाणे फी त्यांना अदा करावी व येथून पुढे सदर पद्धत बंद करण्यात यावी. त्याचप्रमाणे स्थानिक तज्ञ डॉक्टरांशी याबाबत चर्चा करुन डायलेसिस चालू ठेवणेबाबत कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२१. स्टेशनरी,छपाई, कार्यालयीन स्टेशनरी व स्वच्छता साहित्य खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.६९९.** दिनांक १५.५.२००६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शुभहस्ते श्री साईबाबा हॉस्पिटलचे उद्‌घाटन होऊन त्यातील बहूतेक विभाग आता जवळ जवळ व्यवस्थीत सुरु झाले आहे.

सदर हॉस्पिटलचे दैनंदिन कामकाजात उपयुक्त असणारी स्टेशनरी उपलब्ध होणाऱ्या नमून्याप्रमाणे छपाई करुन घेण्यात आली आहे.

यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सदरकामी रुपये २ लाख मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. ती रक्कम आता जवळ-जवळ संपत आली आहे. कारण हॉस्पिटलमध्ये संगणकीय जाळ्याव्दारे चालणारे काम अद्याप पूर्णपणे कार्यान्वीत झालेले नाही. त्यामूळे अजून किमान सहा महिने सदर काम कागदोपत्री व इतर स्टेशनरीचे सहाय्याने करावे लागेल असा अंदाज आहे.

हॉस्पिटलमध्ये अनेक नवनवीन विभाग सुरु झालेले आहेत व आणखी होणार आहेत. उदा.एम.आर. आय.ऑकॉलॉजी वगैरे तसेच डायलेसिस नेत्र विभाग हे विभाग नवीन तंत्रज्ञानानुसार चालणार असल्याने त्यांना लागणारी स्टेशनरी ही वेगळी असल्याने त्यांचा अंदाज यापूर्वी आला नाही.

उपरोक्त छपाईतून वारंवार आवश्यकता भासणारी तसेच नवीन विभागात उपलब्ध होणाऱ्या नमून्याप्रमाणे छपाई करणे आवश्यक झाले आहे. सदरची छपाई कामकाजाच्या दृष्टीने तातडीने होणे गरजेचे आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे छपाई विहीत पध्दतीने छपाई करुन घेणेस तसेच कार्यालयीन कामकाजात आवश्यक असणारी फाईल्स तथा इतर स्टेशनरी व स्वच्छतेकामी आवश्यक असणाऱ्या पायपूसण्या व इतर मटेरिअल संस्थानचे विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये ५ लाख पर्यन्तचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.२२. रेडिओलॉजी विभागाकरीता पाकिटे छपाई बाबत.**

**निर्णय क्र.७००.** श्री साईबाबा हॉस्पिटल व्यवस्थितपणे सुरू झाले असून त्यातील बहुतेक विभाग जवळ-जवळ सुरळीत चालू झाले आहेत.

सदर हॉस्पिटलचे सी. टी. स्कॅन विभागाकरीता पॉकेटची आवश्यकता भासते. यापूर्वी श्री सावता प्रिंटर्स, राहाता, यांचेकडून ३४० रू. शेकडा या दराने वेळोवेळी आवश्यकतेनुसार सदर पाकीटांची खरेदी केलेली आहे.

सदर विभागाकरीता तातडीची गरज म्हणून आवश्यक पाकिटांची छपाई करुन घेणे आता निकडीचे झाले आहे. ज्यादा पॉक्ट्सची छपाई केल्यास हीच पाकीटे श्री सावता प्रिंटर्स,राहाता,हे रू.३१० प्रति शेकडा दराने पाकीटे पुरविणेस तयार झाले आहेत.

उपरोक्त कामी व नव्यानेच सुरु करण्यात आलेल्या एक्स-रे विभागाच्या फिल्मस् या दोन्हींकरिता सध्या एकाच प्रकारचे (साईजचे) पॉकेट वापरत आहे. म्हणून त्यांचा जास्त प्रमाणात वापर होत आहे. म्हणून सध्या तातडीची गरज म्हणून श्री सावता प्रिंटर्स,राहाता,यांचेकडून तात्पुरती १००० नग पाकीटे रुपये ३१० प्रती शेकडा दराने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रुपये ३१००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

तसेच यापुढील साधारणतः एक वर्ष कालावधीसाठी आवश्यक असणारी खालीलप्रमाणे सर्व साईजची पाकीटे छपाई करणे आवश्यक असून, सदरचे पाकिटे कोटेशन्स मागवून छपाई करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १ लाख चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

| अ.नं | साईज (१०० GSM Star craft paper) | छपाई संख्या | अंदाजे रक्कम रूपयांत |
|---|---|---|---|
| १) | १४.५ x १७.५ | १०००० | ५५०००/- |
| २) | १२.५ x १५.५ | ५००० | २३०००/- |
| ३) | १४.५ x १४.५ | ३००० | ५५००/- |
| ४) | १०.५ x १२.५ | २००० | १२७५०/- |
| ५) | १०.५ x ८.५ | १००० | ६५००/- |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२३. श्री मधूकर भिवाजी डोखे यांचे मुलीचे उपचारासाठी मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.७०१.** श्री. डोखे यांची मुलगी कु.योगीता मधुकर डोखे वय वर्ष ४ हिस Central Idio Pathic Precocious Puberty चा त्रास आहे. श्री. डोखे यांनी प्रथम आपले रुग्णालयात बालरोग विभागात डॉ.नमीता जाजु यांना दाखविले होते. श्री.डोखे यांना पुढील तज्ञ सल्ला व उपचारासाठी जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे पाठवले आहे.

जे.जे.रुग्णालयातील डॉक्टरांनी सर्व तपासण्या व उपचार केल्यानंतर त्यांना Inj.Decapeptyl ३.७५mg हि इंजेक्शन एक वर्षाकरीता प्रत्येक महिन्याच्या अंतराचे घ्यावयाचे सांगितले आहे. पहिला डोस हा २६.०१.२००६ पासुन सुरु करण्यात आला होता.

सदरच्या इंजेक्शनची आवश्यकतेनुसार खरेदीस व एका इंजेक्शनची किंमत रु.५०००/- याप्रमाणे दर महिन्यास एक असे १२ इंजेक्शनच्या रु. ६०,०००/- च्या खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१२/२००५ चे सभेत मान्यता मिळाली होती. त्याप्रमाणे त्यांना १२ इंजेक्शन खरेदी करुन देण्यात आले आहे.

के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई येथील डॉक्टरांनी त्यांना त्याच इंजेक्शनचा कोर्स पुढे दर २१ दिवसांचे अंतराने कायम करण्यास सांगितले आहे.

त्यानुसार श्री. मधुकर डोखे यांनी त्यांचे दि. १८/०७/२००६ च्या अर्जान्वये प्रत्येक २१ दिवसात १ इंजेक्शन याप्रमाणे एकुण १८ इंजेक्शन खरेदी करुन मिळण्याची विनंती केली आहे.

एका इंजेक्शनसाठी रु. ५०९४/- याप्रमाणे एकुण १८ इंजेक्शनसाठी रु. ९१,६९२/- पर्यंत खर्च येणार आहे व ती त्यांना यापुर्वी आवश्यकतेनुसार खरेदी करुन दिली होती त्याप्रमाणे ती पुन्हा आवश्यकतेनुसार खरेदी करुन देता येईल. याबाबत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांना सदरहू विषय दाखविण्यात आलेला असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**विषय नं.२४.** **अतिवृष्टीमूळे अदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना औषधे देणे बाबत.**

**निर्णय क्र.७०२.** जिल्हा परीषद अहमदनगर आरोग्यविभाग यांचे पत्र क्रमांक जा.क्र.आरोग्य/ का.१/भांडार/२०१/०६ अहमदनगर दि.३१.०८.२००६ अवये मा. ना. बाळासाहेब थोरात कृषी मंत्री महाराष्ट्र शासन यांच्या सुचनेवरुन अकोले तालुक्यातील आदिवासी क्षेत्रातील लोकांना अतिवृष्टीमुळे होणारे संभाव्य साथरोग नियंत्रणासाठी संस्थान कडून एकूण ४९ प्रकारच्या औषधांची मागणी केलेली आहे.

सदरच्या औषधांपैकी रु.१० लाख पर्यंतच्या औषधांची मदत देणे बाबत मा. अध्यक्ष यांच्या सुचना आहेत.

सन २००६-२००७ या वर्षाकरीता नुकतेच वर्तमान पत्रात जाहिरात देऊन औषधे खरेदीसाठी निविदा मागवण्यात आलेल्या आहेत. एकुण मागणी केलेल्या ४९ औषधांपैकी २१ औषधे ही निम्नतम दरानुसार औषधे रु. ९,४७,५३३/- लाख पर्यंत खरेदीकामी खालील पुरवठा धारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

| Sr.No | Name of drugs | Make | Supplier Name | Qty. | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Inj. Ceftriaxone 1gm | Glenmark | Keps Pharma Mumbai | 2000 vial | 19.4900 | 38980.00 |
| 2 | Inj. Gentamycin 80 MG/2ml | Wochkhrdt | Pharmacea link Pune | 2000 vial | 2.9500 | 5900.00 |
| 3 | Inj. B complex 10ml | Elder | Vishal Ag. Ahemadnagar | 2000 vial | 6.0000 | 12000.00 |
| 4 | Inj. Ranitidine | Intas | S.S. Pharma Mumbai | 4000 Amps | 1.4870 | 5948.00 |
| 5 | Cap Ampicillin 250 mg | Natco | Keps Pharma Mumbai | 20000 cap | 0.7690 | 15380.00 |
| 6 | Cap Amoxycilin 250mg | Khandelwal | Khandelwal Mumbai | 20000 cap | 0.72000 | 14400.00 |
| 7 | Cap Tetracycline 250mg | Alkem | Sandeep Ag. Kopargaon | 40000 cap | 0.3730 | 14920.00 |
| 8 | Tab Cephalexine 250 mg | Alkem | Sandeep Ag. Kopargaon | 20000 | 1.3050 | 26100.00 |
| 9 | Cap Doxycycline 100mg | Gulpha | Laxmi pune | 20000 | 0.5800 | 11600.00 |
| 10 | Tab Ibu 400mg+ para 500mg | Makers | Makers Lab | 80000 Tabs | 0.3600 | 28800.00 |
| 11 | Tab Nortfiox400mg + Tz 600mg | Concept | Vaibhav Pune | 80000 Tabs | 1.3850 | 110800.00 |
| 12 | Tab Cetrizine 10mg | Alkem | Sandeep Ag. Kopargaon | 50000 | 0.0874 | 4370.00 |
| 13 | Tab Nimusilide 100mg | Makers | Makers Lab | 50000 | 0.1000 | 5000.00 |
| 14 | Tab Metronidazole 400mg | Haffkine | Haffkine Mumbai | 50000 | 0.1798 | 8990.00 |
| 15 | Co- Trimoxazole susp | Alkem | Sandeep Ag. Kopargaon | 5000 | 7.1600 | 35800.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 16 | Amoxycillin susp | Makers | Makers Lab | 5000 | 6.3000 | 31500.00 |
| 17 | Syp Nimusulide 100mg 60ml | Intas | S.S. Pharma Mumbai | 5000 | 6.9780 | 34890.00 |
| 18 | Syp Paracetamol | Indoco | Indoco | 5000 | 5.6810 | 28405.00 |
| 19 | Cough expectorant | JCPL | JCPL,Jalgaon | 10000 | 48.000 | 480000.00 |
| 20 | Metronidazole susp | Haffkine | Haffkine,Mumbai | 5000 | 6.7500 | 33750.00 |
| | | | | | **Total** | **947533.00** |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**विषय नं.२५. श्री साईनाथ रुग्णालय (धर्मशाळा) येथे हायड्रॉलीक लिफ्ट बसविणेकामी प्राप्त झालेले टेंडर उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७०३.** माहे जुलै २००३ पासून रुग्णांचे सोयीसाठी सध्या कार्यरत असलेल्या श्री साईनाथ रुग्णालयाच्या हे धर्मशाळा इमारत क्रमांक २ ( २०० रुम ) मध्ये लिफ्टची व्यवस्था असणे आवश्यक आहे. सदर व्यवस्था झाल्यास रुग्णालयातील रुग्णांना त्याचा फायदा होईल. भविष्यात रुग्णालय विभागाचे स्थलांतर झाल्यास त्या लिफ्टचा साईभक्तांनाही फायदा होईल. तरी श्री साईनाथ रुग्णालयात लिफ्ट बसवून मिळावी म्हणून मा.वैद्यकिय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी यांनी कळविले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४-०४-२००६ चे सभेत व स्थानिक विश्वस्त समितिचे दिनांक ०५-०७-२००६ चे सभेत चर्चा होऊन वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक ०१-०८-२००६ ते दिनांक १४-०८-२००६ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. सिलबंद टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक १७-०८-२००६ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ०३ व मुंबई कार्यालयात ०१ टेंडर प्राप्त झाले असून टेंडरधारकांचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.प्राईम इलेव्हेटर, मुंबई |
| ०२) | मे.जयंत -ज्योती इलेव्हेटर्स, नासिक |
| ०३) | मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नासिक |
| ०४). | मे.प्रेसवेल्ड इंजिनिअर्स, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय - धर्मशाळा इमारत क्रमांक २ ( २०० रुम ) मध्ये लिफ्ट बसविणेकामी प्राप्त झालेले टेंडरर्स मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६-०९-२००६ चे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्याचे नांव | टेंडरमधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे.प्राईम इलेव्हेटर, मुंबई | १२,५४,९३७.०० | १२,४२,३८८.०० |
| ०२. | मे.जयंत -ज्योती इलेव्हेटर्स, नासिक | ११,१२,४००.०० | १०,९०,१५२.०० |
| ०३. | मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नासिक | ०९,९४,६८०.०० | ०९,९४,६८०.०० |
| ०४. | मे.प्रेसवेल्ड इंजिनिअर्स, मुंबई | ३६,००,०००.०० | ३२,४०,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, लिफ्टसाठी डक्ट बांधण्याचे काम मे.गोलानी बिल्डर्स,मुंबई यांनी अद्याप सुरु केलेले नाही. तरी त्यांचेकडून लिफ्ट डक्टचे बांधकाम लवकर करुन घेण्यात यावे. व उपरोक्तप्रमाणे निम्नतम दर दिलेले मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नासिक यांची लिफ्ट बसविणेकामी निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.२६. श्री विकास मेहता, दिल्ली लिखित " एक फकीर की पाठशाला" चित्रांकित पुस्तक प्रकाशनाबाबत**

**निर्णय क्र.७०४.** श्री.विकास सी. मेहता,दिल्ली यांनी त्यांचेकडील दि.१६.०८.२००६ चे फॅक्स पत्राअन्वये त्यांचे द्वारा लिखीत " एक फकीर की पाठशाला " हे चित्रांकित हिंदी भाषिक पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत दाखल केले आहे.सदर पुस्तकातील प्रस्तावनेत उपरोक्त पुस्तक लहान मुलांसाठी उपयुक्त असल्याचे कळविले आहे. ते संस्थानद्वारा प्रकाशित केल्यास लहान मुलांसाठी त्याचा चांगला उपयोग होईल असे श्री.विकास सी. मेहता,दिल्ली यांनी त्यांचे फॅक्स पत्रात नमुद केले आहे.

श्री.विकास सी. मेहता,दिल्ली यांनी त्यांचे दि.१६.०८.२००६ फॅक्स पत्राअन्वये त्यांचे द्वारा लिखीत "एक फकीर की पाठशाला" हे हिंदी भाषिक पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करण्यासंबंधीत प्रकाशनाचे सर्व हक्क त्यांनी संस्थानला विनाअट देण्याची तयारी दर्शविली आहे.

यापूर्वी श्री.विकास सी. मेहता,दिल्ली यांचे "चिल्ड्रेन्स श्री साईबाबा" हिंदी व इंग्रजी भाषेत अशी दोन प्रकाशने संस्थान मार्फत प्रकाशित करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच त्यांचे द्वारा लिखीत "बाबा की खुमारी में " हे हिंदी भाषिक पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशनाबाबत विचाराधिन आहे. श्री.विकास सी. मेहता,दिल्ली लिखीत "एक फकीर की पाठशाला" हे हिंदी भाषिक पुस्तक लहान मुलांसाठी उपयुक्त आहे. सदर पुस्तकामध्ये एक बाजूस साईबाबांचे फोटो तसेच दैनंदिन हताळल्या जाणा-या वस्तु, प्राणी इत्यादी रंगीत स्वरुपात छपाई केलेल्या आहेत तर त्याचे समोरच दुसरे बाजूस त्याच फोटोचे रेखाचित्र छपाई करुन ते रंगविण्यास सुचित करण्याचे दर्शविले आहे. यामुळे सदरचे पुस्तक प्रकाशित केल्यास त्याचा लहान मुलांसाठी रेखाचित्रे रंगविण्यास व त्यांना संस्कारक्षम बनविण्यास चांगला उपयोग होईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२७.** **श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका-२००७ छपाई कामाचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.७०५.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९.०८.२००६चे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००७ छपाई करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार खालील दर्शविल्याप्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००७ छपाई करून घेण्याचे ठरले आहे

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या |
|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा दैनंदिनी २००७ | ५०,००० नग |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका २००७<br>६ सीट तारखेसह व नावासह (प्रत्येक सीटवर दोन महिने) | १,००,००० नग |
| ०३ | श्री साईबाबा दिनदर्शिका २००७<br>सिंगल सीट (दिनदर्शिकेचे खालील बाजूस प्रतिमहा तारखेसह १२ सीट) | १,००,००० नग |

वरील प्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका -२००७ चे छपाईचे काम हे मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.२९-३१/०३/२००४ चे सभेतील विषय नं. २६ निर्णय क्रमांक १३८ नुसार १८ निवडक प्रेसधारक अधिक मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ चे सभेतील विषय नं. २९ निर्णय क्रमांक ६७८ नुसार ११ निवडक प्रेसधारकांपैकी १० निवडकप्रेसधारक असे एकूण २८ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/ वशी/प्रकाशने/ ११३४३/२००६ दि.२२.०८.२००६ नुसार श्री साईबाबा दैनंदिनी/दिनदर्शिका २००७ छपाई कामाचे कोटेशन्स पाठविण्यात येवून, ते पूर्णपणे भरून दि.०७.०९.२००६ अखेर भरुन पाठविण्याचे कळविण्यात आले आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.युनायटेड प्रिंटर्स,पुणे |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई |
| ०३ | मे.रविक आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई |
| ०४ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०७ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई |
| ०८ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| १० | मे.प्रिंटोग्राफी फोर्ट, मुंबई |
| ११ | मे.प्रिंटमन, मुंबई |
| १२ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक |
| १३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| १४ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर |
| १५ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे |
| १६ | मे.मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई |
| १७ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई |
| १८ | मे.चेरी ऑफसेट प्रिंटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| १९ | मे न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस., मुंबई |
| २० | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| २१ | मे नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लि., मुंबई |
| २२ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| २३ | मे ओनस इम्प्रेशन, मुंबई |
| २४ | मे निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक |
| २५ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |

| | |
|---|---|
| २६ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| २७ | मे उचित ग्राफिक्स प्रिंटर्स प्रा.लि., मुंबई |
| २८ | मे एस.व्ही. प्रिंटर्स मुंबई |

वरील एकूण २८ प्रेसधारकांपैकी दि.०७.०९.२००६ अखेर विहीत मुदतीत खालील १८ कोटेशन्ससादरकर्त्यांनी आपली कोटेशन्स सादर केलेली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| ०२ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे |
| ०३ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०४ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| ०५ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०६ | मे निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक |
| ०७ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर |
| ०८ | मे.युनायटेड प्रिंटर्स,पुणे |
| ०९ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| १० | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई |
| ११ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई |
| १२ | मे.कर्मशियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| १३ | मे ओनस इम्प्रेशन, मुंबई |
| १४ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| १५ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| १६ | मे नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लि., मुंबई |
| १७ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| १८ | मे.मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | श्री साईबाबा दैनंदिनी २००७ | | श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ ६ सीट तारखेसह व नावासह (प्रत्येक सिटवर दोन महिने) | | श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ सिंगल सीट (दिनदर्शिकेच्या खालील बाजूस प्रतिमहा तारखेसह १२ सीट) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटी नंतर देऊ केलेले दर | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटी नंतर देऊ केलेले दर | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटी नंतर देऊ केलेले दर |
| ०१ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | -- | | १०.३४ | ८.४३ | ५.०९ | ४.७६ |
| ०२ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे | ६४.४१ | ६०.५० | १०.४८ | १०.०० | ६.१० | ५.९५ |
| ०३ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | ४५.०० | ४४.५० | ९.९५ | ९.५० | १०.३५ | १०.०० |
| ०४ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ५५.९५ | ४९.०० | ११.३५ | १०.५० | ७.८६ | ७.४५ |
| ०५ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | ४३.५० | ४३.५० | ९.७० | ९.७० | ६.३०. | ६.३० |
| ०६ | मे निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक | -- | -- | १०.६५ | १०.१५ | ७.७० | ७.३० |
| ०७ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर | -- | -- | ८.८० | ८.७० | ५.५८ | ५.५० |
| ०८ | मे.युनायटेड प्रिंटर्स,पुणे | ६३.६९ | अनुपस्थित | १०.१३ | अनुपस्थित | ६.९९ | अनुपस्थित |
| ०९ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | ४६.९३ | ४४.५० | ९.१५ | ८.७५ | ५.९० | ५.७५ |
| १० | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई | ५८.३५ | ५७.५० | ९.२२ | ८.७५ | ५.१२ | ४.८५ |
| ११ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई | -- | -- | १४.२५ | १४.०० | १०.७५ | १०.५० |
| १२ | मे.कर्मशियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ५३.५० | ५०.०० | ९.०५ | ८.९० | ६.०० | ५.९० |
| १३ | मे ओनस इम्प्रेशन, मुंबई | ४५.४० | ४५.४० | ८.५० | ८.४१ | ४.९० | ४.९० |
| १४ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे | ४८.०० | अनुपस्थित | ८.८० | अनुपस्थित | ५.४० | अनुपस्थित |
| १५ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | ४८.०० | ४७.०० | ९.०० | ८.५० | ६.३० | ६.१० |
| १६ | मे नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लि., मुंबई | ५७.०० | ५६.०० | ९.९३ | ९.३५ | ६.२४ | ५.८० |
| १७ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई | ६६.०० | ६४.५० | ९.८० | ९.५० | ७.५० | ७.२५ |
| १८ | मे.मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई | ५४.३४ | अनुपस्थित | -- | अनुपस्थित | -- | -- |

कोटेशन्ससादरकर्त्यांनी दिलेल्या कागदाचे नमुन्यांची मा.सदस्यांनी तपासणी केली व त्यानंतर चर्चेअंती खालील कोटेशन्ससादरकर्त्याचे दर मान्य करण्यात यावे असे ठरले.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | श्री साईबाबा दैनंदिनी २००७ | ४९.०० प्रति नग |
| ०२. | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ ६ सीट तारखेसह व नावासह (प्रत्येक सिटवर दोन महिने) | ८.५० प्रति नग |
| ०३ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई | श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ सिंगल सीट (दिनदर्शिकेच्या खालील बाजूस प्रतिमहा तारखेसह १२ सीट) | ४.८५ प्रति नग |

वरीलप्रमाणे सन २००७ ची दैनंदिनी व दिनदर्शिकांची छपाई करुन १ डिसेंबर २००६ पर्यन्त संस्थानचे ताब्यात देण्यात याव्यात. त्यानंतर दैनंदिनी व दिनदर्शिकांची छपाई करुन मिळाल्यास देय पेमेंटमध्ये २५ टक्के कपात करण्यात येईल अशी अट करारनाम्यात घालण्यात यावी. उत्सवाचा प्रसाद पाठवितांना भक्तांना प्रसादाबरोबर चिठ्ठी पाठवून श्री साईबाबा संस्थानमार्फत दैनंदिनी विक्रीस ठेवण्यात आली असलेबाबत भक्तांना कळविण्यात यावे. तसेच संस्थानचे वेबसाईटवर संस्थान दैनंदिनीची जाहिरात देण्यात यावी. सुरुवातीस ५०,००० डायऱ्यांची छपाई करुन घेण्यात यावी.भारतातील साईमंदिरांची यादी प्राप्त करुन साईमंदिरांना दैनंदिनी विक्रीसाठी ठेवण्यात आलेली आहे असे कळवावे. त्यांनी आगाऊ किंमत पाठवून मागणी केल्यास डायरी पाठविण्यात यावी. सदरहू डायरीची विक्री किंमत रुपये ५०.०० प्रति नग ठेवण्यात यावी.

संस्थान प्रकाशित दैनंदिनी व दिनदर्शिकामध्ये मा.विश्वस्तांचे फोटो छापण्यात येऊ नये. सर्व आमदार व व्ही.व्ही.आय.पी यांना दैनंदिनी व दिनदर्शिका भेट म्हणून देण्यात यावी. सन २००७ मध्ये संपूर्ण भारतात ५ लाख दैनंदिनीची विक्री व्हावी असे उद्दीष्ट ठेवण्यात यावे.

याचवेळेस श्री साईबाबांचे जीवन व कार्याचा प्रसार व प्रचार देशभर व्हावा याकरीता संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो यांची विक्री खाजगी बुकस्टॉल, विक्रेते, एस.टी.स्टॅण्ड व रेल्वे स्टेशनवरील बुकस्टॉल विक्रेत्यांनी मागणी केल्यास त्यांना १५ ते २० टक्के डिस्काऊंट रेटने विक्रीसाठी देण्यात यावी.

तसेच भारतातील साई मंदिरांनी पत्र पाठवून त्यांना संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटोंची विक्रीसाठी ठेवण्याची विनंती करावी. त्यांनी पुस्तके व फोटोची मागणी केल्यास त्यांना १५ ते २० टक्क्यापर्यन्त पुस्तके/फोटोच्या किंमतीमध्ये सुट देण्यात यावी. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२८. श्रीसाई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी तयार करणे कामाचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.७०६.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. द्वारा "श्रीं साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार, व्ही.सी.डी. " ५०,००० संच (२ सी.डी. चा १ संच) तयार करणेसाठी अंदाजे दर रुपये २५/- प्रमाणे येणारे अंदाजे रुपये १२,५०,०००/- मात्र खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९.०८.२००६ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार "श्रीं साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार, व्ही.सी.डी. " ५०,००० संच (२ सी.डी. चा १ संच) तयार करणेकामी मुंबई येथील खालील ११ नामांकित सी.डी. निर्मात्यांना जा.न.एसएसएस/वशी/प्रकाशने/११३४२/०६ दि.२२.०८.२००६ अन्वये कोटेशन्स पाठविण्यात आली आहे. सदरचे कोटेशन्स भरून ते दि.०७.०९.२००६ अखेर दाखल करण्याविषयी कळविण्यात आले आहे.

| Sr.No | Name & Address | Sr.No. | Name & Address |
|---|---|---|---|
| 01 | A.C.M.Enterprises, Goregaon (E) Mumbai | 02 | San-Van Enterprises, Khar (W) Mumbai |
| 03 | Audio Vision, Mumbai | 04 | Krunal Music Company, Mumbai |
| 05 | Sony Music Entertainment (India) Pvt. Ltd. Vikhroli (E) Mumbai | 06 | Sagarika Acoustronics Pvt.Ltd, Navi Mumbai |
| 07 | Vandana Electronics, Mumbai | 08 | KRCD INDIA PVT LTD,MUMBAI |
| 09 | Aftab Electronics Pvt Ltd., Mumbai | 10 | Melei Media, Mumbai |
| 11 | Datacops Technologies, Pune | | |

विहीत मुदतीत खालील कोटेशन्ससादरकर्त्यांनी आपली कोटेशन्स सादर केलेली आहेत.

| Sr.No | Name & Address |
|---|---|
| 01 | Audio Vision, Mumbai |
| 02 | Vandana Electronics, Mumbai |
| 03 | Melei Media, Mumbai |
| 04 | KRCD INDIA PVT LTD,MUMBAI |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेपूढे समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| Sr.No | Name & Address | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर |
|---|---|---|
| 01 | Audio Vision, Mumbai | 23.87 |
| 02 | Vandana Electronics, Mumbai | 22.78 |

| | | |
|---|---|---|
| 03 | Melei Media, Mumbai | 23.40 |
| 04 | KRCD INDIA PVT LTD,MUMBAI | 24.98 |

यावर सविस्तर चर्चा होऊन मे.वंदना इलेक्ट्रॉनिक्स, मुंबई यांचे निम्नतम दराचे कोटेशन्स स्विकारणेत येऊन त्यांना श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी तयार करणेकामी आदेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही -प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२९. साईचरित्र तेलगू ऑडीओ सी.डी. तयार करणेकामाचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७०७.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०७.२००६ रोजीचे सभेतील विषय नं. १४ निर्णय क्र.४३० नुसार संस्थान प्रकाशित तेलगू साईचरित्राची ऑडिओ सी.डी. तेलगू भाषिक साईभक्तांना उपलब्ध करुन देणेकामी ऑडिओ सी.डी. ची मास्टर कॉपी तयार करणेसंबंधी व त्याकामी रु.३,७५,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली आहे

तेलगू साईचरित्राची ऑडीओ सी.डी ची मास्टर कॉपीचे निर्मितीसाठी हैद्राबाद येथील ५ सी.डी. निर्मात्या कंपन्यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/११५९०/२००६,दि.२८.०८.२००६ अन्वये कोटेशन्स पाठविण्यात येऊन ते दि.०७.०९.२००६ अखेर भरुन मुदतीत पाठविणेबाबत कळविण्यात आले होते. तदनुसार संबंधीत सी.डी. निर्मात्यां कंपन्याचे खालील तपशिलाप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेली आहे.

| अ.नं. | सी.डी. निर्मात्या कंपनीचे नाव |
|---|---|
| ०१ | श्री. पदम ऑडीओ लॅब, हैद्राबाद |
| ०२ | महती ऑडीओ लॅब, हैद्राबाद |
| ०३ | प्रसाद ऑडीओ लॅब प्रा.लि., हैद्राबाद |
| ०४ | सना यादी रेड्डी डिजिटल स्टुडिओ, हैद्राबाद |
| ०५ | -हीदम डिजीटल स्टुडिओ, हैद्राबाद |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | सी.डी. निर्मात्या कंपनीचे नाव | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर रुपये (प्रती संच रुपये ) |
|---|---|---|
| ०१ | श्री. पदम ऑडीओ लॅब, हैद्राबाद | ५,५०,०००.०० |
| ०२ | महती ऑडीओ लॅब, हैद्राबाद | ५,२५,०००.०० |
| ०३ | प्रसाद ऑडीओ लॅब प्रा.लि., हैद्राबाद | ६,२५,०००.०० |
| ०४ | सना यादी रेड्डी डिजिटल स्टुडिओ, हैद्राबाद | ५,७५,०००.०० |
| ०५ | -हीदम डिजीटल स्टुडिओ, हैद्राबाद | ५,७५,०००.०० |

वरील अ.नं.०१ ते ०५ या सि.डी निर्मात्यांपैकी अ.नं. ०२ चे महंत ऑडीओ लॅब, हैद्राबाद यांचे दर रुपये ५,२५,०००.०० निम्नतम आहेत. तथापि यापूर्वी दिनांक २१.०६.२००६ चे पत्रान्वये श्री एस.आर.कोटेश्वरराव, हैद्राबाद यांनी श्री साईसच्चरित तेलगू ऑडीओ सी.डी.ची मास्टर कॉपी निर्मितीसाठी रुपये ३,७५,०००.०० मात्र खर्च कळविलेला असल्याने सदरचा खर्च महती ऑडीओ लॅब, हैद्राबाद यांनी देऊ केलेल्या दरापेक्षा रुपये १,५०,०००.०० ने कमी आहे.

सबब श्री एस.कोटेश्वरराव,हैद्राबाद यांनी पूर्वी दिलेले दर मान्य करण्यात येऊन त्यांना श्री साईसच्चरित तेलगू ऑडीओ सी.डी.ची तयार करणेकामी आदेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३०. श्री साईबाबा दिनदर्शिका -२००६ (८ पेजेस मोठी साईज) बाबत**

**निर्णय क्र.७०८.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ रोजीचे आयत्या वेळेचा विषय नं.०७ निर्णय क्रमांक ४५६ नुसार मे.मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१०५८६/२००५ दि.२४.०९.२००५ अन्वये श्री साईबाबा दिनदर्शिका ८ पेजेस ( मोठया आकाराचे) २०,००० नगांची छपाई मंजूर दर प्रती नगास रूपये १५०/- प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.उपरोक्त पुरवठा आदेशानुसार १९४७५ नगांचा पुरवठा झालेला आहे.

दि. २७.१२.२००५ पासून ते ०७.०२.२००६ अखेर रुपये २५०/- प्रती नग प्रमाणे खालील तपशिलाप्रमाणे विक्री करण्यात आलेली आहे.

| मासिक विक्री | विक्री नग |
|---|---:|
| डिसेंबर २००५ | १०७७ |
| जानेवारी २००६ | ४५७० |
| ७ फेब्रुवारी २००६ पर्यंत | ३६६ |
| मुंबई कार्यालय विक्री नग | ११४ |
| मुंबई कार्यालय पोष्टाद्वारे | ५ |

| | |
|---|---|
| शिर्डी कार्या पोष्टाद्वारे विक्री | ०१ |
| एकूण विक्री नग - | **६१३३** |

वरीलप्रमाणे विक्रीचा खप पाहाता तो फारच कमी असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.४.२.२००६ रोजीचे सभेतील विषय नं.३७. निर्णय क्र.३७ नुसार सदर श्री साईबाबा दिनदर्शिकेची विक्रीची किंमत रु.२५०/- ऐवजी रु.१८०/- प्रती नग ठेवण्यास मान्यता मिळालेनुसार प्रकाशने विभाग जा.नं.एसएसएस/वशी/ प्रकाशने/ ३३९/२००६ दि.०७.०२.२००६ नुसार श्री साईबाबा दिनदर्शिका २००६ विक्री बाबत आदेश पारित करण्यात येऊन दि.०८.०२.२००६ पासून रु.१८०/- मात्रने विक्री सुरु करण्यात आली.

| मासिक विक्री | विक्री नग |
|---|---|
| ८ फेब्रुवारी २००६ पासून | १७०१ |
| मार्च २००६ | २१२८ |
| एप्रिल २००६ | १४५८ |
| मे २००६ | १०२६ |
| जून २००६ | १२२४ |
| जुलै २००६ | १०८३ |
| १८ ऑगस्ट २००६ पर्यंत | ६०१ |
| मुंबई कार्यालय विक्री नग | १०८ |
| मुंबई कार्यालय पोष्टाद्वारे | ६ |
| एकूण विक्री नग - | **९३३५** |

तरी संबंधीत दिनदर्शिका प्रेसधारक मे.मॅग्ना ग्राफिक्स इंडिया प्रा.लि., मुंबई यांनां त्यांचेकडून पुरवठा आदेशानुसार प्राप्त झालेले १९४७५ नग दिनदर्शिका छपाई प्रती नग दर रु.१५०/- प्रमाणे होणारी रक्कम रुपये २९,२१,२५०/- मात्र अदा करण्यात आली आहे. वरील दर्शविलेप्रमाणे दिनदर्शिकेची रुपये २५०/ प्रमाणे ६१३३ नगांची विक्री करुन रु.१५,३३,२५०/- मात्र व रु.१८०/- प्रती नग नुसार ९३३५ नगांची विक्री करुन रु.१६,८०,३००/- मात्र याप्रमाणे एकूण रक्कम रु.३२,१३,५५०/- मात्र वसुल झाली असून, यासाठी छपाईकामी झालेल्या खर्चाची रक्कम रु २९,२१,२५०/- मात्र पूर्णपणे वसुल होऊन उर्वरित रक्कम रुपये २,९२,३००/- मात्र अधिक रक्कम संस्थानला जमा झाली आहे. दि.१८.०८.२००६ अखेर एकूण ३,८७९ नग शिल्लक आहेत. त्यामुळे शिल्लक दिनदर्शिकेचा विक्रीचा खप वाढणेसाठी सदरचे दिनदर्शिकेची विक्रीची किमंत रु.१८०/- ऐवजी रु.१००/- मात्र ठेवणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच मे.मेग्ना ग्राफिक्स इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे दिनदर्शिका-२००७ छपाईकामी चर्चेसाठी आमंत्रित करण्यात यावे, असें ठरलें. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३१. श्रींचे समाधी मंदीरातील व्ही.आय.पी.कक्षातील श्रीसाईबाबांचे फोटोस चांदी फ्रेम बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.७०९.** समाधी मंदिरात श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवरांचे सत्कार करणेकामी लगत व्ही.आय.पी. कक्ष आहे. त्या ठिकाणी ४७.५ इंच x ३७.५ इंच या आकाराचा व्दारकामाई पोजचा फोटो (तैलचित्र) ठेवलेले आहे. त्यास चांदीची फ्रेम बसविलेली आहे. परंतू सदरची फ्रेम अत्यंत जुनी झालेली असून खराब झालेली आहे. महत्वाच्या व अति महत्वाच्या व्यक्ती दर्शनासाठी आलेनंतर त्यांचा व्ही.आय.पी कक्षात सत्कार केला जातो. सदरची फ्रेम बदलणे आवश्यक आहे.

साईभक्त श्री सुभाष आग्रवाल, अध्यक्ष अग्रवाल इंडोटेक्स लि.मुंबई यांनी दिनांक २९.५.२००६ रोजीचे पत्राव्दारे सदर फोटोची आकर्षक पध्दतीची चांदीची फ्रेम बनवून देण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. याकामी अंदाजे ६ किलो २०० ग्रॅम चांदी लागणार असून लागणारी चांदी व येणारी मजूरी ह्या सर्व खर्चास अंदाजे रुपये २ लाख खर्च अपेक्षित आहे व हा खर्च देणगीदाखल देण्याची त्यांनी तयारी दर्शविलेली आहे, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३२. मोबाईलव्दारे एस.एम.एस.सर्व्हिसेस व क्युऑस (टचस्क्रिन) साठी आलेल्या निविदांवर वाटाघाटीकरुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७१०.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१ एप्रिल, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१६ व निर्णय क्र.२१७ -नुसार श्री साईभक्तांना मोबाईलव्दारे एसएमएस सर्व्हिसेस उपलब्ध करुन देणे व श्री साईभक्तांना मंदिर परिसरात संस्थान व श्री बाबांविषयीची माहिती प्राप्त करुन देण्यासाठी दोन क्युऑस (टच स्क्रीन) खरेदी करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार विहित पध्दतीने सिलबंद प्रस्ताव व निविदा मागविणेसाठी दिनांक १९ मे, २००६ रोजी ०१. Indian Express (English), Mumbai & Pune Edition. ०२. महाराष्ट्र टाईम्स (मराठी) या नामांकित इंग्रजी व मराठी वर्तमान पत्रांमध्ये

जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. प्रस्ताव / निविदा सादर करण्याची अंतिम मुदत ०३ जून, २००६ अखेर देण्यात आली होती.

उपरोक्त जाहिरातीनुसार निविदाधारकांनी सिलबंद प्रस्ताव / निविदा दिनांक ०३ जून, २००६ अखेर सस्थांनला सादर केल्या आहेत. सदर निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १६ जुलै, २००६ रोजीचे सभेमध्ये उघडण्यात आलेल्या आहेत. त्यांचा तपशील पुढील प्रमाणे :

**अ) मोबाईलव्दारे एसएमएस सर्व्हिसेससाठी आलेल्या प्रस्तावांचा तपशील-**

| अ.नं. | प्रस्तावधारकांचे नांव व पत्ता |
|---|---|
| 01 | Value First Message Pvt. Ltd.,<br>Corporate Office- C-071 B, DLF Supermart-1 DLF City IV, Gurgaon- 122 002 |
| 02 | Mauj. Com,<br>People Infocom Pvt. Ltd.2 B(2) (ii) Grd. Floor, Filmcentre Bldg. 68 Tardeo Road, Mumbai-400 034. |
| 03 | Blow U' r Mind Production,<br>6 Pride Monarch, Jayabai Colony, Near Mehsobha Temple, Nashik Road, Nashik-452010. |

ब) क्युऑस ( टच स्क्रीन ) खरेदी करण्यासाठी आलेल्या निविदांचा तपशील पुढील प्रमाणे -

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता |
|---|---|
| 01 | E-ql Business Solutions Pvt Ltd.<br>Shree Apartment, "Samruddhi",Deepjyoti Colony, Survey no 1/24,<br>Near Vitthal Mandir, Karvenagar Pune- 52 |
| 02 | Pendulum Solutions Pvt. Ltd.<br>2, Vora Palace, M. G. Road, Kandivli, (West), Mumbai-400 067 |
| 03 | ITV COMPUTERS PVT Ltd.<br>3 Om Krishna Kunj, M.G. X Road No 3 Kandivli (West), Mumbai- 400067 |
| 04 | Jawahar B Lalla,<br>CMS Computers Ltd.Mumbai. |
| 05 | SINIC Electronics Pvt. Ltd.,<br>Regd. Office- 305, Arcadia Nariman Point,Mumbai-400 021. |

उपरोक्तप्रमाणे, मोबाईलव्दारे एसएमएस सर्व्हिसेस पुरविणेसाठी व क्युऑस (टच स्क्रिन) खरेदीसाठी आलेल्या निविदाधारकांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी पुढील प्रमाणे मोबाईल सुविधा पुरविण्याचे व त्यातील उत्पन्नाचा भाग संस्थानाला देण्याचे तसेच क्युऑस (टच स्क्रिन)साठी आलेल्या निविदाधारकांनी त्यांचे निम्नतम दर पुढील प्रमाणे देऊ केलेले आहेत.

**अ) मोबाईलव्दारे एसएमएस सर्व्हिसेससाठी आलेल्या प्रस्तावांचा तपशील-**

| अ.नं. | प्रस्ताव सादरकत्याचे नांव | प्रस्तावात देऊ केलेल्या सेवा व रक्कम | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेल्या सुविधा व दर |
|---|---|---|---|
| 01 | Value First Message Pvt. Ltd.,Gurgaon | Polyphonic Ring tone, wallpaper & video clips.- | Absent |
| 02 | Mauj. Com, Mumbai | SMs Prayers, SMS Puja Booking,GPRS Service, Video Rongtones, Applictions Ring tones, Videos, [Agreement: 3 Years].- Rs.50,000/-Non Refundable Fee, 50% of all Net Revenue | SMs Prayers, SMS Puja Booking,GPRS Service, Video Rongtones, Applictions Ring tones, Videos, [Agreement: 3 Years].- Rs.50,000/-Non Refundable Fee, 50% of all Net Revenue |
| 03 | Blow U' r Mind Production, Nashik Road, Nashik | SMs Prayers, SMS Puja Booking,GPRS Service, Video Rongtones, Applictions Ring tones, Videos,[Agreement: 15 Years].- Rs51,000/-Down Payment 51% of all Net Revenue | SMs Prayers, SMS Puja Booking,GPRS Service, Video Rongtones, Applictions Ring tones, Videos,[Agreement: 3 Years].- Rs1,00,000/- Non Refundable Fee, 51% of all Net Revenue |

**ब) क्युऑस ( टच स्क्रीन ) खरेदी करण्यासाठी आलेल्या निविदांचा तपशील पुढील प्रमाणे -**

| **अ.नं.** | **निविदासादरकर्त्याचे नांव, ब्रॅण्ड व तपशील** | **निविदेतील दर रुपये** | **चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर** |
|---|---|---|---|
| **01** | **E-ql Business Solutions Pvt Ltd.Pune**<br>**Brand-**E-ql Business Solutions.<br>**Perticular-**Touch Screen System Software & Hardware with 15"IRTouch Screen Monitor &Complete Intel Celeron M Processor 1.3Ghz, MB RAM, 40GB HDD,& Metal Kiosk {Warranty: Three Months} | 1,20,000xQty 2= 2,40,000 | 90,000xQty 2= 1,80,000 |

| | | | |
|---|---|---|---|
| 02 | **Pendulum Solutions Pvt. Ltd.,Mumbai**<br>**Brand-**Pendulum Soulutions.<br>**Perticular-**Intel PIV processro 1.7 GHz or higher, 512 MB RAM,15" TFT LCD Display, SAW Touch Screen, 52xCD-Rom,40GB HDD, 2xUSB 2.0, 1xRS 232, Headphone port, Windows XP {Warranty: One Year} | 91,000xQty 2= 1,82,000<br>Taxes Extra | 86,000xQty 2= 1,72,000 |
| 03 | **ITV COMPUTERS PVT Ltd., Mumbai**<br>**Brand-**IBM<br>**Perticular-**Celeron M Processro 320 1.3GHZ/15"IR Touch with Spill Proof Design,40GB HDD,512 MB RAM, Windows XP Professional, Wireless Network Interface Table or Wall Mount {Warranty: One Year} | 2,35,000xQty 2= 4,71,000<br>Taxes Extra | Absent |
| 04 | **Jawahar B Lalla,Mumbai.**<br>**Brand-**CMS<br>**Perticular-**Processor Via Eden 1 GHz CPU or equivalent,,512 MB RAM, Disply 15" diagonal, 30 GB HDD {<br>Warranty: Two Years} | 1,02,000xQty 2= 2,04,000<br>Taxes Extra | 95,000xQty 2= 1,90,000 |
| 05 | **SINIC Electronics Pvt. Ltd.,Mumbai**<br>**Brand-**SINIC<br>**Perticular-**Intel Celeron,M Processor, 1.3GHz,512 MB RAM, 40 GB HDD,15" IR Touch Spill Proof design. 2xUSB"x Rs 232, Headphone, Windows XP {Warranty: Two Years} | 95,000xQty 2= 1,90,000<br>InclusiveTax | 77,000xQty 2= 1,54,000 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मोबाईलव्दारे एसएमएस सर्व्हिसेस पुरविणेकरिता Blow U' r Mind Production, Nashik Road,Nashik यांचा प्रस्ताव स्विकारणेत येऊन त्यांच्या सोबत पाच वर्षाचा करार करण्यात यावा. त्याचप्रमाणे त्यांच्या सुविधा समाधानकारक असल्यास पाच वर्षानंतर त्यांचे पुढील पाच वर्षासाठी नुतनीकरण करण्यात यावे असे ठरले. तसेच क्युॲास (टच स्क्रीन) खरेदीसाठी SINIC Electronics Pvt. Ltd.,Mumbai यांची आलेल्या निविदामध्ये PIV processro, 17" IR Touch Spill Proof design तसेच तीन वर्षाची वॉरंटी अशी अधिक सुविधा त्यांनी देऊ करुन शिवाय त्यांची निविदा निम्नतम दरात असल्याने ती स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरले. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.३३. सुमो/टेम्पो ट्रॅव्हलर/रुग्णवाहिका, बस टायर खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.७११.** वाहन विभागात एमएच-१७/के-९३७१, या बसचा वापर भक्त निवासकडे साईभक्तांना ने-आण करणे करीता होत आहे. तसेच एमएच-१७/सी-८८५१ व एमएच-१७/के-९३७० या बसचा वापर इंग्लिश मिडीयमची मुले ने-आण करणे करीता होत आहे. तसेच एमएच-१७/के-६२८१ व एमएच-१७/के-६६०१ या रूग्णवाहिका हॉस्पिटलकडे वापरातआहे.

उपरोक्त पाच वाहनांची टायर्स खराब झालेली असल्याने नवीन खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वाहन क्रं. | वापर | टायर साईज | टायर नग |
|---|---|---|---|---|
| १ | एमएच-१७/ सी -८८५१ | स्कुलबस | ९-००-२०<br>टायर, टयुब, फ्लॅपसह | ०६ |
| २ | एमएच-१७/ के-९३७० | स्कुलबस | ९-००-२०<br>टायर, टयुब, फ्लॅपसह | ०४ |
| ३ | एमएच-१७/ के-९३७१ | भक्तनिवास बस | ९-००-२०<br>टायर, टयुब, फ्लॅपसह | ०४ |
| ४ | एमएच-१७/ के-६२८१ | सुमो रूग्णवाहिका | रेडियल-२१५-७५आर-१५<br>टायर, टयुबसह | ०५ |
| ५ | एमएच-१७/<br>के-६६०१ | टेम्पो ट्रॅव्हलर<br>रूग्णवाहिका | रेडियल-२१५-आर-१४<br>टायर, टयुबसह | ०५ |

वरील प्रमाणे पाच वाहनांकरिता २४ टायर्स खरेदी कामी रू.१,७०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

स्कुलबस, भक्तनिवास बस व सुमो रूग्णवाहिका करीता अपोलो कंपनीचे टायर्स व टेम्पो ट्रॅव्हलर करीता जे.के. कंपनीचे टायर्स एकूण २४ टायर्स, टयुब, फ्लॅपसह अधिकृत डिलर्स कडून कोटेशन मागवून खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१. डॉ.विजय नरोडे(इंन्टन्सीव्हीस्ट) व श्री नदीम अहमद (परफ्युजनिस्ट) श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.७१२.** डॉ.विजय शुक्लेश्वर नरोडे,यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१९१५/२००६दि.११/०२/२००६अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकीय अधिकारी,(इंन्टेन्सीव्हीस्ट)या पदावर प्रतिमहा रु.३०,०००/-(अक्षरी तीस हजार) मात्र एकत्रीत मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.ते दि.१८/०२/२००६ रोजी कामावर हजर झालेले असून सदरची मुदत दि.१७/०८/२००६ अखेर संपुष्टात आलेली आहे.

तसेच श्री मोहम्मद नदिम अहमद यांची, जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३३२/२००६ दि.३१/०१/२००६ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे परफ्युजनिस्ट,या पदावर प्रतिमहा रु.११,०००/-(अक्षरी अकरा हजार) मात्र एकत्रीत मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. ते दि.१०/०२/२००६ रोजी कामावर हजर झालेले असून सदरची मुदत दि.०९/०८/२००६ अखेर संपुष्टात आलेली आहे.

"उपरोक्त दोनही कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक असून त्यांची वरिष्ठांशी वर्तणूक चांगली आहे.तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.मा.सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधाचे मान्यतेच्या अधीन राहून डॉ.विजय नरोडे,वैद्यकीय अधिकारी (इंन्टेन्सीव्हीस्ट) यांना दि.१८/०८/२००६ पासून तसेच श्री मोहम्मद नदिम अहमद (परफ्युजनिस्ट) यांना दि.१०/०८/२००६ पासून पुढे एक वर्ष मुदतवाढ देण्यास हरकत नाही." असे अभिप्राय वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दिलेले आहेत.

वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता, मा.सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी/ अधिकारी यांचे पदनिहाय वेतनश्रेणी आकृतीबंधाचे मान्यतेच्या अधीन राहून डॉ.विजय नरोडे,वैद्यकीय अधिकारी (इंन्टेन्सीव्हीस्ट) यांना दि.१८/०८/२००६ पासून व श्री मोहम्मद नदिम अहमद (परफ्युजनिस्ट) यांना दि.१०/०८/२००६ पासून त्यांना यापूर्वी नेमणूकी संदर्भात देण्यात आलेल्या आदेशातील अटी-शर्ती कायम ठेवून आहे त्याच एकत्रित मानधनावर एक वर्ष मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०२.** **संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्ती होणे बाबत.**

**निर्णय क्र.७१३.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे कोपरगांव अहमदनगर व औरंगाबाद खंडपीठ येथे वेगवेगळया प्रकारची दिवाणी,फौजदारी,तसेच कामगार विषयक न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत. सदरचे कामी मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने खालील प्रमाणे ॲडव्होकेटस् च्या ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

**०१) <u>कोपरगांव कोर्ट :-</u>**सर्वश्री.ॲड.,पी.डी.गुजराथी, डी.डी.कुलकर्णी, डी.व्ही. वझे, जे.के.गोंदकर,रमेशचंद्र ठोळे, श्री. एस.एम.वाघ,राजेश नाईक,बाळासाहेब कोते,(विनामोबदला)

**०२) <u>अहमदनगर कोर्ट :-</u>** सर्वश्री.ॲड.अशोक पाटील, एन.जी.तांबोळी, ए.आर.गाडेकर,प्रसन्ना बिंगी,संजय सलालकर,अविनाश बोठे

**०३) <u>मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद ) :-</u>** सर्वश्री. ॲड. आर.एन.धोर्डे, अनिल बजाज, विनायक होन,राजेंद्र रघुवंशी,नितीन भवर, बाबासाहेब वाघ,संदीप गोंदकर,

**मुंबई हायकोर्ट :-** सर्वश्री ॲड.कुलदिप एस.पाटील,ॲड.विनोद शहा (करीया),मुंबई

तसचे यांचेबरोबरच ॲड.मिलींद पी.गुजराथी,कोपरगांव ॲड.संजीव डी.कुलकर्णी,कोपरगांव ॲड.प्रशांत बी.बावके,कोपरगांव ॲड.मच्छिंद्र एस.खिलारी,कोपरगांव यांचीही राहाता,श्रीरामपूर, कोपरगांव अहमदनगर व औरंगाबाद या ठिकाणी संस्थानविषयक कायदेशीर कामे पहाणेसाठी कायदेशीर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

आता,ॲड.अनिल डी.गमे,मु.पो.केलवड व ॲड.आर.के.वाघ,मु.पो.कोपरगांव यांनी वरिल प्रमाणेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संबंधात न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेबाबत विनंती केलेली असून ॲड.गमे यांचे अर्जावर,शिफारस मा.अध्यक्ष महोदय यांनी केली आहे.तसेच ॲड.वाघ यांचे अर्जावर मा.विश्वस्त कैलास बापु कोते सो.यांनी शिफारस केली आहे.तसेच तसेच ॲड.मिनाक्षी एस.जयस्वाल,ॲडव्होकेट,हायकोर्ट यांनीही संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेबाबत विनंती अर्ज केलेला असून सदरचा अर्ज कार्यासन नं.०२ (विधी अधिकारी) यांचे मार्फत प्राप्त झाला आहे.

तरी ॲड.अनिल डी.गमे,केलवड,ॲड.आर.के.वाघ,कोपरगांव व ॲड.मिनाक्षी एस.जयस्वाल,ठाणे यांच्याही वरिल प्रमाणेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संबंधीत न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०३. श्री विद्याधर ताठे, संपादक साईलीला यांचे मुदतवाढी बाबत.**

**निर्णय क्र.७१४.** श्री.विद्याधर ताठे, पत्रकार पुणे यांची जा.नं.एसएसएस/वशी-१/१५४९२/९५ दि.०४/१२/१९९५ चे नेमणूक आदेशान्वये श्री साईलिला द्वैमासिकाचे कार्यकारी संपादक या पदावर कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर प्रथमतः एक वर्षासाठी नेमणूक करण्यात आली होती.त्यानंतर त्यांच्या नेमणूकीची मुदतवाढ वेळोवेळी करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार श्री साईलीला संपादकीय कार्यालय मुंबई येथून शिरडी येथे स्थलांतरीत होत असल्याने व श्री साईलीला अंकाची छपाई मुंबई येथूनच होणार असल्याने सदर कामासाठी पुणे ते मुंबई येथे जाणे-येणेसाठी रेल्वेच्या प्रथम वर्गाचे पास खर्चासह आठवडयातून किमान दोन दिवस मुंबई येथे कार्यालयात काम करण्याचे व शिरडी ते पुणे जाणे-येणेचे लक्झरी बसचे (व्हाल्वो) प्रवास भाडेच्या खर्चासह आठवडयातील एक दिवस शिरडी येथे कार्यालयात काम करण्याचे अटीवर दरमहा रु.८,०००/- (रु. आठ हजार ) मात्र या सुधारित वित्तलब्धीवर श्री विद्याधर ताठे कार्यकारी संपादक श्री साईलीला यांच्या कॉन्ट्रॅक्ट पध्दतीच्या नेमणूकीची दि.०१/१०/२००५ पासून पूढे एक वर्षासाठी वाढविण्यात आलेली होती. सदरची मुदत दि. ३०/०९/२००६ अखेर संपुष्टात येत आहे.

सध्या श्री साईलीला मासिकाचे छपाईचे काम मुंबई येथूनच होत आहे. अद्यापपावेतो श्री साईलीला संपादकीय कार्यालय मुंबई येथून शिरडी स्थलांतरीत करणेबाबतची कार्यवाहीच्या दृष्टीने शिरडी येथील कार्यालयात सुविधा करण्यात आलेल्या आहेत. पैकी श्री साईलीला च्या जुलै-ऑगष्ट २००६ अंकाचे चालू असलेले पोस्टीग व श्री साईलीला अंकाचे पोस्टिंग शिरडी येथून करण्याकामी परवानगीसाठी श्रीरामपूर टपाल विभागाने मागणी केलेल्या बाबींची पूर्तता होऊन त्यांची परवानगी मिळताच त्वरीत शिरडीस स्थलांतर होऊन श्री साईलीलाच्या कामकाजास सुरुवात होईल असे श्री विद्याधर ताठे संपादक श्री साईलीला व संपादकीय कार्यालय कर्मचारी वृंद यांनी कळविले आहे.

श्री.विद्याधर ताठे यांच्या सेवेची संस्थानला आवश्यकता आसल्याने त्यांना यापूर्वी कंत्राटी पध्दतीचे नेमणूकी संदर्भात देण्यात आलेल्या आदेशास अनुसरुन श्री साईलीला अंकाची छपाई मुंबई येथूनच होणार असल्याने सदर कामासाठी पुणे ते मुंबई येथे जाणे-येणेसाठी रेल्वेच्या प्रथम वर्गाचे पास खर्चासह आठवडयातून किमान दोन दिवस मुंबई येथे कार्यालयात काम करण्याचे व शिरडी ते पुणे जाणे-येणेचे लक्झरी बसचे (व्हाल्वो) प्रवास भाडेच्या खर्चासह आठवडयातील एक दिवस शिरडी येथे कार्यालयात काम करण्याचे अटीवरदरमहा रु.८,०००/- (रु. आठ हजार ) मात्र या सुधारित वित्तलब्धीवर श्री विद्याधर ताठे कार्यकारी संपादक श्री साईलीला यांच्या कॉन्ट्रॅक्ट पध्दतीच्या नेमणूकीची मुदतवाढ दि.०१/१०/२००६ पासून पूढे एक वर्षासाठी वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०४. संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणे बाबत.**

**निर्णय क्र.७१५.** दरवर्षी संस्थान कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी एकूण वार्षिक वेतनाच्या एक बारांश (८.३३%)रक्कम "सानुग्रह अनुदान" म्हणून देण्यात येत असते. त्याप्रमाणे याही वर्षी संस्थान कर्मचाऱ्यांना खालील पद्धतीने येत्या दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान देण्यात यावे, असें ठरलें.

**०१.** संस्थान आस्थापनेवर मासिक वेतनावर नेमणूक झालेल्या शैक्षणिक विभाग,दोनही (श्री साईनाथ व श्री साईबाबा) रुग्णालयासह सर्व विभागांकडील मासिक वेतनावर/ मानधनावर सेवकांना दि.०१/१०/२००५ ते दि.३०/०९/२००६ या कालावधीत दिलेल्या एकूण वेतनाचे /मानधनाच्या एक बारांश (एकूण वेतन÷१२)

**०२.** कार्यकारी संपादक,व सह.कार्यकारी संपादक " साईलिला" (मराठी,इंग्रजी व हिंदी),यांना दि.०१/१०/२००५ ते दि.३०/०९/२००६ या कालावधीत दिलेले मानधन ÷ १२.

**०३.** संस्थान आस्थापनेवर दि.०१/१०/२००५ नंतर मासिक वेतनावर/ मानधनावर नेमणूक झालेल्या सेवकांना दि.३०/०९/२००६ अखेरच्या कालावधीत दिलेल्या एकूण वेतनाच्या/मानधनाच्या एक बारांश (एकूण वेतन÷ १२) **०४.** दि.३०/०९/२००६ पूर्वी संस्थान सेवेतून निवृत्त झालेले,राजीनामा देवून नोकरी सोडून गेलेल्या सेवकांना दि.०१/१०/२००५ अगर त्यानंतर प्रत्यक्ष नोकरीत असलेल्या तारखेपासून ते कामावर असलेल्या कालावधीत दिलेल्या वेतनाच्या एक बारांश (एकूण वेतन ÷ १२).(या प्रमाणात येणारी रक्कम)

**०५.** प्रतिनियुक्तीने तात्पुरत्या कालावधीसाठी संस्थानकडे नेमणूका झालेले शासनाकडील अधिकारी यांना देण्यात आलेल्या एकूण वेतनाच्या एक बारांश.

**०६.** दि.०१/१०/२००५ ते दि.३०/०९/२००६ या कालावधीत ज्या कर्मचाऱ्यांस गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन सेवेतून कमी केलेले आहे.अशा कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

वरीलप्रमाणे सानुग्रह अनुदान दिवाळीपूर्वी देण्याची प्रथा आहे. त्याप्रमाणे यावर्षी संस्थान कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान देण्यात यावे असे ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५. डॉ.राजन पटणी, मानद युरोलॉजिस्ट यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.७१६.** व्यवस्थापन मंडळाचे दि.२७-२८-२९ जुलै १९९९ चे सभेतील निर्णय क्र.३२४ नुसार डॉ.राजन पटणी यांची दि.०१/०१/२००० पासून दि.३१/०३/२००० अखेर तीन महिन्यांसाठी,मानद युरोलॉजीस्ट म्हणून तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली आहे.सदरची मुदत संपल्यानंतर त्यांची संस्थानकडील मानद सेवा वेळोवेळी वाढविण्यात आलेली आहे.

| अ.नं. | कालावधी | | प्रती व्हीजीट मानधन / एकूण वित्तलब्धी रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | दि.०१/०४/२००० ते दि.३०/०९/२००० | ०५ महिने | रु.२०००-०० |
| ०२. | दि.०१/१०/२००० ते दि.३०/०९/२००१ | ०१ वर्षे | रु.२०००-०० |
| ०३. | दि.०१/१०/२००१ ते दि.३०/०९/२००२ | ०१ वर्षे | रु.२०००-०० |
| ०४. | दि.०१/१०/२००२ ते दि.३०/०९/२००३ | ०१ वर्षे | रु.३०००-०० |
| ०५. | दि.०१/१०/२००३ ते दि.३०/०९/२००४ | ०१ वर्षे | रु.३०००-०० |
| ०६. | दि.०१/१०/२००४ ते दि.३०/०९/२००५ | ०१ वर्षे | रु.३०००-०० |

त्यापुढे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४३४ नुसार डॉ.पटणी यांचे मानद सेवेची वाढविण्यात आलेली मुदत दि.३०/०९/२००६ रोजी संपुष्टात येत आहे.

आता,डॉ.राजन पटणी,युरोलॉजीस्ट यांनी दि.१५/०७/२००६ रोजी पत्र सादर करुन,त्यांच्या मानद सेवेची मुदत पुढील एक वर्षासाठी वाढविण्याबाबत विनंती केलेली आहे.सदरचे पत्रावर वैद्यकीय अधिक्षिका यांनी,"डॉ.राजन पटणी हे युरोलॉजीस्ट असून सुपरस्पेशालिस्ट आहेत.त्यांची तज्ञ सेवा आपल्या रुग्णालयासाठी आवश्यक आहे.मागील वर्षभराच्या काळात बऱ्याच रुग्णांनी त्यांच्या सेवेचा लाभ घेतला असून सदर कालावधीत त्यांनी ६३ महत्वाच्या शस्त्रक्रिया केलेल्या आहेत.तरी डॉ.राजन पटणी,युरोलॉजीस्ट यांची सेवा त्याच शर्ती/अटींवर पुढे चालू ठेवून एक वर्षासाठी मुदतवाढ मिळावी." अशी शिफारस केलेली आहे.

वैद्यकीय अधिक्षिका श्री साईनाथ रुग्णालय यांचे अभिप्राय विचारा घेता,डॉ.राजन पटणी,यांचे मानद सेवेची मुदत दि.०१/१०/२००६ पासून पुढे एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०६. डॉ.के.एन.टिंगरे,वैद्यकीय संचालक यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.७१७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०७. दिनांक ०६.०९.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.७१८.** व्यवस्थापन समितीचे दिनांक ६.९.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१) <u>ब्लड गॅस ॲनालायझर केमीकल्स खरेदी बाबत</u>**

श्रीसाईबाबा रुग्णालयात प्रयोगशाळा विभागात रक्त लघवीच्या विविध तपासण्या करणेसाठी मे. रोश डायग्नोस्टीक लि. या कंपनीकडून रु. ६,७५,०००/- इतक्या किंमतीत ब्लड गॅस ॲनालायझर मशिन खरेदी करण्यात आलेले आहे. सदरचे मशिनवर तपासण्या करणेकामी त्यांचेच कंपनीचे केमीकल्स वापरावी लागतात. त्यासाठी मे. रोश डायग्नोस्टीक, मुंबई यांना दुरध्वनी करुन सदरचे केमीकल्सचे पुरवठा करणेबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यांनी मे. ट्रु व्हिजन डायग्नोस्टीक प्रा.लि., मुंबई हे त्यांचे अधिकृत विकेते यांचेकडून केमीकल्सचे कोटेशन पाठविले होते. त्यांनी पाठविलेल्या कोटेशनमधील दरानुसार दोन महिने पुरु शकतील इतक्या केमीकल्स खरेदीचा रु. ७७०२८.७५/- चा प्रस्ताव उपसमिती सभा दि. २४/०६/२००६ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

यावर चर्चा होऊन, सध्या वरीलप्रमाणे खरेदीस मान्यता देण्यात येत आहे. तथापी येथून पुढे सदर कंपनीस पत्र पाठवून त्यांचेकडून इतर अधिकृत विकेत्यांचे देखील दर मागविण्यात यावे, असे ठरले.

त्यानुसार मे. रोश डायग्नोस्टीक लि., मुंबई यांना इकडील पत्र क. ८४६१ दि. २९/०६/२००६ अन्वये त्यांचेकडून त्यांचे इतर अधिकृत विकेते यांचे पुर्ण पत्ते पाठविणेबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यांनी दि. २१/०७/२००६ च्या ई-मेल व्दारे मे. ट्रु व्हिजन डायग्नोस्टीक प्रा.लि., मुंबई हे आमचे एकमेव अधिकृत विकेते असल्याचे कळविले आहे. मे. ट्रु व्हिजन डायग्नोस्टीक प्रा.लि., मुंबई यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यांनी त्याप्रमाणे मालाचा पुरवठा देखील केलेला आहे. यापुर्वी आपण त्यांचेकडून उपसमिती व मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०७/२००६ निर्णय क्र. ४१८ (१) चे मान्यतेने केमीकल्स खालील दराने खरेदी केलेले आहेत.

| अ.नं. | केमीकल्सचे नाव | मागणी | दर प्रती नग | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | Calibration Solution C1 | १२ | १०४१५.०० | १२४९८०.०० |
| २ | Calibration Solution C2 | १२ | १०४१५.०० | १२४९८०.०० |
| ३ | Fluid Pack C3 | १६ | १३४०५.०० | २१४४८०.०० |
| | | | एकुण - | ४६४४४०.०० |
| | | | VAT १२.५% - | ५८०५५.०० |
| | | | एकुण रु. - | ५२२४९५.०० |

वरीलप्रमाणे केमीकल्स हि पुन्हा खरेदी करावयाची आहेत. कारण वरील केमीकल्सची वार्षीक औषधे खरेदीमध्ये मागणी केलेली होती परंतु सदर केमीकल्स खरेदीकामी कोणाचीही निविदा प्राप्त झालेली नाही. तेंव्हा एक वर्षाकरीता पुरु शकेल इतके केमीकल्स खरेदी करावयाचे आहे.

तरी सध्या वरीलप्रमाणे केमीकल्स मे. टू व्हिजन डायग्नोस्टीक प्रा.लि., मुंबई यांचेकडून खरेदी करण्यास व येणारा खर्च रु. ५,२२,४९५/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपसमितीचे सदस्यांनी दिनांक ११.०९.२००६ रोजी समक्ष पुणे येथे प्रत्यक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले होते. त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०२) सिरींज पंप खरेदी बाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता खरेदी करवयाचे एकुण २४ पंप बी.ब्रॉन लि,मुंबई या कपंनीकडून मागील मंजुर दराने खरेदीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०८.२००६ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. यावर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागनाथ गोंदकर यांनी सभेस अशी माहिती दिली की , Baxter कंपनीकडे सलाईन खरेदी केल्यास सिरिंज पंप मोफत देण्याची योजना आहे. या योजनेबाबत चौकशी करावी अशी योजना नसलेस वरील प्रमाणे २० सिंरिजपंप खरेदी करावे असे ठरले.

सदरचे पंप बाबत मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब Baxter कंपनीचे सिरिंज खराब असलेबाबत वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या दि.२५.०७.२००५ चे कात्रण फॅक्स करुन पाठविले आहे.

तेंव्हा सदरचे पंप खरेदी करणे संयुक्तीक होणार नाही असे मत आहे. तरी मे.बी.ब्रॉन ,मुंबई यांचेकडून २० पंप खरेदीस मान्यता असावी. सदरचे २० पंपापैकी १० पंप तातडीचे गरज असल्यामुळे पत्र क्र.१०७९३ दि.१२.०८.२००६ अन्वये खरेदी करण्यात आलेले आहेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उर्वरीत दहा पंप यावर खरेदीकामी उपसमितीचे सदस्यांनी दिनांक ११.०९.२००६ रोजी समक्ष पुणे येथे प्रत्यक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले होते. त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०३) डबल प्रेशर मॉनिटरींग किट खरेदी बाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयात बायपास शस्त्रक्रिया विभागासाठी उपरोक्त प्रेशर मॉनिटरींग किट मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ चे सभेतील निर्णय क्र.१२९ अन्वये २० नग मे.लाईफ केअर डिव्हाईसेस,मुंबई याचेंकडून इकडील पुरवठा आदेश क्र.४०३८ दि.२४.०३.२००६ अन्वये खरेदी करण्यात आले होते. सदरचे २० नगाचा साठा संपलेला असून पुन्हा त्याच मंजूर दराने ४० नग खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी मंजुर दर प्रती नग रु.१५००.१८ प्रमाणे सदरचे खरेदीकामी रु.६०,००७.२० येणार आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे डबल प्रेशर मॉनिटरींग किट मे.लाईफ केअर डिव्हाईसेस,मुंबई याचेंकडून खरेदी करण्यास व याकामी येणारा खर्च रु.६०,००७.२० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी रुग्णालयासाठी वर्षासाठी लागणारे मटेरिअल खरेदीकामी प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले होते. त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०४) बायोकेमिस्ट्री ॲटो ॲनालायझर मशिनकरीता क्युवेटस खरेदी बाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागात रक्त लघवीच्या तपासण्या मशिनवर ॲटोमॅटीक करणेसाठी आपण मे. ट्रिव्हीट्रॉन, मुंबई यांचेकडून बायोकेमीस्ट्री ॲटो ॲनालायझर मशिन घेतलेले आहे. सदर मशिन कंपनीने बसवून व्यवस्थित कार्यान्वित करुन दिलेले आहे. सध्या प्रयोगशाळा विभागाचे कामकाज चालु झालेले आहे. सदर मशिनवर सॅम्पल गोळा करुन ते तपासणी करणेसाठी मशिनमध्ये ठेवण्यात येते. त्यासाठी वरील क्युवेटस लागतात. ज्या कंपनीचे मशिन त्याच कंपनीच्या क्युवेटस वापराव्या लागतात.

तथापी दि.२४.०६.२००६ चे उपसमितीत झालेल्या चर्चेनुसार खरेदीपुर्वी किमान तीन कोटेशन मागवण्यात यावीत. त्यानुसार मे. ट्रिव्हीट्रॉन, मुंबई यांना दुरध्वनीकरुन त्यांचेकडून तसेच त्यांचे इतर दोन अधिकृत विक्रेते यांचेकडून दराबाबत चौकशी करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी त्यांचे अधिकृत विक्रेते मे.नोबेल डायग्नोस्टीक, मुंबई व सिध्दी मेडीकल डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचेकडून दर मागवण्यात आले होते. त्यांचे तुलनात्मक दर खालील प्रमाणे.

| अ.नं. | कंपनीचे नांव | मागणी संख्या | दर प्रती पॅक | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | मे. ट्रिव्हीट्रॉन, मुंबई | ३ Pkt ( १२००० Pices) | १६५७५.०० | ४९७२५.०० |
| २ | मे.नोबेल डायग्नोस्टीक ,मुंबई | ३ Pkt ( १२००० Pices) | १८०७६.५० | ५४२२९.५० |
| ३ | सिध्दी मेडीकल,औरंगाबाद | ३ Pkt ( १२००० Pices) | १९०००.०० | ५७०००.०० |

सदर क्युवेटसची वार्षीक औषधे खरेदीमध्ये मागणी केलेली आहे परंतु सदर क्युवेटस उपलब्ध होण्यास आणखी एक महिन्याचा कालावधी लागेल तेंव्हा ०३ पॅकेट क्युवेटस खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

वरील तुलनात्मक दरांचा विचार करता मे. ट्रिव्हीट्रॉन, मुंबई यांचे दर निम्नतम आहेत. तेंव्हा त्यांचेकडून (१२००० PCS चे) ०३ पॅकेट खरेदी करण्यास व याकामी येणा-या खर्च रु.४९,७२५/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०५) तातडीचे औषधे खरेदीस मंजूर मिळणे बाबत**

दि.१५.०५.२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटल कार्यान्वीत करण्यात आले असून रुग्णालयात अॅन्जीओग्राफी, ऑन्जीओप्लास्टी कार्डीयाक सर्जरीच्या शस्त्रक्रिया तसेच प्लॅस्टीक सर्जरी, जनरल सर्जरी जरनल ॲन्जीओग्रॉफी आन्जीओप्लास्टी कार्डीयाक वार्ड सुध्दा कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदर वार्ड मध्ये काही वार्ड नवीनच कार्यान्वीत करण्यात आल्याने सदर वार्ड मध्ये लागणारी औषधे सर्जीकल साहित्य, जी आपल्याकडे उपलब्ध नाहीत. ती आपणास नाशिक, मुंबई, कोपरगाव, संगमनेर, शिरडी आणि पुणे येथून उपलब्ध करावी लागली आहे. मा. व्यवस्थापन समीतीचे दिनांक ०३/०६/२००६ चे सभेत वैद्यकिय संचालक यांना दरमहा रुपये १,००,०००/- पर्यतचे औषधे / साहित्य खरेदीस मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरची खरेदी ही माहे जूलै २००६ या महिन्यातील असून ती वैद्यकिय संचालक यांना असलेल्या दरमहा रुपये १,००,०००/- चे तरतूदीतून केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Life Line Surgical, Kopargaon | 109 | 20.05.2006 | 1482 |
| 2 | Life Line Surgical, Kopargaon | 209 | 22.06.2006 | 1496 |
| 3 | Life Line Surgical, Kopargaon | 195 | 14.06.2006 | 1964 |
| 4 | Life Line Surgical, Kopargaon | 327 | 29.07.2006 | 900 |
| 5 | Life Line Surgical,Kopargaon | 312 | 24.07.2006 | 5374 |
| 6 | Life Line Surgical, Kopargaon | 215 | 28.06.2006 | 832 |
| 7 | Life Line Surgical, Kopargaon | 316 | 25.07.2006 | 5520 |
| 8 | Life Line Surgical, Kopargaon | 323 | 27.07.2006 | 333 |
| 9 | Life Line Surgical, Kopargaon | 262 | 04.07.2006 | 718 |
| 10 | Life Line Surgical, Kopargaon | 313 | 24.07.2006 | 7214 |
| 11 | Life Line Surgical, Kopargaon | 309 | 22.07.2006 | 4594 |
| 12 | Surya Surgical, Nashik | 209 | 28.06.2006 | 2160 |
| 13 | Surya Surgical, Nashik | 155 | 01.06.2006 | 5572 |
| 14 | J. S. P. Surgical, Nashik | 7669 | 01.08.2006 | 1320 |
| 15 | J. S. P. Surgical, Nashik | 7666 | 26.07.2006 | 1260 |
| 16 | J. S. P. Surgical, Nashik | 7661 | 22.07.2006 | 1020 |
| 17 | J. S. P. Surgical, Nashik | 7655 | 15.07.2006 | 6228 |
| 18 | Alpha Enterprises, Mumbai | 2051/06 | 18.08.2006 | 6097 |
| 19 | Nirmal Agenies, Ahmednagar | 4035 | 26.07.2006 | 2220 |
| 20 | Bafna Medico, Sangamner | 162041 | 12.07.2006 | 3457 |
| 21 | Universal Chemicals, Nashik | 5185 | 14.07.2006 | 850 |
| 22 | Universal Chemicals, Nashik | 5316 | 21.07.2006 | 2852 |
| 23 | Universal Chemicals, Nashik | 5292 | 20.07.2006 | 961 |
| 24 | Universal Chemicals, Nashik | 4797 | 17.06.2006 | 5373 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 25 | The Parel Chemists, Mumbai | 982461 | 07.07.2006 | 2459 |
| 26 | Kundan Surgical, Ahmednagar | 5504 | 02.07.2006 | 1320 |
| 27 | Uma Surgical, Mumbai | 921 | 04.07.2006 | 596 |
| 28 | The Parel Chemists, Mumbai | 993722 | 24.07.2006 | 352.50 |
| 29 | Devi Surgical, Ahmednagar | 31 | 08.07.2006 | 1465 |
| 30 | Universal Chemicals, Nashik | 5179 | 13.07.2006 | 745 |
| 31 | The Parel Chemists, Mumbai | 993709 | 24.07.2006 | 352 |
| 32 | Pharmacea Link, Pune | 6061 | 29.07.2006 | 3204 |
| 33 | Cosmos Enterprise, Mumbai | 147 | 12.07.2006 | 832 |
| 34 | Vijay Medical Stores, Shirdi | 14998 | 26.07.2006 | 105 |
| 35 | Vijay Medical Stores, Shirdi | 15016 | 31.07.2006 | 360 |
| 36 | Vijay Medical Stores, Shirdi | 15012 | 29.07.2006 | 1250 |
| 37 | Vijay Medical Stores, Shirdi | 14987 | 25.07.2006 | 900 |
| 38 | Vijay Medical Stores, Shirdi | 14907 | 30.06.2006 | 102 |
| 39 | Vijay Medical Stores, Shirdi | 14911 | 03.07.2006 | 900 |
| 40 | Vijay Medical Stores, Shirdi | 14993 | 25.07.2006 | 415 |
| 41 | Vijay Medical Stores, Shirdi | 14977 | 22.05.2006 | 150 |
| 42 | Vijay Medical Stores, Shirdi | 14970 | 20.07.2006 | 288 |
| 43 | Kanchan Durgs, Pune | 3352 | 04.07.2006 | 12279 |
| 44 | Bombay Surgical, Mumbai | 41 | 25.05.2006 | 1350 |
| | | | **Total Amt.** | **99221.50** |

तरी उपरोक्त प्रमाणे रक्कम रु.९९,२२१.५० (रु.नव्यान्नव हजार दोनशे एकविस आणि पन्नास पैसे मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०६) श्री साईबाबा मंदिर परीसराचे संरक्षणासाठी मोर्चा चौकी तयार करुन देणेसाठी आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.**

मा.पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांनी दि.०२-०६-२००६ चे पत्रान्वये जागतिक किर्तीचे तीर्थक्षेत्र श्री साई मंदीराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्वांनी सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे, याबाबत कळविले होते.

त्यानुसार दिनांक ०७-०६-२००६ रोजी मंदीर परिसरात राऊंड घेतला असता सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व मेन गेटवर पूर्वीच्या एका मोर्चा चौकीप्रमाणे आणखी नविन तीन मोर्चा चौकी तातडीने तयार करुन ठेवणे आवश्यक असल्याचे निर्देशनास आले. या नविन तीन मोर्चा चौकीसाठी लागणारा राऊंड पाईप १`` व ३/४ `` शिल्लक होता, परंतू खालील मटेरीअल शिल्लक नव्हते व ते तातडीने खरेदी करणे गरजेचे होते.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी |
|---|---|---|
| ०१) | एम.एस.फ्लॅट पट्टी,साईज- २५ x २५ x ५ एम.एम. | २०० किलो. |
| ०२) | एम.एस.फ्लॅट पट्टी,साईज- ४० x ४० x ८ एम.एम. | १०० किलो. |
| ०३) | एम. एस. स्क्वेअर बार.,साईज :- १० एम.एम | १५० किलो. |
| ०४) | एम.एस.अँगल,साईज- ५० x ५० x ५ एम.एम. | ८०० किलो. |
| ०५) | एशियन मेक, ऑईलपेंट,पांढरा कलर | ०२० लिटर |
| ०६) | एशियन मेक, ऑईलपेंट,काळा कलर, | ०२० लिटर |
| ०७) | पेंटींग ब्रश, साईज- १`` | ०१५ नग. |
| ०८) | पेंटींग ब्रश, साईज- १.१/२`` | ०२० नग. |
| ०९) | पेंटींग ब्रश, साईज- २`` | ०२० नग. |

उपरोक्तप्रमाणे तात्काळ नविन तीन मोर्चा चौकी तयार करून देणे असल्याने सदर मटेरीअल खरेदीकामी स्थानिक दुकानदारांकडून कोटेशन मागविणेत आले होते. त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | तपशील | मे.भन्साळी मोटर्स, साकुरी -राहाता. | मे.कृष्णा ट्रेडर्स, साकुरी-राहाता. | मे.माहेश्वरी स्टील ट्रेडर्स, बाभळेश्वर | मे.के.जे. स्टील, कोपरगांव | मे.यशोदा ट्रेडर्स, साकुरी-राहाता. | मागणी | दर रु. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस. फ्लॅट पट्टी, साईज-२५ x२५x५ एम.एम. | २८.७० | २९.०० | २९.०० | २९.५० | २९.५० | २०० किलो. | २८.७० | . ५,७४०.०० |
| ०२) | एम.एस. फ्लॅट पट्टी,साईज-४० x ४० x ८ एम.एम. | ३०.५० | ३१.०० | ३१.०० | ३१.५० | ३२.०० | १०० किलो. | ३०.५० | ३,०५०.०० |
| ०३) | एम. एस. चौरस स्क्वेअर बार., | २८.६० | २९.५० | २९.०० | २९.५० | ३०.०० | १५० किलो. | २८.६० | ४,२९०.०० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साईज-१०एम.एम | | | | | | | | |
| ०४) | एम.एस.अँगल, साईज- ५० x ५० x ५ एम.एम. | २७.८० | २८.२० | २८.०० | २९.०० | २९.०० | ८०० किलो. | २७.८० | २२,२४०.०० |
| ०५) | एशियन मेक, ऑईलपेंट, पांढरा कलर | १००.०० | १०४.०० | १०७.५० | ११०.०० | १०५.०० | ०२० लिटर | १००.०० | २,०००.०० |
| ०६) | एशियन मेक , ऑईलपेंट, काळा कलर, | १४२.५० | १४७.५० | १४७.५० | १४७.५० | १४७.५० | ०२० लिटर | १४२.५० | २,२५०.०० |
| ०७) | पेंटींग ब्रश, साईज- १`` | २०.०० | २१.०० | ३५.०० | ३७.०० | २२.०० | ०१५ नग. | २०.०० | ३००.०० |
| ०८) | पेंटींग ब्रश, साईज- १.१/२`` | २५.०० | २८.०० | ३५.०० | ३७.०० | २६.०० | ०२० नग. | २५.०० | ५००.०० |
| ०९) | पेंटींग ब्रश, साईज- २`` | ३०.०० | ३२.०० | ३५.०० | ३७.०० | ३१.०० | ०२० नग. | ३०.०० | ६००.०० |
| | | | | | | | | | ४१,५७०.०० |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मे.भनसाळी मोटर्स, साकुरी-राहाता यांचे दर कमी होते. त्यामुळे त्यांना कार्यादेश येऊन त्यांचेकडून मटेरीअल त्वरीत मागवून नविन तीन मोर्चा चौकी तयार करून देण्यात आलेल्या आहेत. तरी उपरोक्तप्रमाणे नविन तीन मोर्चा चौकी तयार करून देणेसाठी आलेल्या रु. ४१,५७०.०० इतक्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख )

**०७) श्री साईबाबा मंदिर परीसराचे सुरक्षेसाठी व्हेईकल बॅरीकेटस तयार करुन देणेसाठी आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.**

श्री साईबाबा मंदिर सुरक्षिततेच्या दृष्टीने मा.पोलीस अधिक्षक श्री. रामानंद सा़ो, अहमदनगर यांनी दिनांक १३-०६-२००६ रोजी मंदिर परिसराची पाहणी करून सुरक्षिततेच्या संदर्भात मिटींग घेतली असता मिटींगमध्ये त्यांनी, मंदिर परीसराचे चारही बाजूने कुठल्याही प्रकारचे वाहन येणार नाही अशी व्यवस्था करावी व त्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी लोखंडी बॅरीकेटस तयार करून तसेच लोखंडी पोल बसवावेत अशी सूचना केली, व शिर्डी पोलीस स्टेशनने दिनांक १९-०६-२००६ रोजी पत्र देऊन त्यामध्ये श्री साईबाबा मंदिर सुरक्षिततेच्या दृष्टीने तात्पुरते स्वरुपात अडथळे उभारण्याकरीता मा.पोलीस अधिक्षक साहेब, अहमदनगर यांचेकडून मु.पो.अधि.१९५१ चे कलम ३४ अन्वये अधिकार प्राप्त झालेले असून खालील ठिकाणी तात्काळ बॅरीकेटींग लावणेबाबत कळविले होते.

०१). मंदिराचे पश्चिमेकडील भिंतीलगत १० फूट अंतरापर्यंत नगर-मनमाड रोडवर बॅरीकेटींग लावणे

०२). पिंपळवाडी चौक ते हॉटेल कल्पतरु पर्यंत मंदिराचे उत्तर बाजूचे कम्पाऊंड भिंतीलगत ५ फूट अंतरावर बॅरीकेटींग लावणे.

०३). दक्षिण महाव्दारासमोर, छोटे गुरुस्थान गेटसमोर व चावडी, व्दारकामाई समोर बॅरीकेटींग लावणे.

०४). शांतीनिवास भक्तनिवासचे कोप-यावर मारुती मार्केटकडे जाणारे रोडवर बॅरीकेटींग लावणे.

उपरोक्तप्रमाणे तात्काळ व्हेईकल बॅरेकेटींग करुन मिळणेकामी शिर्डी पोलीस स्टेशनने दिनांक १९-०६-२००६ चे पत्रान्वये कळविले होते. व्हेईकल बॅरीकेटस् तयार करणेकामी पुढीलप्रमाणे मटेरीअलची आवश्यकता होती.

| अ.क्र. | तपशील | मागणी |
|---|---|---|
| ०१) | जी.आय.राऊंड पाईप, `सी ` क्लास साईज- ५० एमएम | ४६० फूट. |
| ०२) | एम.एस.साखळी, साईज- ८ एम.एम. | २५० किलो. |

उपरोक्तप्रमाणे तात्काळ व्हेईकल बॅरेकेटींग तयार करून देणे असल्याने सदर मटेरीअल खरेदीकामी त्वरीत दुकानदारांकडून कोटेशन मागविणेत आले होते. त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | तपशील | मे.भनसाळी मोटर्स, साकुरी - राहाता. | मे.गंगाधर पांडूरंग मोकळ, नांदगांव | मे.न्यु कॉन्टीनेन्टल ट्रेडर्स, मुंबई | मागणी | दर (प्रति नग) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१) | जी.आय.राऊंड पाईप, प्रकाश- सुर्या / झेनिथ मेक `सी ` क्लास साईज- ५० एम.एम. | रु. ०९९.०० | रु. १०२.२५ | रु. १०३.०० | ४६० फूट. | रु. ९९.०० प्रती फूट | रु. ४५,५४०.०० |
| ०२ | एम.एस.साखळी साईज-८ एम.एम. | रु. ०६०.०० | रु. ०४५.०० | रु. ११५.०० | २५० किलो. | रु. ४५.०० प्रती किलो | रु. ११,२५०.०० |
| | | | | | | एकुण रुपये | रु. ५६,७९०.०० |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र. ०१ करीता मे.भनसाळी मोटर्स, साकुरी-राहाता यांचे व अ.क्र. ०२ च्या आयटेमकरीता मे. गंगाधर मोकळ, नांदगांव, जि. नासिक यांचे दर कमी होते. त्यामुळे त्यांना कार्यादेश देण्यात येऊन त्यांचेकडून मटेरीअल त्वरीत मागवून व्हेईकल बॅरेकेटींग तयार करून लावून देण्यात आलेले आहेत. तरी उपरोक्तप्रमाणे व्हेईकल बॅरेकेटींग तयार करून देणेसाठी आलेल्या रु. ५६,९७०.०० इतक्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**०८) संस्थान वाहनांची लिलावाने विक्री करणे बाबत.**

संस्थान वाहनांची जाहीर लिलावाने दि.१२/०८/२००६ रोजी विक्री करणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात देण्यात आलेली होती, तथापी पूरपरिस्थितीमुळे दि.१२/०८/२००६ रोजी होणारा सदरचा लिलाव रद्द करण्यात आला व त्याप्रमाणे वर्तमानपत्रात जाहीरात पण देण्यात आली होती.

सदरचा लिलाव दिनांक १७.०९..२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता शिर्डी येथे आयोजित करण्यात यावा याकामी खालील वाहनांचा जाहिर लिलाव होणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

| अ.नं. | वाहनांचा तपशिल |
|---|---|
| ०१. | ॲम्बेसॅडर ए.सी. (पायोनियर कं.टेपसह) नं.एम.एच.१७/एफ-५०१ |
| ०२ | ॲम्बेसॅडर ए.सी. (पायोनियर कं.टेपसह) नं.एम.एच.१७/एच-७०१ |
| ०३. | टाटा सुमो (कार टेपसह) नं एम.एच१७/सी-३५३६ |
| ०४. | टाटा ४०७ शववाहीनी नं एम.एच१७/सी-६७६९ |
| ०५. | बजाज मिनीडोअर मालवाहतूक नं. एमएच१७/सी-७०७८ |
| ०६. | बजाज मिनीडोअर मालवाहतूक नं. एमएच१७/सी-७०७९ |
| ०७. | ४०७ टेम्पो कचरावाहतूक नं. एमएच१७/सी-५१०० |
| ०८. | सुपर ट्रेलर नं. एमएच१७/एफ-३४३५ |
| ०९. | बोस्टील ट्रेलर नं. एमएच१७/एफ-३४३४ |

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**०९) स्क्रॅप अनावश्यक वस्तूंची जाहीर लिलावाने विक्री करणेसासठी अशा वस्तूची अपेक्षित किंमत निश्चित करणेकामी तारीख निश्चित करणे बाबत.**

व्यवस्थापन समितीच्या दि.२७/१२/२००४ च्या सभेत "संस्थानचे विविध विभागातून दप्तर विभागाकडे जमा झालेल्या निरुपयोगी वस्तूंची जाहीर लिलावाने विक्री करणेकामी प्रस्तावीत केलेप्रमाणे वस्तूचे वेगवेगळे लॉट करुन मा. विश्वस्त समिती सदस्य व अधिकारी समिती यांचेकडून अपेक्षित विक्री किंमत निश्चित करण्यात यावी. त्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, मान्यतेनंतर प्रशासनाने निश्चित तारीख निश्चित करुन लिलावाबाबत वर्तमान पत्रात जाहीरात देण्यात यावी. लिलावात उपस्थित राहणेबाबत सर्व विश्वस्तांना कळविण्यात यावे." असा निर्णय क्रं.१६१ झालेला आहे.

व्यवस्थापन समितीच्या दि.२७/१२/२००४ च्या सभेत "मागणी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक संस्थांना संस्थानकडील निरुपयोगी वस्तू उपलब्ध असलेल्या वस्तू देणगी रुपाने देण्यात याव्यात व याकामी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील कलम नं.१७(४) नुसार शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी" असा निर्णय क्रं.१६० झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

१) निर्णय क्रं.१६१ नुसार अपेक्षीत राखीव किंमत निश्चित करणेकामी स्थानिक विश्वस्त समिती सदस्य व अधिकारी यांची समिती घोषीत करणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-दप्तर/५०४/ १४१८ /०५ दि.०२/०५/२००५ नुसार कार्यालयीन आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

२) जा.नं.एसएसएस/वशी-दप्तर/१६१३/०५दि.१४/२/२००५ नुसार अ)लिलावासाठी जमा झालेल्या निरुपयोगी साहित्यापैकी वस्तू परिसरातील शैक्षणिक व सामाजिक संस्थांना देणगी देणेस.

ब) जून-२००३ नंतर जमा झालेल्या विविध निरुपयोगी / टाकाऊ साहित्य जाहीर लिलावाने विक्री करणेस मान्यता मिळणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला.

त्यावर जा.क्रं.सासंवि-२००५/३८९/(११६)/सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि.०३/०१/२००६ नुसार "संस्थानकडे सन २००४-०५ या वर्षात जमा असलेल्या पत्रा सोबतच्या विवरण पत्रात नमूद केलेल्या (मौल्यवान नसलेल्या) वस्तू संस्थानची विहीत कार्यपध्दती तसेच या पत्रा सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेली कार्यपध्दती यांचा योग्य मिलाफ घालून पूर्व सूचना घेऊन जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्यास" शासनाने मान्यता दिलेली आहे.

लिलावासाठी जमा झालेल्या निरुपयोगी साहित्यापैकी काही वस्तू परिसरातील शैक्षणिक/ सामाजिक संस्थांना वस्तूरुप देणगी देणेबाबत शासनाने काहीही कळविले नाही. सबब याकामी वेगळया काढून ठेवलेल्या वस्तूही लिलावात विक्री करणेस मान्यता मिळावी.

मौल्यवान नसलेल्या वस्तूंची लिलावाने विक्री करण्यास शासनाची मान्यता मिळालेली आहे. २८ इलेक्ट्रीक गिझर्सची आवश्यकता नसलेने संबंधीत विभागाने त्यांची लिलावाने विक्री करणेकामी दप्तर विभागास दिलेले आहेत. त्याची सुरुवातीची एकूण किंमत रु.२३४२८७२.००/- असून घसारा वजा जाता रु.५,८६,७०४.००/- इतकी रक्कम सध्या होत आहे. त्याची विक्री करावी लागेल अन्यथा कालांतराने ते आणखी खराब होऊन संस्थानचे आर्थिक नुकसान होईल, सबब त्यांचीही लिलावाने विक्री करावी लागेल. तसेच सन १९९७-९८ मध्ये शांती निवास, भक्तनिवास इमारतीचे व रुग्णालय इमारतीचे नुतनीकरणाच्या वेळेचे बांधकाम विभागाकडील सागवानी दरवाजे, खिडक्या, व्हेन्टीलेटर इ. वेळोवेळी जमा झालेले मटेरियलचा यापूर्वी झालेल्या १) दि.०४/०३/१९९९ २) ०७/१२/१९९९ ३)दि.०३/०६/२००३ चे लिलावात सदर लॉटची अपेक्षीत किंमत न आल्याने ३ वेळेस सदर लॉटचा लिलाव रद्द करण्यात आला होता. दि.१२-१३/०७/२००३ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील "दरवाजा/खिडक्या, व्हेन्टीलेटर इ. साहित्याची अपेक्षीत किमान किंमत रुपये ५,००,०००/- एवढी निश्चित करुन त्याचा फेर लिलाव करण्यात यावा" असा निर्णय क्रं.२७५ झालेला आहे. सदर साहित्य ८ ते ९ वर्षापासून उघडयावर गौरीशेड परिसरात पडून आहे. आजपावेतो ऊन, वारा, पाऊस यामुळे बरेच नुकसान झालेले आहे. कालांतराने ते आणखी खराब होऊन संस्थानचे आर्थिक नुकसान होईल, सबब त्यांचीही लिलावात तडजोड करुन विक्री करावी लागेल.

शासनाची मंजूरी मिळेपावेतोच्या दरम्यान लिलावाच्या यादीतील काही वस्तू संस्थानचे विभागांचे वापरासाठी देण्यात आलेल्या आहेत. टयूब/टायर, प्लॅस्टिकच्या वस्तू कोटेशनच्या उच्चतम दराने विक्री करण्यात आलेल्या आहेत. तसेच रुग्णालयातील रुग्णांच्या रक्ताळलेल्या गाद्या जाळून नष्ट करण्यात आलेल्या आहेत. लिलाव यादीतील उपरोक्त वस्तू वगळता उर्वरीत वस्तूंचे लॉट तयार करुन त्याची विक्रीकामी यादी तयार करण्यात आलेली आहे.

अपेक्षीत विक्री किंमत ठरविणेकामी लेखाशाखेकडून वस्तूंची रिटर्न डाऊन व्हॅल्यूची माहिती घेण्यात आलेली आहे. बांधकाम विभागाकडून सध्याच्या परिस्थितीत उपलब्ध असलेल्या लाकडी चौकटी, खिडक्या, दरवाज्याचे व्हॅन्टीलेटर याची माहिती घेण्यात आलेली आहे. तांबे, पितळ, अल्यूमिनीयम, लोखंडी भगांर, कापडी वस्तू वगैरेचे कोटेशनचे वार्षिक उच्चतम दर विचारात घेता येतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचे दिनांक २९.१.२००५ चे सभेतील निर्णय क्र.२(३) अन्वये ठरलेनुसार उपरोक्त स्क्रॅपचे लॉट तयार करुन त्याचे प्रकार, शक्य असेल तेथे वजन त्याची घसारा वजा जाता किंमत सध्याचे स्क्रॅपचे बाजार भाव या बाबी विचारात घेता डेडस्टॉक वस्तू व इतर स्क्रॅप मटेरियल वस्तूंची जाहीर लिलावाने विक्री करणेकामी लॉटच्या अपेक्षित विक्री किंमत निश्चित करणेसाठी गठीत करण्यात आलेल्या समितीकडून दि.१७.९.२००६ रोजी अपेक्षित विक्री किंमत निश्चित करण्यात यावी. तसेच मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व त्यानंतर स्क्रॅप मालाचे लिलावाची तारीख निश्चित करण्यात येईल, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, दप्तर विभाग)

**१०) <u>श्रीमती सुंदरबाई उध्दव शिंदे, रा.कुकाणा यांचे वैद्यकीय बिलात सवलत मिळणेबाबत.</u>**

श्रीमती सुंदरबाई उध्दव शिंदे रा.कुकाणा यांनी मा.विश्वस्त श्री पांडुरग गमाजी अभंग यांचे शिफारसींनुसार एकूण होणारे वैद्यकीय बिल रुपये १५,०००.०० पैकी रुपये ४,०००.०० भरुन उर्वरित बिल माफ करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

श्री शिंदे हे बी.पी.एल. कार्डधारक आहेत. परंतू त्यामध्ये पेशंटचे नांव आहे त्यावर नावाचा कागद चिकटवलेला आहे. तरी पेशंटने तहसिलदार नेवासा यांचेकडून बी.पी.एल कार्डधारकावर पेशंटचे नांव असलेबाबतचा दाखला आणावा असे मा.प्रशासकीय अधिकारी यांनी आदेश दिलेले आहे. परंतू श्री शिंदे यांनी तहसिलदार नेवासा यांचेकडे दाखल्याची मागणी केली असता सदर दाखला तातडीने मिळणे शक्य नसल्याचे तोंडी सांगितले आहे.

तरी रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णाला डिसचार्ज देण्यात येऊन कागदपत्राची पूर्तता करुन घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीयअधिक्षीका)

**११) <u>लांबचे प्रवासा करीता एकाच वाहनांवर दोन कायम वाहन चालकांचे अतिकालीक भत्ता बाबत...</u>**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीतर्फे साईनाथ रूग्णालयात उपचार घेणाऱ्या गरीब व गरजु रूग्णांकरीता ना नफा ना तोटा या तत्वावर रूग्णवाहीकांचा वापर होत आहे.

आपल्या हॉस्पिटलच्या रूग्णवाहिका व शववाहिका बऱ्याच वेळा परराज्यात (आंध्रपदेश, राजस्थान, गुजरात, कर्नाटक, दिल्ली इ.) ठिकाणी नेहमी जात असतात. प्रवास रात्री अपरात्री करावा लागतो. त्यामुळे संरक्षणाची हमी नसते. वाहनांला अपघात झाल्यास अथवा बिघाड झाल्यास भाषेची व इतर अनेक अडचणी निर्माण होतात. या बाबत रूग्णवाहिका महाराष्ट्र राज्याबाहेर पाठविण्यात येऊ नये या बाबतचा प्रस्ताव दि.०५/११/२००५ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता. त्या वर चर्चा होऊन निर्णय क्रं.६८१-ब ने सध्या असलेल्या रुग्णवाहिकेच्या वापराबाबत कोणता ही बदल करण्यात येऊ नये असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५चे सभेतील निर्णय क्रं.४३१ अन्वये प्रशासन शाखा जा.नं. एसएसएस/वशी-०१/१२४७/ दि.०९/०५/२००६ने महाराष्ट्र शासन जी.आर. क्रं. दि.२९/०३/, २६/०७/, ०९/११/१९९५ व दि.१६/०८/२००४ नुसार कायम वाहनचालकांना अतिकालीक भत्ता प्रति तास रू.२०/- प्रमाणे देण्यात यावा असा आदेश पारित झालेला आहे.

परंतु, लांब पल्याच्या अंतराला एकाच रूग्णवाहिका/शववाहिका वर दोन कायम वाहनचालक किंवा एक कायम व एक रोजंदारी पाठावावे लागतात. शासनाच्या जी.आर. मध्ये लांबचे प्रवासात दोन वाहनचालक पाठविल्यास दोन्ही वाहनचालकांना अतिकालीक भत्ता देण्यात यावा या बाबत कोठे ही उल्लेख नसलेने एकाच वाहनांवर लांबचे प्रवासा करीता पाठविण्यात आलेल्या दोन कायम वाहन चालकांना अतिकालीक भत्ता देण्यास अडचण निर्माण होत आहे.

तरी लांबचे प्रवासा करीता एकाच वाहनांवर दोन कायम वाहनचालकांचे अतिकालीक भत्ता देणेस मांन्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस आहे. सदर अतिकालीन भत्ता वाहन चालकांना वाहन सतत ४०-५० प्रती तास या वेगाने चालविले पाहिजे अशी अट घालण्यात यावी. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**१२) श्रीसाईबाबा हॉस्पीटल व श्री साईबाबा भक्तनिवासस्थानकरीता वॉटर कुलर तसेच कॅन्टीन करीता डी-फ्रीज खरेदी करणेबाबत**

०१) श्री साईबाबा हॉस्पीटल कॅथलॅब पॅसेजमध्ये रुग्णांसाठी व रुग्णांचे नातेवाईक यांना पाणी पिण्याची व्यवस्था केलेली नाही. सदर वॉर्डमधील पेशंट व त्यांचे नातेवाईक यांना पाणी घेणेकामी दुस-या मजल्यावरील तळमजल्यावर यावे लागते. तरी श्री साईबाबा हॉस्पीटल दुसरा मजला कॅथलॅब वॉर्डचे दक्षिण बाजुचे कोप-यात एक वॉटरकुलर बसवून मिळणेकामी श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी मागणी केलेली आहे.

०२) श्री साईबाबा भक्तनिवासस्थानमध्ये निवास करणा-या साईभक्तांना पिण्याचे थंड पाणी मिळावे म्हणून तळमाळयाला ग्राऊंडचे कडेने वॉटर कुलर बसविण्यात आलेले आहेत. अे / बी विंगकरीता पिण्याचे पाणी मिळावे याकरीता प्रत्येक माळयावर त्यापैकी अे / बी या विंग मधील १,२,३ या माळयावर वॉटर कुलर बसविण्यात आलेले नाहीत. तेथील विंगचे माळयावरील भक्त पिण्याचे थंड पाण्याची चौकशी करतात. त्या विंगचे सर्व भक्तांना तळमाळयाला थंड पाणी घेणेकरीता ये-जा करावी लागते. काही वयोवृद्ध भक्तांना ये-जा करण्याचा त्रास होतो. त्यामुळे भक्त कार्यालयात तक्रार करतात. वरीलप्रमाणे भक्तांना त्रास होऊ नये म्हणून इमारतीतील प्रत्येक माळयावर वॉटर कुलर असणे आवश्यक आहे. व इमारतीचे प्रत्येक विंगचे प्रत्येक माळयावर वॉटरकुलर बसविणेकामी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांनी कळविले आहेत.

०३) कॅन्टीन नंबर- २ मध्ये १ डि-फ्रिज कार्यरत असून गर्दी जास्त झालेनंतर सदर फ्रिज दुध साठविणेसाठी अपुरा पडतो. ०१ फ्रिज बंद अवस्थेत असून त्याचे दुरुस्ती करून गर्दीच्या वेळी होणारी अडचण दुर होईल. तरी डि-फ्रिज विद्युत विभागामार्फत दुरुस्त करुन मिळावा असे कॅन्टीन विभागाने कळविले आहे. सदर डि-फ्रिज चेक केला असता, डि-फ्रिज हा फार जुना असल्याने आतील बॉडी पुर्णपणे सडलेली असून खालील बाजूची बाहेरील बॉडी पुर्णपणे गंजून खराब झालेली असून गॅस पाईपचा पत्रा अत्यंत खराब झाल्याने गॅस पाईपभोवती पुर्णपणे चोकप आहे. तसेच इतर इलेक्ट्रीकल पार्ट सुद्धा बदलावे लागणार आहे.दुरुस्ती मोठया प्रमाणात असल्याने फॅब्रिकेशनचे काम असल्याने सदरचा डि-फ्रिज दुरुस्तीसाठी रु. १६,०००.०० इतका कमीत कमी खर्च येण्याची शक्यता आहे. हा डि-फ्रिज दुरुस्त करुन घेतल्यानंतर जास्त दिवस सर्व्हिस देऊ शकणार नाही. त्याऐवजी नविन डि-फ्रिज घेणे योग्य ठरेल.

आपणाकडे वॉटरकुलर व डि-फ्रिज शिल्लक नसल्याने ते खालीलप्रमाणे खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री साईबाबा हॉस्पीटल कॅथलॅबकरीता वॉटरकुलर, व्होल्टास मेक, स्टील बॉडी. क्षमता - ८० लिटर, | ०१ नग. | ३१,०००.०० | ३१,०००.०० |
| ०२. | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान- अे/बी विंगकरीता वॉटरकुलर, व्होल्टास मेक, स्टीलबॉडी, क्षमता - ८० लिटर | ०३ नग. | ३१,०००.०० | ९३,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३. | कॅन्टीनकरीता डी-फ्रीज, ब्लू स्टार मेक, ३०० लिटर, स्टील बॉडी, ३ कप्प्याचा | ०१ नग. | ४०,०००.०० | ४०,०००.०० |
| | | | एकुण रक्कम:- | १,६४,०००.०० |

उपरोक्तप्रमाणे वॉटरकुलर व डी-फ्रीज खरेदी करणेस व येणाऱ्या रक्कम रुपये १,६४,०००/- मात्र चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**१३) श्री पुण्यतिथी उत्सव-२००६ मंडप टेंडर उघडून निर्णय घेणे -**

श्री पुण्यतिथी उत्सव २००६ साठी मंडप व स्टेज व प्लॅस्टीक सह मंडप असे एकूण १२ मंडप व १ स्टेज यासाठी म्हणून एकूण १२ कोटेशनधारकांकडून निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. पैकी एकूण ०५ कोटेशनधारकांनी निविदा सादर केलेल्या आहेत. या प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारक | तपशील | एकूण रुपये दर चौ.फुट | चर्चेनंतर कमी केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री देवीदास डी सोनटक्के, सोनटक्के मंडप डेकोरेटर्स, राहाता | १२ मंडप/स्टेज, पार्टीशन ८०,३०१ चौ. फूट | रु. ५/- एकूण ४,०१,५०५/- | रु. ४.५० एकूण रु. ३,६१,३५४/- |
| ०२. | श्री एकनाथ भि गाडेकर, सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता | १२ मंडप/स्टेज, पार्टीशन ८०,३०१ चौ. फूट | रु. २.६२ एकूण रु. २,१०,७८९/- | रु. २.५० एकूण रु. २,००,७५२/- |
| ०३. | श्री रामेश्वर नि झुराळे, झुराळे टेन्ट अँड मंडप डेकोरेटर्स निमगांव खैरी, श्रीरामपूर | १२ मंडप/स्टेज, पार्टीशन ८०,३०१ चौ. फूट | अ.नं.९ व १० रु. १.५२ | गैरहजर. |
| ०४. | श्री किरण तरटे, तरटे मंडप डेकोरेटर्स, साकुरी, राहाता | १२ मंडप/स्टेज, पार्टीशन ८०,३०१ चौ. फूट | रु. ३/- एकूण रु. २,४०,९०३/- | रु. २.४५ एकूण रु. १,९६,७३७.४५ |
| ०५. | शर्मा डेकोरेटर्स, मेन रोड, वैजापूर | १२ मंडप/स्टेज, पार्टीशन ८०,३०१ चौ. फूट | रु. २.५० एकूण रु. २,००,७५२/- | रु. २.४४ एकूण रु. १,९५,९३४/- |

उपरोक्त बाबतीत मा.स्थानिक विश्वस्तांचे सभेत चर्चा होऊन अ.नं.०५ मधील मंडप टेंडर धारक श्री.जगदीश एम शर्मा, वैजापूर, जि.औरंगाबाद यांचे नांव एकमुखाने मान्य केले असून त्यांचे दर न्युनतम असून बाजारभावाप्रमाणे रास्त आहेत, तसेच आवश्यक त्या ठिकाणी ते पत्रे , ताडपत्री , बिछायती इ. घालणार आहेत. तरी श्री .जगदीश एम शर्मा, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना श्री पुण्यतिथी उत्सव - २००६ मंडप व पार्टीशनचे काम रु. २.४४ पैसे दरानुसार एकुण रक्कम रुपये १,९५,९३४/- चे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**१४) वाहनांबाबत-**

श्रीसाईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थोतील ट्रॅक्टर मॅकेनिक या व्यवसायासाठी अभ्यासक्रमानसुार आवश्यक असलेला एस्कॉर्ट ट्रॅक्टर ३४५ हा दिनांक १२.०१.१९८५ रोजी खरेदी करण्यात आला आहे. सदरील ट्रॅक्टर हा वाहन विभागाकडे वाहतूकीची कामे करण्यासाठी दिनांक २.८.२००२ अन्वये वाहन विभागाकडे वर्ग करण्यात आला व औद्योागिक प्रशिक्षण संस्थेच्या डेडस्टॉकवरुन कमी करुन तो वाहन विभागाचे डेडस्टॉकवर घेण्यात आला आहे.

अभ्यासपुस्तीकेनुसार ट्रॅक्टर मॅकेनिक या व्यवसायाला ३ ट्रॅक्टरची आवश्यकता आहे. त्यानुसार संस्थानकडे फोर्ड ३६००, एस्कॉर्ट ३४५ व स्वराज्य हे ट्रॅक्टर उपलब्ध आहेत. तीन ट्रॅक्टर पैकी एस्कॉर्ट३४५ व स्वराज्य हे दोन्हीही वाहन विभागाकडे आहेत. त्यापैकी प्रशिक्षणार्थ्यांचे प्रात्यक्षिकासाठी एस्कॉर्ट ३४५ ट्रॅक्टरची आवश्यकता असल्याने सदरील ट्रॅक्टर वाहन विभागाचे डेडस्टॉकवरुन कमी करुन तो औद्योागिक प्रशिक्षण संस्थेच्या डेडस्टॉकवर घेता येईल.

तसेच महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि.नाशिक या कंपनीकडून व्हायझर एमएच-१७/एच/४०१ ही गाडी दिनांक २८.०२.२००० रोजी श्री साईबाबा संस्थानला देणगी देण्यात आली . कंपनीने गाडीची किंमत रुपये ४,७१,९५७.०० इतकी कळविली. व्हायझर ही गाडी सन २००२ मध्ये नादुरुस्त झाल्याने दुरुस्तीसाठी व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेऊन रुपये ३०,३३०.०० इतका खर्च करण्यात आला आहे. सदर गाडीचा लिलाव करण्यासाइी व्यवस्थापन मंडळाने मान्यता घेण्यात येऊन ती लिलावासाठी ठेवण्यात आली होती. अपेक्षित किंमत न आल्याने ही गाडी वाहन विभागाकडून दिनांक १०.१०.२००३ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे वर्ग करण्यात आली. औद्योागिक प्रशिक्षण संस्थेकडील टाटा सुमो एम.एच १७/सी-३५३६ ही गाडी वाहन विभागाचे वापरासाठी परत घेण्यात आली. औद्योागिक प्रशिक्षण संस्थेच्या मोटार मॅकेनिक व्यवसायाचे प्रशिक्षणार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षणासाठी सदरची गाडी आतापर्यन्त वापरण्यात येत आहे. वहयझर गाडी क्र. एम.एच/१७/एच/४०१ कालबाह्य झाल्याने तसेच

तिचे स्पेअर्स बाजारात उपलब्ध होत नसल्याने सदरची गाडी वाहन विभागामार्फत लिलावास काढून वाहन विभागाकडील टाटा सुमो किंवा बोलेरो ही गाडी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षणासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे वर्ग करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील एस्कॉर्ट ३४५ ट्रॅक्टर, बोलेरो ही वाहने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिकासाठी वर्ग करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय./वाहन विभाग प्रमुख)

**१५) मा.विश्वस्तांचे सुचनांबाबत-**

मा.विश्वस्तांनी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाबाबत खालीलप्रमाणे सुचना केल्या.

०१) श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी दोन्ही रुग्णालयात प्रत्येकी तीन-तीन दिवस काम करण्यास सांगण्यात यावे.

०२) श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्याच्या कामाच्या वेळा सारख्या करण्यात याव्यात.

०३) श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची विश्वस्तांबरोबर एक संयुक्त सभा आयोजीत करण्यात यावी.

०४) श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांचे वेतनातील तफावत दुर करणेसाठी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका/अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०८. विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील तरतूदींन्वये स्थापीत व्यवस्थापन निधीच्या प्रमाणात सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात होणाऱ्या खर्चापर्यन्त वाढ करणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणे बाबत.**

**निर्णय क्र.७१९. (अ)** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ मधील तरतुदीप्रमाणे दिनांक २३ ऑगस्ट, २००४ चे अधिसुचनेनुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन शासननियुक्त मा.व्यवस्थापन समितीने करणेस सुरुवात केलेली आहे.

या अधिनियमातील 'व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग ' या संबंधीत कलम २२ मधील तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

०१. यवस्थापन निधी नावाचा एक स्वतंत्र निधी घटित करण्यात येईल व तो समितीकडे निहित असेल व समितीच्या नियंत्रणाखाली असेल.

०२. व्यवस्थापन निधीत शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन, विश्वस्त व्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम,राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी, निर्देश देता येईल.

०३. व्यवस्थापन निधीचा, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, पुढील प्रयोजनांसाठी उपयोग करण्यात येईल -

(क) समितीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांना मानधन, फी व भत्ते देणे,

(ख) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे,

(ग) या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कर्तव्ये व कामे पार पाडताना, समितीने किंवा कोणत्याही सदस्याने किंवा अधिका-याने किंवा कर्मचा-याने कायदेशीररीत्या केलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम देणे.

उपरोक्त अधिनियमातील कलम २२ (२) मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम व्यवस्थापन निधीत वर्ग करणेबाबत तरतूद करणेत आलेली आहे. मागील तीन आर्थिक वर्षांचे स्थूल वार्षिक उत्पन्न, उपरोक्त नमूद प्रयोजनांच्या बाबींवर झालेला खर्च व त्याचे स्थूल उत्पन्नाशी प्रमाण आदि गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.नं. | आर्थिक वर्ष | **लगतपूर्व वर्षातील स्थूल उत्पन्न** | प्रयोजनाच्या बाबींवरील एकूण खर्च व स्थूल उत्पन्नाशी त्याचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| ०१. | २००१-२००२ | रु. ५३,७८,७१,७४८/- | रु. १२,९५,३३,९७८/- | २४.०८ टक्के |
| ०२. | २००२-२००३ | रु. ६१,३६,५१,७२३/- | रु. १३,३१,२९,६२३/- | २१.६९ टक्के |
| ०३. | २००३-२००४ | रु. ६१,३५,६५,४२३/- | रु. १४,६८,७३,८६८/- | २३.९४ टक्के |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४. | २००४-२००५ | रु. ६८,७७,५८,७४१/- | रु. १६,३३,५७,५०७/- | २३.७५ टक्के |

उपरोक्त तपशील विचारात घेता, प्रयोजित बाबींवरील, खर्चांच्या पूर्ततेसाठी व्यवस्थापन निधीत वर्ग करावयाची रक्कम, लगतच्या वर्षाच्या स्थूल उत्पन्नाच्या १० टक्केऐवजी २५ टक्के इतका वाढविल्यास, हा व्यवस्थापन निधी समिती सदस्यांचे मानधन व भत्ते, कर्मचारी वेतन व भत्ते, कंत्राटी स्वरुपातील कुशल-अकुशल व सुरक्षा कर्मचारी आदि बाबींवरील वार्षिक खर्चविषयक बाबींसाठी पुरेसा होईल. यादृष्टीने अधिनियमातील कलम २२ (२) यातरतुदीत सुधारणा करणेसाठी जा.क्रएसएसएस/वशी-लेखा/२३२८/०५ दि.०३ मार्च,०५ नुसार व्यवस्थापन निधीविषयक अधिनियम तरतुदीत करावयाच्या बदलासाठीचा मुळ प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच जा.नं.एसएसएस/वशी-लेखा/१०५८९/२००५ दि.२२ सप्टेंबर,२००५ च्या प्रस्तावानुसार विश्वस्तव्यवस्था निधीतून सन २००४-०५ या आर्थिक वर्षासाठी प्रयोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी त्यांचे अहवालात प्रमाणित केल्यानूसार एकूण रुपये १६,३३,५७,५०७/- एवढी रक्कम व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल करण्यात आलेला आहे. उपरोक्त दोन्ही प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहेत.

**(ब)** सध्या सन २००६-०७ हे आर्थिक वर्ष सुरु आहे. तसेच सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण पूर्ण होणे बाकी आहे. सन २००६-०७ या आर्थिक वर्षात मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये श्रीसाईबाबा रुग्णालय या नावाने नवीन अत्याधुनिक रुग्णालय सुरु करुन वाजवीदरात सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यासाठी विविध क्षेत्रातील नांवाजलेले वैद्यकीय अधिकारी, तंत्रज्ञ आदींची सेवा घेण्यात येत आहे. त्यामुळे चालु आर्थिक वर्षात कर्मचारी वेतन व भत्ते , कंत्राटी स्वरुपातील कुशल-अकुशल आदि बाबींवरील खर्चाचे प्रमाणात वाढ होणार आहे. सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी, मागील आर्थिक वर्ष २००५-०६ चे एकुण वार्षिक स्थूल उत्पन्नाचे दहा टक्के इतकी रक्कम खर्चाच्या पूर्ततेसाठी व्यवस्थापन निधीत वर्ग करता येईल. परंतू अधिनियमातील कलम २२ (२) मधील तरतुदीनुसार उपरोक्त १० टक्के रक्कम ही व्यवस्थापन निधीतून करावयाच्या खर्चाच्या विहीत बाबींसाठी अत्यंत अपुरी पडणार आहे. सन २००६-०७ या आर्थिक वर्षात, व्यवस्थापन निधीतुन करावयाच्या विविध बाबीवर संभाव्य खर्च अंदाजे रुपये २२ कोटी होईल, असें वाटते.

उपरोक्त परिच्छेद ब मध्ये नमुद केलेल्या अधिनियम कलम २२ (२) अन्वये व्यवस्थापन निधीत वर्ग करावयाच्या रक्कमेची मर्यादा सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी प्रयोजित बाबीसाठी व्यवस्थापन निधीमध्ये होण्याच्यादृष्टीने विश्वस्तव्यवस्था निधीतुन एकुण रुपये २२ कोटी मात्र व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,वरीलप्रमाणे प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०९ सुवर्ण सिंहासन निधीमध्ये देणगी स्वीकारणे बंद करणे बाबत.**

**निर्णय क्र.७२०.** याबाबत वर निर्णय क्र.६७९ (०१)मध्ये निर्णय झालेला आहे.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १०. सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षणासाठी सक्षम संस्थेची नियुक्ती करणे बाबत.**

**निर्णय क्र.७२१.** संस्थानमधील सर्व विभागाकडील आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण अशा एकूणच कामकाजासाठी, प्रशासनांतर्गत पुरेशा मनुष्यबळाअभावी, सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी बाहेरील दोन सक्षम संस्थांची, सर्व खर्चासह एकत्रित रु.१ लाख मात्र प्रत्येकी या मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती. बाहेरील संस्थांकरवी अशाप्रकारचे कामकाज करुन घेण्याची ही पहिलीच वेळ होती.

सदरील संस्थांनी लेखापरिक्षणामध्ये आढळून आलेल्या त्रुटींबाबतचा लेखी अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केला. तद्नंतर अहवालातील त्रुटींचे मुद्यांसंदर्भात संबंधित विभागांकडून दोष-दुरुस्ती अहवालाच्या कार्यवाहीबाबत लेखी खुलासा मागविण्यात आला होता. त्याची एक प्रत वैधानिक लेखापरिक्षक यांना पुरविण्यात आलेली आहे.

सदरील कामकाजासाठी मागील वर्षी (सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी) दोन्ही संस्थांना सर्व खर्चासह रु.१ लाख प्रत्येकी, असे एकूण रु.२ लाख मात्र मानधन देण्यात आलेले आहे. नियुक्त करण्यात आलेल्या बाहेरील संस्थामुळे अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी निश्चितच मदत झालेली आहे.

आता, सन २००६-०७ हे आर्थिक वर्ष सुरु होऊन, साधारणतः सहा महिने पूर्ण होत आलेले आहेत. तरी सदरील आर्थिक वर्षाच्या अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी मागील वर्षाप्रमाणे सक्षम संस्थेची नियुक्ती झाल्यास, सदरील संस्थेकडून वेळेत काम पूर्ण करुन घेणे सोईस्कर होईल. त्यासाठी मागील

वर्षी नियुक्त करण्यात आलेल्या संस्थांपैकी मे.शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांची सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी पूर्व लेखापरिक्षक म्हणून सर्व खर्चासह एकत्रित रु.१.७५लाख मात्र लेखापरिक्षण फी वर नियुक्ती करण्यात आलेली आहे. पैकी उर्वरित श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटंटस्, कोपरगांव यांचे मागील वर्षाचे काम समाधानकारक असून, त्यांना संस्थानच्या कार्यपध्दतीचा मोठा अनुभव आहे. तसेच ते स्थानिक असलेने, लेखापरिक्षणाच्या पूर्ण कालावधीमध्ये संस्थानमार्फत त्यांची राहण्याची व जेवणाची विशेष व्यवस्था करण्याची आवश्यकता भासत नाही. पर्यायाने यामध्ये संस्थानचा निश्चितच आर्थिक फायदा होत असलेने, सन २००६-०७ या आर्थिक वर्षाच्या, संस्थांनच्या सर्व विभागांसाठी अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजाकरीता त्यांची नियुक्ती करण्यात यावी. त्याची पुनर्नियुक्ती केल्यामुळे सन २००५-०६ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष-दुरुस्ती अहवाल करण्यासाठी त्यांची मदत होईल. अशाप्रकारे सलग तीन-चार वर्षे पूर्वानुभव असणाऱ्या सक्षम संस्थांकडून पूर्व लेखापरिक्षण व अंतर्गत लेखापरिक्षण करुन घेतल्यास त्यांचे चांगले-पारदर्शक परिणाम दिसून येतील, असे नम्र मत आहे.

तरी सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटंटस्, कोपरगांव यांची रु.१.७५ लाख मात्र अधिक होणारा सेवाकर या लेखापरिक्षण फी वर नियुक्ती करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ११. साई कल्याण निधी बाबत मा.विश्वस्त श्री रमाकान्त गणेश कर्णिक यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.७२२.** मा.विश्वस्त श्री रमाकान्त गणेश कर्णिक यांनी त्यांचे दिनांक १२ सप्टेबर,२००६ चे पत्रान्वये साई कल्याणी निधीबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे.

०१) **श्री साई कल्याण निधी-** श्री साईबाबांच्या शिर्डी येथील मंदिरात दरवर्षी लक्षावधी भक्त दर्शनासाठी येत असतात. मोठया श्रध्देने भक्तजन रोख रक्कम व दागदागिने स्वच्छेने दानपेटीत अर्पण करित असतात. कोटयावधी रुपयांचा निधी त्यामुळे श्री साई मंदिरास प्राप्त होत असतो. त्या निधीचा विनियोग कल्याणकारी योजनांसाठी करण्यात यावा या हेतूने श्री साई संस्थान शासनाकडे वर्ग करण्यात आले आहे. संस्थानाच्या व्यवस्थापनासाठी शासनानेच विश्वस्तव्यवस्था समिती स्थापन केलेली आहे.

श्री साई संस्थानमध्ये पूर्वीपासून उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधात विद्यमान विश्वस्तव्यवस्थासमितीने आजवर मोठी भर घातली आहे. श्री साईबाबा रुग्णालयाचे आधुनिकीकरण करुन सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलची स्थापना केली आहे. जे रुग्ण वैद्यकीय उपचार शिर्डीबाहेरील रुग्णालयात करुन घेतात त्यांना रु. २५ हजार अर्थसहाय्यही करण्यात येते. पदयात्रींसाठी मुंबई ते शिर्डी सुमारे ३०० किलोमीटरच्या मार्गात ठिकठिकाणी सेवासुविधा निर्माण केल्या आहेत. या सर्व सेवा सुविधांचा विस्तार करण्याच्या हेतूने विश्वस्तव्यवस्था समितीच्या वतीने पुढील प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

**ब) कल्याण निधी -**श्री साई कल्याण निधी स्थापन करण्यात यावा. श्री साईबाबा संस्थानने त्या निधीस रु. १० कोटींची देणगी दयावी. स्वतंत्र निधींच्या निर्मितीमुळे विश्वस्तव्यवस्था समितीचे अधिकार विस्तारीत करणे शक्य होईल आणि कल्याण निधीतून यथोचित अर्थ सहाय्य अविलंब करणे शक्य होईल.

कल्याणकारी योजनांसाठी स्वतंत्र निधी स्थापन केला असल्याची माहिती भक्तजनांपर्यंत सर्व प्रसिध्दी माध्यमांच्याद्वारे पोहोचविण्यात यावी आणि भक्तजनांनी त्या निधीत भर टाकावी असे आवाहन त्यांना करण्यता यावे. श्री साई कल्याण निधीत त्यामुळे मोठी वाढ होऊ शकेल.

**कल्याण निधीचा विनियोगः-**

श्री साई कल्याण निधीचाविनियोग पुढील कार्यासाठी करण्यात यावा.

०१) गरजू रुग्णांना अर्थसहाय्य करण्यात यावे.
०२) अर्थसहाय्य रुग्णातयाच्या नावे धनादेश काढून करण्यात यावे.
०३) अर्थसहाय्याची रक्कम रु. २.५ लाखापेक्षा अधिक नसावी.
०४) रुग्णाची पती/ पत्नी, कमवता मुलगा/मुलगी यांचे मासिक उत्पन्न विचारात घेऊन अर्थसहाय्याची रक्कम निर्धारित करण्यात यावी.
०५) एकूण मासिक उत्पन्न रु. २५ हजार अथवा कमी असल्यास त्यास उपचारांसाठी होणाऱ्या खर्चाची रक्कम रु. २.५ लाख या रकमेच्या मर्यादेपर्यंत देण्यात यावी.
०६) अर्थसहाय्य एकवेळच करण्यात यावे.
०७) अर्थसहाय्य पुढील विकारांसाठी देण्यात यावे.
    १. कर्करोग, २. हृदयविकार, ३. मेंदूचे रोग- उद
    २. ा. सॅरीबल प्लास्टी, ४. मूत्रपिंडाचे विकार,

५. अर्धांगवायू, ६. मधुमेह, ७. क्षयरोग, ८. मतीमद, ९. हेपॅटिटिस-बी, १०. रेबीज, इत्यादी.

०८) अवयवांचे रोपण:

अ) गुडघ्याची वाटी, ब) शरिरातील सर्व प्रकारचे सांधे- जसे खांदा, कंबर, बोटाची हाडे, इत्यादी रोपण करण्यासाठी होणारा खर्च.

०९) संस्थांना अर्थसहाय्य:-

अंध, अपंग, मूक-बधीर, मतीमंद यांच्या धर्मादाय संस्थांना अर्थसहाय्य करण्यात यावे.

अर्थसहाय्यासाठी अर्ज करणाऱ्या संस्थांकडून सर्व तपशील मागविण्यात यावा. जसे मागील ५ वर्षाचे वार्षिक अहवाल व लेखा परिक्षित हिशोब धर्मादाय आयुक्तांच्या शिफारशींसह अर्ज सादर करण्याची अट विहित करण्यात यावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याऐवजी उपरोक्त योजना काही प्रमाणात संस्थानमध्ये अस्तित्वात असल्याने आवश्यकता भासल्यास याबाबत व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १२. माहे ऑक्टोबर,२००६ अखेर उपलब्ध रकमांच्या गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७२३.** माहे ऑक्टोबर,२००६ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | एच.डी.एफ सी लि.नाशिक | ०३/१०/२००६ | ४,९०,०१,७२०.०० |
| ०२. | इंडस् -इंड बँक, मुंबई | १७/१०/२००६ | १,२०,४७,३००.८३ |
| ०३ | माहे ऑक्टोबर,२००६ अखेर दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम | | १,००,००,०००.०० |
| | | **एकूण :-** | **७,१०,४९,०२०.००** |

उपरोक्त तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु** ७ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. सध्या कुठल्याही राष्ट्रीयीकृत बँकेपेक्षा आर.बी.आय.बॉण्डस् वरील व्याजदर हा (८.००%) अधिक आहे. अद्यापपर्यंत या बॉण्डस् मध्ये रु.१०२/-कोटींची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. संस्थानला स्थानिक (शिर्डी, राहाता, कोपरगांव, श्रीरामपूर) व नासिक येथील राष्ट्रीयीकृत बँकेकडून मोठया प्रमाणावरील आवश्यकतेनुसार सेवा मिळत आहे. गुंतवणूकीसाठी उपलब्ध असलेल्या रकमेची गुंतवणूक ही अशा सेवा देणा-या बँकांकडे झाल्यास संस्थानला पुढील कालावधीत चांगल्या प्रकारच्या सेवा त्यांचेकडून मिळत राहतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,वरील तपशीलानुसार प्राप्त होणारी रक्कम गुंतवणूक करणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांना अधिकार देण्यात आले. त्यानुसार पुढील कार्यवाही करावी असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १३. साईभक्तांसाठी सामुहीक अपघाती विमा पॉलीसी बाबत.**

**निर्णय क्र.७२४.** सध्या देशांतर्गत अतिरेकी कारवाया मोठया प्रमाणात वाढलेल्या असून अतिरेक्यानी संपुर्ण भारतात आपले जाळे पसरविलेले आहे व देशातील सर्व जनतेस एकप्रकारे वेठीस धरलेले आहे त्यामुळे सर्वच जनतेच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. अलिकडील काळात भारताचे जम्मु काश्मिर राज्यासह देशातील सर्व प्रमुख ठिकाणी तसेच सर्व प्रसिध्द धार्मिक देवस्थाने यांना अतिरेक्यांनी लक्ष्य बनविलेले आहे. मागील काही दिवसातील घटनापाहता उदा.गुजराथ मधील अक्षरधाम, जम्मु काश्मिर मधील रघुनाथ व शिवमंदिरावर झालेले अतिरेकी हल्ये हे त्याचेच प्रतीक आहे. तसेच मुंबई येथील लोकल रेल्वेत व मालेगांव येथील कब्रस्थानात अतिरेक्यानी घडवून आणलेले बॉम्ब स्फोट व त्यामध्ये मोठयाप्रमाणात झालेली जिवीत हानी पाहाता सर्वच समाज भयभित झालेला आहे.

वरील सर्व घटना विचारात घेता व महाराष्ट्रातील पंढरपुर, अक्कलकोट, कोल्हापूर तसेच श्री क्षेत्र शिर्डी येथील देवस्थांनाना अतिरेक्यांनी धमकीवजा पत्र पाठवून लक्ष केलेले आहे त्यामुळे संस्थान प्रशासन तसेच पोलीस यंत्रणा सतर्क झालेली असून मंदिर व मंदिर परिसरातील संरक्षण व्यवस्थेत मोठया प्रमाणात वाढ करण्यात आलेली आहे. पोलीस यंत्रणेच्या मार्गदर्शनाखाली मंदिर परिसरातील प्रवेशव्दारावर येणां-या व जाणां-या भक्तांची तपासणी करुन क्लोज सर्कीट टी.व्ही. (कॅमे-या) व्दारे त्यावर लक्ष ठेवण्यात येत आहे. तसेच अतिरीक्त हत्यारी पोलीस बंदोबस्तांतही मोठया प्रमाणात वाढ केलेली आहे. श्री क्षेत्र शिर्डी येथे संपुर्ण भारतातुन तसेच विदेशातुन येणा-या भक्तांची संख्या मोठ्याप्रमाणात वाढलेली आहे. उपरोक्त परिस्थितीचा विचार करता, संस्थान परिसरातही अतिरेक्यांकडून अतिरेकी कारवाया होण्यांची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे साईमंदिरास भेट देणा-या साई भक्ताची सुरक्षितता व दुदैवाने अशी घटना घडल्यास मुत्यूमुखी पडणा-या साईभक्तांच्या वारसास व जखमीनां आर्थिक मदत करणे हे संस्थानचे कर्तव्यच आहे.

सर्वसाधारणपणे श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणां-या साईभक्तांची माहीती खालील प्रमाणे -

०१. दररोज येणा-या भक्तांची संख्या : सरासरी ४०,०००

०२. उत्सवकाळात भेट देणा-या भक्तांची संख्या दररोज (श्री रामनवमी,गुरुपोर्णिमा,पुण्यतिथी व दत्तजयंती) : सरासरी २,००,०००

०३. गुरुवार,रविवार व सरकारी तथा दिर्घ सुटयांमध्ये भेट देणा-या भक्तांची संख्या दररोज : सरासरी १,००,०००

उपरोक्त प्रमाणे शिर्डी येथे येणा-या भक्तांची संख्या ही सरासरी असून त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. जर भविष्यात वर नमुद केल्याप्रमाणे दुदैवाने संस्थान परिसरात तसेच संस्थानची विविध निवासस्थान इमारती, प्रसादालय, कॅन्टिन, दर्शन रांगा इत्यादी ठिकाणी अतिरेकी वा समाजकंटकाकडून काही अनुचित प्रकार घडल्यास दयाव्या लागणा-या आर्थिक मदतीसाठी विमा कपंनीकडून त्याबाबतची विमा पॉलिसी घेण्यात यावी असे वाटते. अशा प्रसंगी शासनाकडूनही मदत प्राप्त होऊ शकते. पंरतु संस्थानकडूनही अशा प्रसंगी साई भक्तांना आर्थिक मदत करावी व करावयाची आर्थिक मदत कशाप्रकारे असावी याबाबत पुढील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. मुत्यूमुखी पडणां-या किमान १०० साईभक्तांच्या वारसांना देण्यात येणारी आर्थिक मदत प्रत्येकी रुपये २ लाख मात्र

२. मोठया प्रमाणात जखमी अथवा अपंगत्व प्राप्त होणा-या किमान १०० साईभक्तांना प्रत्येकी रुपये ५० हजार मात्र.

३. किरकोळ प्रमाणात जखमी होणा-या किमान २०० साईभक्तांना प्रत्येकी रुपये २५ हजार मात्र.

उपरोक्त प्रस्तावित केल्याप्रमाणे यांप्रसंगी दयावी लागणारी एकुण आर्थिक मदत रुपये तीन कोटी पर्यत होईल. त्यासाठी विमा कंपनीकडून विमा उतरविल्यास सदरचा आर्थिकभार संस्थानवर न पडता विमा कपंनीकडून मिळू शकेल त्यासाठी विमा कपंनीस प्रिमियम म्हणून काही रक्कम आदा करावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे साईभक्तांचे संरक्षणासाठी व दयावी लागणारी आर्थिक मदतीसाठी विमा कंपनीकडून विमा पॉलिसी घेण्यास व त्याअनुषंगाने दयावा लागणारा प्रिमियम आदा करणेकामी मंजुरी मिळणेस प्रस्तावित करण्यात येत आहे. मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यानतंर विमा कपंन्याकडून दरपत्रके मागवून न्यूनतम दर व जास्तीत- जास्त जोखीम स्विकारणा-या कंपनीकडून विमा उतरविणेकामी पुढील कार्यवाही करता येईल. सदरचे प्रस्तावास व देण्यात येणा-या आर्थिक मदतीत काही बदल करणे आवश्यक असल्यास त्याप्रमाणे चर्चेअंती निर्णय होऊन मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलपैकी अ.नं. ०१ मधील मुत्यूमुखी पडणां-या किमान १०० साईभक्तांच्या वारसांना देण्यात येणारी आर्थिक मदत प्रत्येकी रुपये ५ लाख पर्यन्त मात्र करण्यात यावी असे ठरले. अ.नं. ०१,०२ व ०३ नुसार फक्त राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून सविस्तर माहिती व निविदा मागविण्यात याव्यात व त्या उपसमितीपूढे उघडून पुढील कार्यवाही करावी असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १४. नगर-मनमाड रस्ता पश्चिम बाजूकडील स्टॉर्म वॉटर ड्रेनेज दक्षिणेकडील चराला जोडणेसाठी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.७२५.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत नगर-मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम करण्यात आलेले आहे. सदर कामामध्ये रस्त्याच्या दुतर्फा फुटपाथ खाली स्टॉर्म वॉटर ड्रेनेजसाठी कॉंक्रीटीमध्ये डक्ट करण्यात आलेले आहेत. भक्तनिवास प्रवेशव्दाराच्या दक्षिणेकडे सदर डक्ट मधून येणारे पाणी पाईपलाईनव्दारे शैक्षणिक संकलाच्या नैऋत्य कोपऱ्यापर्यंत वाहून नेण्यात आलेले आहे. रस्त्याच्या पश्चिम बाजुची ६००mm व्यासाची स्टॉर्म वॉटर लाईन सध्या कामाच्या ठरलेल्या स्कोपनुसार १६०५ मी. पर्यंत टाकण्यात आलेली आहे. पंरतू तेथून पुढे सुमारे ३४ मि. अंतरावर नाला आहे. त्यामुळे स्टॉर्म वॉटर डक्टमधून वाहून येणारे रस्त्यावरील पावसाचे पाण्याचा त्या ठिकाणी निचरा न होता ते साचून रहात होते. त्यासाठी नाल्यापर्यंत आर सी सी पाईप टाकून पावसाचे पाणी नाल्याला जोडणे आवश्यक होते. सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने सदर काम तातडीने करणे आवश्यक होते.

वरीलप्रमाणे कमासाठी ४५० एम.एम.आर.सी.सी. पाईपलाईन टाकणे व चेंबर बांधकामाकरीता कोटेशन्स मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या तीन कोटेशन्सपैकी निम्नतम कोटेशनधारक श्री बी.के.कानडे, हणमतगांव यांना जा.नं. १०८१३ दि. १२.८.२००६ चे पत्राने कार्यादेश देऊन त्यांचेकडून सदर काम करुन घेण्यात आले आहे. ठेकेदार श्री बी.के.कानडे यांनी सदर काम पूर्ण केलेले असून दिनांक १५.८.२००६ चे पत्राव्दारे कामाचे अंतिम बिल सादर केलेले आहे. सदर अंतिम बिलाची

तपासणी केली असता कामाची एकूण रक्कम रु.३०,२६१.०० मात्र इतकी येते. त्यापैकी रुपये २४,५००/- मात्र इतकी रक्कम ठेकेदार यांना ॲडव्हॉन्स म्हणून अदा करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त कामासाठी आलेला खर्च रु. ३०,२६१/- मात्रला कार्योत्तर मान्यता मिळणेस व त्यानुसार बिलाची रक्कम अदा करणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १५. शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे रस्ता मजबूतीकरण/डांबरीकरणसाठीचा मंजूर निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करणे बाबत**

**निर्णय क्र.७२६. (अ)** शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे हा रस्ता नाशिक, मुंबई व परिसरातील पायी येणारे भाविक तसेच पालख्या शिर्डी येथे येण्यासाठी अत्यंत जवळचा मार्ग आहे. सिन्नर-वावी-सावळीविहीर मार्ग वहातूक जास्त असल्यामुळे भाविक सदर रस्त्याचा वापर करतात. परंतू सद्यस्थितीत डोऱ्हाळे-कनकुरी-शिर्डी रस्ता अरुंद असून त्यामुळे भाविकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. यासाठी या रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण व्हावे याकरीता भाविकांची बऱ्याच वर्षापासून मागणी होती. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २००५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७१ अन्वये शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे या रस्त्याचे रुंदीकरण करुन, मजबुतीकरणाकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेणेत आलेला होता.

या निर्णयानुसार, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई यांचेकडे दिनांक ०५ मार्च, २००५ रोजी विषयांकित रस्त्याचे कामास संस्थान मार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देणेबाबत प्रस्तावित करणेत आलेले होते.

**(ब)** विधी व न्याय विभाग, मुंबई यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००५/४०१/(४८)/का.१६, दिनांक २८ ऑगष्ट, २००६ नुसार खालीलप्रमाणे अटी-शर्तीस अधिन राहून, शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे रस्ता रुंदीकरण व मजबूतीकरणाकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे :

०१. शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार, शिर्डी ते कनकुरी (०/०० ते ४/३०० कि.मी.) व कनकुरी ते डोऱ्हाळे (४/३०० ते ६/०० कि.मी.) या रस्त्याच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे रुपये १,००,९५,०१६/- (रुपये एक कोटी पंच्च्याण्णव हजार सोळा फक्त) इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त निधीतून उपलब्ध करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर निधी ज्या कामाकरीता मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनार्थ वापरला जाईल याची दक्षता व पर्यवेक्षण कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी करावे.

०३. सदर निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी सन २००६-०७ च्या विश्वस्तनिधीतून खर्ची टाकण्यात यावा व याचा तपशील सदर वर्षीच्या आर्थिक अहवालात देण्यात यावा.

०४. उपरोक्त नमूद कामे विहीत मुदतीत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण होतील हे पहाण्यात यावे तसेच याबाबतचा प्रगती अहवाल अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांनी शासनास पाठवावा.

उपरोक्त परिच्छेदातील विवेचनानुसार, शासन निर्णयान्वये शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे या रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरणाकरीता मंजूर करण्यात आलेला निधी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडे अदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १६. निमगांव कोऱ्हाळे ता.राहाता येथे संस्थान मार्फत साईभक्तांना विविध सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत**

**निर्णय क्र.७२७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७. समाधी मंदिरातून निघणारे निर्माल्यफुले व प्रसादालयातून निघणारे उर्वरित अन्न यापासून खत बनविणे बाबत.**

**निर्णय क्र.७२८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १८. जिल्हा परिषद शाळेसाठी बांधलेल्या नविन इमारतीत फळे बसविणेकामी उर्वरीत फळयांची खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.७२९.** शिर्डी येथील स.नं.०६ (आरक्षण क्र.०८) मधील जागेत संस्थानमार्फत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इमारत बांधकाम पुर्ण करण्यात आले आहे. सदर इमारतीत दि.२८/०८/२००६ पासुन जिल्हा परिषद शाळा, भरविण्यात येत आहे. यापुर्वी सदर नवीन इमारतीमध्ये संस्थानतर्फे १८ नग फळे बसविण्यात आलेले आहेत. मुख्याध्यापिका, जिल्हा परिषद शाळा यांनी दि.२५/०८/२००६ रोजीचे पत्राव्दारे या

इमारतीमधील सर्व खोल्यांमध्ये (हॉलसह) अध्यापनासाठी फळयांची व्यवस्था करण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे. सदरच्या इमारतीमध्ये एकूण ९ हॉल, ४२ खोल्या व ६ आफिस आहेत. त्यानुसार एकूण ५८ फळे बसविण्याची मागणी असुन उर्वरित ४० फळे बसविणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे एकूण ४० नग फळे (साईज : ६ फुट x ४ फुट) खरेदीसाठी दर रु. ३,३००/- प्रती नगाप्रमाणे एकूण अंदाजे रु. १,३२,०००/- (अक्षरी रुपये एक लाख बत्तीस हजार) मात्र इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १९. शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प.**

**निर्णय क्र.७३०.** शिर्डी शहरातील रस्ते विकसीत करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ एप्रिल, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक २६३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे :

" .. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करणेत येऊन संस्थानतर्फे यापूर्वी शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेले सात रस्ते व इतर डी. पी. रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे माध्यमातून टप्प्या टप्प्याने विकसीत करणेस मान्यता देणेत आली. सदर रस्ते भू-संपादनसह विकसीत करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेतर्फे निधी देणेत यावा. सदर प्रकल्पाबाबत रस्ते विकास महामंडळ यांचेशी करारनामा करणेत यावा. प्रकल्पाचे टप्प्यानुसार खर्चाचे दहा टक्के रक्कम करारनामा झालेनंतर रस्ते विकास महामंडळा यांना आदा करणेत यावी. उर्वरित रक्कम कामाचे प्रगतीनुसार आदा करावी, असे ठरले.

याकामी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी. "

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ ऑगष्ट, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ६७८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे :

" .. ..०३. मरारविमं, कॅम्प पुणे यांचेशी करावयाचा करारनाम्याचा प्रारुप मसुदा लवकरात लवकर तयार करुन, या प्रारुप करारनाम्याचा मसुदा मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. याबाबत संस्थान वकिलांचा कायदेशीर अभिप्राय घेण्यात यावा. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. "

उपरोक्त परिच्छेदातील निर्णयांना अनुसरुन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी दिनांक २३ ऑगष्ट, २००६ रोजी पाठविलेला करारनाम्याचा प्रारुप मसुदा मान्यतेसाठी सोबत जोडला आहे. त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

संस्थान वकिलांनी करारनाम्याच्या प्रारुप मसुद्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. त्याचा थोडक्यात तपशील :

०१. करारनाम्याचा प्रारुप मसुद्यात कोणत्याही प्रकारची अडचण नाही. महामंडळामार्फत रस्ते विकासाचे काम त्यांचे मानकाप्रमाणे होणार आहे. मात्र रस्ते विकासासाठी संस्थान मोठया प्रमाणावर खर्च करणार असल्याने, कामाच्या दर्जाबाबत योग्य असे माफक नियंत्रण संस्थानचे असावे.

०२. संस्थानमार्फत देण्यात येणारा निधी, कामाच्या पुर्ततेनुसार, पूर्ण झालेल्या कामाच्या प्रमाणानुसार देण्यात यावा. रक्कम अदा करणेबाबत योग्य अशी पध्दत बसविणेत यावी जेणे करुन कामाच्या पूर्ततेवर नियंत्रण राहिल.

०३. करारनाम्याविषयी भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास, न्यायालयीन कामकाजाचे क्षेत्र मुंबई ऐवजी राहाता असावे.

०४. मरारविमं यांचेमार्फत विकसित करण्यात येणाऱ्या रस्त्यांची देखभाल दुरुस्ती विशिष्ट कालावधीपर्यन्त महामंडळाकडे रस्त्याचे कामाची हमी म्हणून असावी.

०५. करारनाम्यातील पान क्रमांक १२, कलम नंबर ०६ नुसार महामंडळामार्फत विकसीत करण्यात येणाऱ्या संपूर्ण रस्त्यांची देखभाल दुरुस्ती संस्थानने न करता, फक्त मंदिर व मंदिर परिसराच्या आजूबाजूस असणाऱ्या रस्त्यांची देखभाल दुरुस्ती संस्थानने करावी. कारण संस्थानला विकसित होणाऱ्या संपूर्ण रस्त्यांची देखभाल दुरुस्ती करणे शक्य होणार नाही.

यावर साधक-बाधक चर्चा होऊन, संस्थान वकीलांनी दिलेल्या अभिप्रायाचा विचार करुन, संबंधीत संस्थेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा-तथा-विचारविनिमय करुन, योग्य तो बदल करारनाम्याच्या प्रारुप मसुद्यात करणेत यावा. अशा सुधारीत करारनाम्याच्या प्रारुप मसुद्यास मान्यता देण्यात येत आहे.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २०. साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) कॅन्टीनकरीता मशिनरी / साहित्य खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.७३१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २१. वर्ग - ४ कर्मचारी निवासस्थाने बांधकामाबाबत.**

**निर्णय क्र.७३२.** संस्थानचे वर्ग - ४ कर्मचारी निवासस्थाने बांधणेचे काम ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन, प्रा.लि., मुंबई यांना देण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पाचे आर.सी.सी. काम पूर्ण होत आलेले असून विट बांधकाम व आतिल प्लास्टरचे काम प्रगतीपथावर आहे. टाईल्स बसविण्याचे काम आहे. निविदेमध्ये रुमचे फ्लोरींग करीता ग्रे मोझॅक टाईल्स बसविण्याचे ॲटम आहे. पंरतू सदर मोझॅक टाईल्स ऐवजी त्याठिकाणी सिरॅमिक टाईल्स बसविणे खालील कारणांमुळे बसविणे योग्य राहील असे ठेकेदार यांनी दि.३१/०७/२००६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

०१) मोझॅक टाईल्स बसविणेकामी फॅशन जुनी झाली आहे. सध्याच्या आधुनिक बांधकाम मोझॅक टाईल्सचा वापर तुरळक झाला आहे.

०२) सिरॅमिक टाईल्स या कमी खर्चास चांगला पर्याय आहे.

०३) ग्रेमोझॅक टाईल्स सच्छिद्र असल्यामुळे रोजच्या वापरात जास्तीत जास्त कचरा व घाण होतात. ओल्या कापड्याने पुसल्याने मोझॅक टाईल्स गडद खराब दिसतात. मोझॅक टाईल्स सुर्य प्रकाश शोषुन घेत असल्याने रुम मध्ये अंधार वाटतो. त्याचप्रकारे आरोग्याच्या दृष्टीने देखील मोझॅक टाईल्सचा वापर टाळला जात आहे.

०४) दुसऱ्या बाजुने सिरॅमिक टाईल्स फ्रेश राहतात. त्या ओल्या कपड्याने दुसऱ्यास अधिक स्वच्छ होत जातात त्यांना आरशा सारखी चमकत असते की ज्याने सुर्य प्रकाश परावर्तीत होऊन घरामध्ये ग्रेमोझॅकपेक्षा जास्त उजेड वाटतो.त्यामुळे याचा वापर बऱ्याच ऑपरेशन थिएटरमध्ये आरोग्याच्या दृष्टीने केला जातो.

०५) सिरॅमिक टाईल्समुळे रुम सुंदर दिसतात. ग्रे मोझॅक टाईल्स पेक्षा त्या डोळयाला सुखावह व स्वच्छ दिसतात.

०६) सिरॅमिक टाईल्स किंमतीच्या मानाने योग्य आहेत. गे मोझॅक टाईल्स नुसत्याच खराब दिसत नाहीत तर कालांतराने त्याचे तुकडे निघण्याची शक्यता असते.

याबाबत आर्किटेक्ट श्री चावरे, नाशिक यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता आर्किटेक्ट यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सुचनानुसार वर्ग-०४ निवासस्थाने टेंडरमध्ये, रुम कॉमन ऐरीया जिना याठिकाणी मार्बल मॉझॅक टाईल्स फ्लोरींग घेण्यात आले आहे. सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सिरॅमिक टाईल्स या मोझॅक टाईल्स पेक्षा दिसण्यास आकर्षक असतात व मेंटनस नसते. त्यामुळे रुममध्ये फस्ट क्वालीटी व मान्य केलेल्या नमुन्या प्रमाणे सिरॅमिक टाईल्स बसविणे योग्य राहील. तसेच जिन्याचे टप्पे, सील व तळमजला कॉमन भागात कोटा फ्लोरींग अधिक योग्य राहील.

मटेरीअलच्या या बदलामुळे रु. १९ लाख मात्र अधिक खर्च येईल. मात्र सदर खर्च मुळ निविदा रक्कम रु.३,९३,६५,०९१.०० पेक्षा अधिक होणार नाही. सदर ॲटमचे काम सुरु करण्यापुर्वी या बदलास मान्यता मिळाल्यास अधिक योग्य राहील असे आर्किटेक्ट यांनी कळविले आहे.

सदरची निवासस्थाने वर्ग-४ कर्मचाऱ्यांकरीता बांधण्यात येत आहे. त्याकरीता निविदेमध्ये त्यावेळेस झालेल्या चर्चेनुसार मोझॅक टाईल्सचा समावेश करण्यात आला आहे. आता सदरचे निवासस्थाने काही कालावधीकरीता रुग्णालयातील डॉक्टर्सकरीता उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे. डॉक्टर अथवा नर्सेस करीता सदरची निवासस्थाने देणे प्रस्तावित असेल तरच सिरॅमिक टाईल्सचा बदल करावा असे मत आहे. अन्यथा मोझॅक टाईल्स निविदामध्ये असलेप्रमाणे बसविणे योग्य आहे.

तरी आर्किटेक्ट यांनी सुचविलेल्याप्रमाणे मॉझॅक टाईल्स ऐवजी सिरॅमिक टाईल्स वापरणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २२. मुंबई ते शिर्डी मार्गावरील पालखी थांबा वास्तू उभारणेकामी देणगी स्वीकारणेबाबत.**

**निर्णय क्र.७३३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३ डॉक्टरांसाठी निवासस्थाने बांधणेबाबत.**

**निर्णय क्र.७३४.** संस्थानचे नव्याने साईबाबा हॉस्पिटल सुरु करण्यात आले आहे. या हॉस्पीटलकरीता नवीन डॉक्टरांच्या नेमणूकाही करण्यात आल्या आहेत. मात्र डॉक्टरांसाठी आवश्यक असणारे निवासस्थान उपलब्ध नसल्यामूळे डॉक्टरांची तात्पूरती राहाण्याची सोय साईभक्तांच्या इमारतीमध्ये करण्यात आली आहे. डॉक्टरांच्या निवासस्थानांची सोय तातडीने होणे गरजेचे आहे.

स.नं. १४८ मध्ये धर्मशाळेजवळ व्दारावती भक्तनिवासस्थानाचे बांधकाम चालू आहे. सदर इमारतीमध्ये तळमजला पार्किंग व ड्रायव्हर्स रुम करीता आहे. वरील तीन मजल्यावर साईभक्तांसाठी ॲटच टॉयलेट असलेल्या एकूण २४० खोल्या बांधण्यात येत आहेत. सध्या तळमजला व पहिला मजला स्लॅबचे

काम प्रगतीपथावर आहे. डॉक्टरांसाठी रुम उपलब्ध करुन द्यावयाच्या असल्यास या इमारतीवर चौथा मजला घेता येईल.

याबाबत आर्किटेक्ट काबरे चौधरी,नाशिक यांचेकडून माहिती मागविली असता त्यांनी दिनांक ७.९.२००६ चे पत्रान्वये कळविले आहे की, चौथ्या मजलयाचे बांधकामासाठी डायरेक्टर ऑफ टाऊन फौंडेशन स्ट्रक्चर डिझाईन करणत आले आहे. एक हॉल,किचन व बेडरुम असलेल्या २६ रेशिडेंशल ब्लॉक करता येतील. एका मजल्यावर बिल्ट अप ऐरिया ४०३७ चौ.मी. आहे. याकरीता रुपये २,६१,६९,२००.०० मात्र खर्च येईल.

सध्या इमारतीचे काम प्रगतीपथावरआहे. त्यामूळे एका जादा फ्लोअरचे बांधकाम करावयाचे असल्यास करणे अधिक योग्य राहील, सध्याचे नियोजित इमारतीचे ड्रेनेज लाईन व वॉटर सप्लाय लाईन इत्यादी उपयोगात येतील त्यामूळे कमी खर्चात बांधकाम होईल. डॉक्टर क्वॉर्टर पूढे भविष्यात भक्तनिवासासाठी वापरता येईल.

तरी दारावती इमारतीवर चौथा मजल्यावरती डॉक्टरांना राहाण्याकरीता निवासस्थान बांधणेकामी येणारे रुपये २,६१,६९,२००.०० चे खर्चास तसेच सदरचे काम सध्या काम करीत असलेले ठेकेदार यांचेकडून अथवा नव्याने निविदा मागवून करुन घेता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन वाढीव नवीन रुग्णालय (सुपरस्पेशालिटी) व क्वार्टर्सचे बांधकामासाठी आर्किटेक्ट मे.हाफिझ कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांचेकडून प्लॅन तयार करण्यात आलेले आहेत. डॉक्टर्सचे क्वार्टर्सचे बांधकाम सत्वर सुरु करणेचे दृष्टीने आर्किटेक्ट मे.हाफिझ कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांचेकडून एस्टिमेट व निविदा तयार करुन घ्याव्यात व वर्तमानपत्रात निविदासुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात याव्यात तसेच व्दारावती इमारतीवर अधिक एक माळा (चौथा माळा) बांधकामासाठी नगर रचना विभागाकडे बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २४. नवीन प्रसादालय इमारत बांधकाम ठेकेदार आय.व्ही.आर.सी. एल यांना मोबीलायझेशन ॲडव्हॉन्स मिळणेविषयी केलेल्या विनंती बाबत.**

**निर्णय क्र.७३५.** मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. ८०,८५ मध्ये संस्थानचे नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकाम ठेकेदार आय.व्ही.आर.सी.एल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस लि.,पुणे यांचे मार्फत करण्यात येत आहे. सध्या सदर इमारतीचे फुटींग, कॉलम, प्लींथ बिम यांचे काम चालू असून काही भागातील स्लॅबचे कॉंक्रीटींग करण्यात आले आहे. कम्पाउंड भिंतीचे सुमारे ५०% काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

उपरोक्त ठेकेदार यांनी दि. १८/०७/२००६ चे पत्राव्दारे असे कळविले आहे की, वरील प्रकल्पासाठी त्यांनी मटेरीअल, मनुष्यबळ व मशिनरीचे पूर्ण मोबीलायझेशन केलेले आहे. पंरतू सदर प्रकल्प हा वेगाने पूर्ण करावयाचा असल्याने त्यांना अधिक स्वरुपात साधनसामग्रीचे मोबीलायझेशन करणे आवश्यक असल्याने त्यासाठी करार रकमेच्या १०% इतका मोबीलायझेशन ॲडव्हान्स मिळावा अशी विनंती केली आहे. सदर ॲडव्हान्स रक्कम त्यांचे रनिंग बिलातून वसूल करण्यात यावी असे त्यांनी वरील पत्रात नमूद केले आहे. सदर कामाची करार रक्कम (Contract Value ) रु.१७,७७,९६,६४७.०० मात्र इतकी आहे. त्यानुसार १०% रक्कम रु.१,७७,७९,६६५.०० मात्र इतकी येते.

सदर कामाची निविदा व कार्यादेशामध्ये ठेकेदार यांना मोबीलायझेशन आदा करता येणार नाही असे नमूद केलेले आहे. याबाबत सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे.शक्ती परमार ॲण्ड असो.,मुंबई यांचा अभिप्राय मागविला असता त्यांनी दि. ०८/०२/२००६ रोजी फॅक्सव्दारे कळविल्यानुसार ठेकेदार यांनी मोबीलाझेशन करुन काम सुरु केलेले असल्याने सदर ॲडव्हान्सला मोबीलायझेशन ॲडव्हान्स असे म्हणता येणार नाही. त्याऐवजी सदर ॲडव्हान्स बँक गॅरंटीपोटी अदा करुन त्याची वसुली रनिंग बिलामधून करता येईल, असा अभिप्राय दिला आहे.

तरी आर्किटेक्ट यांचे अभिप्रायनुसार ठेकेदार यांना बँक गॅरंटीपोटी ॲडव्हान्स अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २५. हॉस्पिटलचे प्रशासकीय कार्यालय व कॉन्फरन्स हॉलबाबत.**

**निर्णय क्र.७३६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २६. HP कलर डॉप्लर प्रिंटर खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.७३७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २७. अ) मेडिकल स्टोअर्स बाबत.**

**ब) श्री साईबाबा रुग्णालयात संस्थानचे औषध दुकान चालू करणे बाबत.**

**निर्णय क्र.७३८. अ)** श्री राजेंद्र खिवराज मुथा, पुणे यांनी त्यांचे दिनांक २५.८.२००६ चे पत्राने श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये भाडे तत्वावर औषधाचे दुकान चालविणेबाबत दि. १९ मे २००६ रोजी करारनामा करुन दिला आहे. तसेच सदर दुकान चालू करणेसाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करण्याचे कामही सुरू केले आहे. दुकानांसाठी आवश्यक फर्निचर जूलै-२००६ मध्ये रु. १. लाख पंचवीस हजार मात्र खर्च करून बनविले आहे. व १ ऑगष्टपासून दुकान सुरू करणेबाबत त्यांची योजना होती,असे त्यांचे पत्रात म्हटले आहे.

तथापि, दि. २८ जूलै २००६ रोजी त्यांना संस्थान सदर दुकान चालविणेस इंटरेस्टेड असल्याने तूर्त दुकान सुरू न करणेबाबत दूरध्वनीवरून सूचना देण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच समक्ष चर्चेतूनही हेच निष्पण झाल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

श्री मुथा, यांनी संस्थान स्वतः मेडीकल दुकान चालवणार असल्यास-

**अ)** दि.१९ मे २००६ चा करारनामा रद्द करावा, त्याबाबत त्यांना तसे कळविणेत यावे.

**ब)** कराराचे वेळी त्यांनी भरलेली अनामत रक्कम त्यांना परत मिळावी. आणि

**क)** उपरोक्त दुकानांसाठी त्यांनी केलेला खर्च रु. १.लाख २५ हजार मात्र संस्थानखाती देणगी स्वरुपात वर्ग करणेचे सहकार्य करावे, अशी विनंती केली आहे.

सध्या साईबाबा हॉस्पिटल व्यवस्थित सुरु झाले असून त्यातील बहुतेक विभाग जवळजवळ पूर्णपणे सुरू झाले आहेत. उर्वरित विभागही लवकरच कार्यान्वीत होणार आहेत. मात्र हॉस्पिटलचे परिसरात औषध दुकान नसल्याने तसेच बाहेरील दुकाने २४ तास उघडी नसल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना विशेषतः रात्रीचे वेळी अपघात विभागात दाखल होणा-या रुग्णांच्या नातेवाईकांना त्रास सोसावा लागत आहे.

**ब)** श्री साईबाबा रुग्णालयात भाडे तत्वावर औषध दुकान चालवणेस देणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०१.०४.२००६ निर्णय क्र.२४८ अन्वये श्री.राजेंद्र खिवराज मुथ्था, चिंचवड , पुणे यांना दरमहा भाडे रु.२,७१,०००/- ने देणेबाबत निर्णय झालेला आहे.

त्यानुसार श्री.मुथ्था यांचेकडून रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर विहीत नमुन्यात करारनामा करुन घेणेबाबत ठरलेले आहेत. श्री.मुथ्था यांना इकडील पत्र क्र.५०१३ दि.१५.०४.२००६ अन्वये करारनाम्याचा मसुदा व कार्यादेश पाठवण्यात आला होता. त्यानुसार श्री.मुथ्था यांनी रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दि.२०.०५.२००६ रोजी करारनामा करुन दिलेला आहे.

त्यांनी सदर दुकान चालवणेकामी स्वत :चे फर्निचर तयार करुन घेतलेले आहे. तसेच संस्थानतर्फे लाकडी काऊंटर देखील तयार करुन झालेले आहे.

परंतू श्री.राजेंद्र खिवराज मुथ्था यांना संस्थानतर्फे दुकान प्रत्यक्षात चालू न करणेबाबत दि.२८.०७.२००६ रोजी दुरध्वनी आला होता असे त्यांनी त्यांचे दि.२५.०८.२००६ अन्वये कळविलेले आहे व त्यांनी संस्थानकडे असलेली अनामत रक्कम परत करणेबाबत मागणी केलेली आहे. त्यांनी केलेले औषध दुकानासाठीचे फर्निचर देणगी म्हणून देण्याचे देखील सदरच्या पत्रात कळविले आहे.

सदरचे दुकान संस्थानतर्फे चालविणेबाबत मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी दि.१७.०८.२००६ ला दुरध्वनीवरुन वैद्यकीय संचालक यांना कळविले आहे.

सदरचे दुकान संस्थानतर्फे चालवयाचे झाल्यास त्यास प्रथम अन्न व औषध प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचा परवाना मिळावा लागणार आहे. व त्यानंतरच दुकान रितसर चालू करता येईल. सदर परवाना मिळविणेकामी अन्न व औषध प्रशासन विभाग अहमदनगर यांचेकडून माहिती आणलेली आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करुन परवाना प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा लागेल.

०१. फॉर्म नं.१९ (किरकोळ व घाऊक परवान्यासाठी )

०२. फॉर्म नं.१९ बी (किरकोळ व घाऊक परवान्यासाठी )

०३. जादा माहिती पत्रक (हमी पत्र ) प्रत्येकाचे Appointment Letter, Register Copy.

०४. Card Index, जागा मालकी हक्का संबंधी कागदपत्रे, जागेचा उतारा , सि.टी. सर्व्हे किंवा ग्रामपंचायतची नमुना (८अ उतारा )

०५. टॅक्स पावती नगरपंचायत

०६. Allotment Letter जागेसंबंधी

०७. नकाशा दोन प्रत (लोकेशन पकडून )

०८. फ्रिज खरेदीची पावती .

०९. मेमोरंडम वुथ रजिष्ट्रेशन ॲटेस्टेड करुन जबाबदार व्यक्तीची सही.

१०. विश्वस्तांची यादी संपुर्ण पत्यासहित.

११. फार्मासिस्ट प्रतिज्ञा पत्र रु.२० स्टॅम्प पेपरवरती.

१२. प्रत्येक फार्मासिस्टचे नेमणुक पत्र (स्विकृत पत्र)

उपरोक्त प्रमाणे संस्थानतर्फे दुकान चालविण्याचे ठरलेस ते चोवीस तास चालू ठेवावे लागणार आहे. त्यासाठी खालील प्रमाणे कर्मचारीवृंद लागणार आहे.

| | | |
|---|---|---|
| १. सब मॅनेजर (स्टोअर) | - | ०१ |
| २. फार्मासिस्ट (कायम स्वरुपी ) | - | ०९ |
| ३. लिपीक (कायम स्वरुपी ) | - | ०३ |
| ४. संगणक ऑपरेटर | - | ०४ |
| ५. मदतनीस | - | ०४ |

वरील मागणी करतांना रजा सुट्टीच्या काळात आपसात व्यवस्था धरुन करण्यात आलेली आहे. सध्या नियुक्त केलेले फार्मासिस्ट हे औषध भांडार व बाह्यरुग्ण विभागात कार्यरत आहे. स्टोअर व बाह्यरुग्ण विभागातून आठ फार्मासिस्ट उपलब्ध होऊ शकणार नाही .त्यामुळे तेथील कामाची गैरसोय होईल . तेंव्हा नविन फार्मासिस्ट नियुक्त करणे गरजेचे आहे.तसेच इतर वरील प्रमाणे कर्मचारीवृंद वेगळे लागणार आहे.

सदरचे औषध दुकानासाठीची कार्यपध्दती व औषध खरेदीची पध्दत खालील प्रमाणे असावी असे मत आहे.

१. तेथे एक सब मॅनेजर (स्टोअर) औषध दुकान प्रमुख म्हणून ठेवावा लागणार असून त्यांचे मार्गदर्शनाखाली इतर फार्मासिस्ट व सर्व कर्मचारीसह काम करतील.

२. सब मॅनेजर यांनी दुकानात कोणकोणती औषधे ठेववयाची याबाबत श्री साईनाथ व साईबाबा रुग्णालयातील संबंधीत डॉक्टरांचे सल्यानुसार औषधे ठेवावी.

३. औषधे ही थेट उत्पादक कंपनीकडून/होलसेल विक्रेते यांचेकडून तेथील सब मॅनेजर यांनी जसजशी लागतील तशी कंपनी/अधिकृत विक्रेते यांचेकडून थेट दुरध्वनीवरुन हॉस्पीटल दराने व कंपनीचे स्किम प्रमाणे खरेदी करावीत. यासाठी कोटेशन/निविदा मागणीची पध्दत ठेवता येणार नाही , कारण या कार्यपध्दतीमुळे औषधे उपलब्ध होणेस विलंब लागेल व रुग्णांना औषधे वेळेवर मिळू शकणार नाही.

४. उपरोक्त खरेदीची बीले ही औषध दुकान विभागाने संगणकात प्रमाणित केल्यावर ती वित्तव्यवस्थापकामार्फत १५ दिवसाचे आत तातडीने अदा करणे गरजेचे आहे. किंवा जर आपण रोखीने संबंधीत पुरवठाधारकांस औषधे दुकानचे काऊंटरवरुन रक्कम अदा केल्यास कॅश डिस्काऊंट २ ते ३ टक्केपर्यंत मिळेल, ज्यामध्ये संस्थानचा फायदा होऊ शकेल. औषध दुकानांतून खरेदीदाराची रोखीने अदा केलेली बीले दररोज लेखाशाखेत भरणा करतेवेळी जमा करुन त्याची स्वतंत्र नोंद वही दोन्ही विभागात ठेवावी लागणार आहे.

५. औषधांची विक्री करतांनी आपणास ज्यादराने प्राप्त होतील ती अन्न व औषध प्रशासन यांनी वेळोवेळी घालवुन दिलेल्या नियमानुसार विक्री करावी लागतील.

६. औषधे विक्री संबंधी राज्य शासनाचे असलेले कराचे (टॅक्स) नियमाची अमंलबजावणी करावी लागणार आहे.

७. या दुकानासाठी अंदाजे रु.२५ लाख इतका वेगळा निधी ठेऊन त्यामधून औषधे खरेदी करण्यात येऊन त्याचा दर सहामाही हिशोब ( नफा-तोटा) औषध दुकान विभागाने द्यावा .

८. वॉर्डमध्ये दाखल असलेल्या रुग्णांना जी औषधे डॉक्टरांचे सल्यानुसार त्यांना दिलेली आहे परंतू जर त्याचा वापर झाला नाही किंवा डॉक्टरांनी ट्रिटमेंट बदलली. तर ती आपणास परत घ्यावे लागणार ती पुन्हा स्टॉक जमा करुन त्यांची विक्री करावी लागेल. उघडलेल्या स्थितीत अथवा अर्धवट वापरलेल्या स्थितीतील औषधे परत घेता येणार नाही.

९. संस्थानचे मध्यवर्ती भांडारातून औषधे ही श्री साईबाबा रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरसाठी व पॅकेज मधील रुग्णांसाठी वापरण्यात येऊन वॉर्डमधील रुग्णांना औषधे प्रिस्क्रीपशनवर लिहून देण्यात यावी.

१०. सदरचे औषध दुकानांत संस्थानचे दोन्ही रुग्णालया व्यतिरिक्त बाहेरुन येणाऱ्या कोणत्याही दवाखान्याचे प्रिस्क्रीपशनवरील औषधे देता येतील.

११. संस्थान कर्मचारी व त्यांचे अवलंबीतांसाठी लागणारी औषधे ही संस्थान कर्मचाऱ्यांने घेतल्यास त्यांने रोखीने बील अदा करुन नंतर संस्थानचे नियमावली प्रमाणे परताव्यासाठी रितसर मागणी करावी. तसेच कोणाचेही शिफारसीवरुन औषधे उधारीवर देण्याची अथवा सुट देण्याची व मोफत देण्याची पध्दत नसावी.

१२. वरील दुकानाचा परवाना मिळविणेकामी औषध दुकानाचे नांवे निश्चित करावे लागणार आहे. त्यासाठी खालील पर्याय सुचित करण्यात येत आहे.

अ) श्री साईबाबा संस्थान संचालीत श्री साईबाबा मेडीकल स्टोअर

ब) श्री साईबाबा संस्थान संचालीत श्री साईनाथ रुग्णालय स्टोअर

क) श्री साईबाबा संस्थान संचालीत श्री साई मेडीकल स्टोअर

ड) ) श्री साईबाबा संस्थान संचालीत ड्रग्ज स्टोअर

तरी उपरोक्त अ व ब बाबत निर्णय होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत श्री.राजेंद्र खि. मुथा हे समक्ष उपस्थित होते. त्यांनी त्यांचे पत्रान्वये रुग्णसेवेतून औषधे विक्रीच्या व्यवसायाद्वारे श्रीसाई महाराजांच्या सेवेची संधी मिळेल या सदहेतूने आपणास प्रामाणिकपणे व प्रांजळपणे कळवू इच्छितो की, जर माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन संस्थानच्या जुन्या मेडिकल सेंटरमध्ये १५ x २० स्केअर फुटाची जागा उपलब्ध करुन दिल्यास व औषधे विक्रीसाठीच्या व्यवसायाची परवानगी दिल्यास संस्थानचा ऋणी राहील. तसेच नविन वास्तूत रुग्णसंख्या वाढताच पुन्हा एकदा जोमाने, प्रामाणिकपणे, सचोटीने औषध विक्रीचा व्यवसाय आपल्या झालेल्या कराराप्रमाणे करण्यास बांधील राहील.,असे कळविले आहे.

सविस्तर चर्चा होऊन,संस्थानचे जुने रुग्णालयात औषधे विक्रीसाठी किमान १०x१० स्केअर फुट जागा श्री.राजेंद्र खि. मुथा यांना देण्यात यावी व नविन रुग्णालयातील दुकान त्वरित चालु करावे असे ठरले.यासाठी संबंधितांना उपसमितीचे समक्ष आमंत्रित करुन कालावधी व भाडे याबाबत निर्णय घेण्यात यावा (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २८. हॉस्पिटलमधील विविध कामांबाबत.**

**निर्णय क्र.७३९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २९. डॉ.श्यामकुंवर सुभाष श्रीराम यांच्या आईचे वैद्यकीय उपचाराचे बीला बाबत.**

**निर्णय क्र.७४०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३०. वार्षीक औषधे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.७४१.** याबाबत व्यवस्थापन समितीचे उपसमितीने अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३१. सेंट्रल गॅस पाईपलाईन कामाचे मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांचे बीलाबाबत.**

**निर्णय क्र.७४२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३२. फिलीप्स कंपनीचे मॉनिटर्स खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.७४३.** श्रीसाईबाबा रुग्णालयात कार्डीयाक रिकव्हरी रुममध्ये ठेवण्यासाठी लागणाऱ्या मॉनीटर्ससाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.०७.२००५ मंजुरी अन्वये मे.फिलिप्स मेडीकल,मुंबई यांना इकडील पत्र क्र.८३७३ दि.०८.०८.२००५ अन्वये १२ नग बेडसाईड मॉनिटर्सचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. सदर पुरवठा आदेशान्वये मे.फिलिप्स मेडीकल, मुंबई यांनी १२ नग मॉनिटर्सचा पुरवठा करुन ते रुग्णालयात बसवुन कार्यान्वीत करुन दिलेले आहेत.

सदरचे १२ मॉनिटर्स हे कार्डीयाक रिकव्हरी वॉर्ड व आय.सी.सी.यु. या दोन विभागात बसविण्यात आलेले आहेत. परंतु कार्डीयाक रिकव्हरीमध्ये एकुण १६ बेड असून आय.सी.सी.यु. मध्ये ८ बेड आहेत. याशिवाय एन.आय.सी.यु. मध्ये - ०८, कज्युएल्टीमध्ये - ०१ , कार्डीयाक रिकव्हरी वॉर्डमध्ये - ०९ असे एकुण १८ मॉनिटर्सची आवश्यकता आहे.

यापुर्वी आपण सदर मॉनिटर्स मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.०७.२००५ मंजुरी अन्वये मे.फिलिप्स मेडीकल, मुंबई यांचेकडून इकडील पत्र क्र.८३७३ दि.०८.०८.२००५ अन्वये १२ नग रु.२,४१,५४३/- या दराने खरेदी केलेले आहे. याबाबत कंपनीस विचारणा केली असता ते सदरील दराने पुरवठा करणेस तयार आहेत.

तरी उपरोक्त मंजुर दराने १८ नग मे. फिलिप्स मेडीकल, मुंबई यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रु.४३,४७,७७४/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३३. तातडीचे औषधे खरेदीस मंजूरी मिळणेबाबत**

**निर्णय क्र.७४४.(अ)**श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा, ऑपरेशन थिएटर विभाग व बाह्यरुग्ण विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जीकल मटेरियल, गोळ्या इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरियल शिर्डी, कोपरगांव, संगमनेर, श्रीरामपुर, पुणे येथून खरेदी केलेले आहेत. सदर औषधे, केमीकल, सर्जीकल मटेरियल इत्यादीची सन २००६-०७ या वार्षीक खरेदीमध्ये मागणी केलेली आहे. परंतू सदर औषधे उपलब्ध होणेस दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्याची आवश्यकता

असल्याने तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु २३,२३९.५६ मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे- ऑगस्टचे वैद्यकीय अधिक्षिका यांना असलेल्या दरमहा रु.१०,०००/- चे तरतुदी व्यतिरिक्त केलेली आहे. त्याची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे.

| Sr. No. | Name of Supplier | Bill No. & Date | Rs. | Paise |
|---|---|---|---|---|
| 1 | Vijay Medical & General, Shirdi | 15017/ 01.08.2006 | 250 | 00 |
| 2 | Vijay Medical & General, Shirdi | 15055/ 11.08.2006 | 118 | 00 |
| 3 | Vijay Medical & General, Shirdi | 15064/ 15.08.2006 | 304 | 00 |
| 4 | Life Line Surgicals, Kopargaon | 369/ 12.08.2006 | 1216 | 00 |
| 5 | Life Line Surgicals, Kopargaon | 450/ 30.08.2006 | 2340 | 00 |
| 6 | Vishvesh Enterprises,Sangamner | 596/ 01.08.2006 | 11592 | 00 |
| 7 | Vijay Trading Corporation,Shrirampur | 283/ 05.08.2006 | 72 | 56 |
| 8 | Kanchan Drugs,Pune | 4843/ 14.08.2006 | 7347 | 00 |
| | | Total | 23239 | 56 |

**(ब)** दि १५.०५.२००६ रोजी श्री साईबाबा रुग्णालय कार्यान्वीत करण्यात आले असून रुग्णालयात ॲन्जीओग्राफी, ऑन्जीओप्लास्टी कार्डीयाकसर्जरीच्या शस्त्रक्रिया तसेच प्लॅस्टीक सर्जरी, जनरल सर्जरी जनरल ॲन्जीओग्राफी, ऑन्जीओप्लास्टी कार्डीयाक वार्ड सुध्दा कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदर वार्ड मध्ये काही वार्ड नवीनच कार्यान्वीत करण्यात आल्याने सदर वार्ड मध्ये लागणारी औषधे सर्जीकल साहित्य, जी आपल्याकडे उपलब्ध ती आपणास नाशिक, मुंबई, कोपरगाव, संगमनेर, शिरडी, औरंगाबाद आणि पुणे येथून उपलब्ध करावी लागली आहे. मा. व्यवस्थापन समीतीचे दिनांक ०३/०६/२००६ चे सभेत वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,००,०००/- चे तरतूदीतून केलेली आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Vijay Medical Stores, shirdi | 15093 | 22/04/2006 | 36.00 |
| 2 | Vijay Medical Stores, shirdi | 15074 | 17/08/2006 | 1,050.00 |
| 3 | Vijay Medical Stores, shirdi | 15073 | 17/08/2006 | 210.00 |
| 4 | Vijay Medical Stores, shirdi | 1550 | 10/08/2006 | 2,010.00 |
| 5 | Vijay Medical Stores, shirdi | 15086 | 21/08/2006 | 100.00 |
| 6 | Vijay Medical Stores, shirdi | 15079 | 19/08/2006 | 132.00 |
| 7 | Vijay Medical Stores, shirdi | 15076 | 17/08/2006 | 38.00 |
| 8 | Vijay Medical Stores, shirdi | 15036 | 05/08/2006 | 772.00 |
| 9 | Vijay Medical Stores, shirdi | 15053 | 11/08/2006 | 748.00 |
| 10 | Vijay Medical Stores, shirdi | 15034 | 05/08/2006 | 2,099.00 |
| 11 | Life Line Surgical, Kopargoan | 389 | 19/08/2006 | 2,463.00 |
| 12 | Life Line Surgical, Kopargoan | 454 | 30/08/2006 | 1,650.00 |
| 13 | Life Line Surgical, Kopargoan | 365 | 05/08/2006 | 4,350.00 |
| 14 | Life Line Surgical, Kopargoan | 362 | 04/08/2006 | 5,129.00 |
| 15 | Kanchan Drugs, Pune | 5008 | 18/08/2006 | 222.00 |
| 16 | Kanchan Drugs, Pune | 5007 | 18/08/2006 | 1,997.00 |
| 17 | Kanchan Drugs, Pune | 4587 | 05/08/2006 | 5,544.00 |
| 18 | Devi Surgicals, Ahmednagar | 44 | 22/07/2006 | 1,000.00 |
| 19 | Devi Surgicals, Ahmednagar | 51 | 08/08/2006 | 1,465.00 |
| 20 | Universal Chemicals, Nashik | 5472 | 03/08/2006 | 3,150.00 |
| 21 | J.S.P. Surgicals, Nashik | 7674 | 05/08/2006 | 680.00 |
| 22 | J.S.P. Surgicals, Nashik | 7675 | 05/08/2006 | 120.00 |
| 23 | J.S.P. Surgicals, Nashik | 7677 | 10/08/2006 | 15,712.00 |
| 24 | Shree Graphics, Kopargoan | 120 | 18/08/2006 | 1,325.00 |
| 25 | Archana Surgicals, Mumbai | 6 | 18/08/2006 | 3,000.00 |
| 26 | Pharmacea Link,Pune | 6193 | 04/08/2006 | 8,090.00 |
| 27 | Centenial Surgical, Thane | 467 | 11/08/2006 | 7748.00 |
| 28 | The Parel Chemists, Mumbai | 8021 | 16/08/2006 | 540.00 |
| 29 | Rujikon Enterprises, Mumbai | 814 | 14/08/2006 | 7,520.00 |
| 30 | Bhagwati Distributor, Nashik | 362 | 16/08/2006 | 13,659.00 |
| 31 | Cosmos Enterprises, Mumbai | 210 | 18/08/2006 | 2,080.00 |
| 32 | Pharmaco, Pune | 3328 | 01/08/2006 | 429.00 |
| 33 | Sai Pharma agencies, Sangamner | 20738 | 19/08/2005 | 352.00 |
| 34 | Farmachem enterprises, Pune | 2002 | 24/08/2006 | 3,197.00 |
| 35 | Abhinav Agencies, Nashik | 200 | 17/08/2006 | 404.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | Total | 99,021.00 |

**(क)** श्री साईबाबा रुग्णालयात बायपास शस्त्रक्रिया चालू झालेल्या असून या शस्त्रक्रियेसाठी आपणाकडे मुंबईचे प्रसिध्द कार्डीयाक सर्जन डॉ.भट्टाचार्य हे दि.१९.०८.२००६ रोजी शिर्डी येथे येऊन त्यांनी आपले रुग्णालयात सदरच्या दोन शस्त्रक्रिया केल्या आहे. सदर शस्त्रक्रियेसाठी डॉ.भट्टाचार्य यांनी त्यांना लागणाऱ्या औषधांची यादी दिलेली होती. सदर यादीतील उपलब्ध असणारी औषधे आपण त्यांना पुरविलेली होती. तसेच जे औषधे आपणाकडे शिल्लक नव्हते व ऐनवेळी कळविले होते ते आपण त्यांना कोपरगांव ,पुणे आणि मुंबई येथून तातडीने खरेदी केलेली आहे. त्यासाठी रु.२,२०,३२७.७५ मात्र खर्च आलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Lifeline Surgical,Kopargaon | 379 | 16.08.2006 | 12262.00 |
| 2 | Kanchan Drugs Pvt,Ltd.,Pune | 4844 | 14.08.2006 | 80700.00 |
| 3 | Kanchan Drugs Pvt,Ltd.,Pune | 1192 | 17.08.2006 | 32080.00 |
| 4 | The Parel Chemists,Mumbai | 8015 | 16.08.2006 | 75535.75 |
| 5 | Hi-Tech Surgical Systems,Mumbai | 2431 | 18.08.2006 | 10400.00 |
| 6 | Hi-Tech Surgical Systems,Mumbai | 2399 | 17.08.2006 | 9350.00 |
| | | | **Total Amt.in Rs.** | **220327.75** |

**(ड)** श्री साईबाबा रुग्णालयात बायपास शस्त्रक्रिया चालू झालेल्या असून आपल्या रुग्णालयाचे कार्डीयाक सर्जन डॉ.विद्युत सिन्हा दैनंदिन शस्त्रक्रिया करतात तसेच कार्डीयाक सर्जन डॉ.वालिया हे देखील दर शनिवारी शस्त्रक्रिया करणेसाठी येतात. सदरचे शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या औषधांची यादी दिली होती. त्यातील उपलब्ध असणारी औषधे पुरविलेली आहे आणि उपलब्ध नसणारी औषधे आपण कोपरगांव,नाशिक,पुणे येथून माहे जुलैमध्ये खरेदी केली आहेत. त्यासाठी रु.१,५०,०२१.४० मात्र खर्च आलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Lifeline Surgical,Kopargaon | 305 | 22.07.2006 | 89147.00 |
| 2 | Lifeline Surgical,Kopargaon | 308 | 22.07.2006 | 20061.00 |
| 3 | Lifeline Surgical,Kopargaon | 303 | 20.07.2006 | 8749.00 |
| 4 | Lifeline Surgical,Kopargaon | 300 | 19.07.2006 | 11983.56 |
| 5 | Lifeline Surgical,Kopargaon | 306 | 22.07.2006 | 8497.00 |
| 6 | Kanchan Drugs Pvt,Ltd.,Pune | 3847 | 18.07.2006 | 10884.00 |
| 7 | Smt.Nirmala & Shri Jamnadas Dinani Charitable Trust., Nashik | 178 | 14.07.2006 | 233.28 |
| 8 | Smt.Nirmala & Shri Jamnadas Dinani Charitable Trust., Nashik | 179 | 14.07.2006 | 233.28 |
| 9 | Smt.Nirmala & Shri Jamnadas Dinani Charitable Trust., Nashik | 180 | 14.07.2006 | 233.28 |
| | | | **Total Amr.in Rs.** | **150021.40** |

तरी उपरोक्त अ,ब,क,ड मध्ये प्रस्तावित केलेप्रमाणे तातडीचे औषधे खरेदी केलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी असे सांगितले की, वार्षिक औषधे खरेदीकामी हार्ट व्हाल्व,स्टेन्ट, बलून इत्यादी महागडे साहित्यांसाठी ज्यांचे दर प्राप्त झालेले आहे त्यामधून जसजसे लागतील तसे आवश्यकतेनुसार व रुग्णांचे मागणीनुसार खरेदी करण्यात यावेत व ते रुग्णांस वापरण्यात यावी. असे महागडे हार्ट व्हॉल्व,स्टेन्ट बलून इत्यादी करीता पॅकेजमध्ये (अॅन्जीओप्लॅस्टीसाठी कार्डियाक कन्झुमेबल अंदाजे किंमत रुपये २४,००० व स्टेन्ट रुपये २६००० एकूण ५०,०००.००) हार्ट व्हॉल्ह बदलणेसाठी कार्डीयाक कन्झुमेबल ५०,०००.०० व व्हॉल्व्हची किंमत रुपये २५,०००.०० इतकी निश्चित करण्यात आलेली आहे. या दरापेक्षा जास्त किंमत संस्थानला द्यावी लागली तर ती जास्तीची रक्कम रुग्णांकडून वसूल करण्यात यावी असे सभेपुढे सांगितले. यावर सविस्तर चर्चा होऊन पॅकेजमध्ये योग्य ती वाढ करण्यात यावी असे ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३४. श्री साईबाबा रुग्णालयात इ.एन.टी. बाहयरुग्ण विभाग व शस्त्रक्रिया गृहासाठी हत्यारे / उपकरणे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.७४५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३५. प्रयोगशाळा विभागाकरीता किरकोळ साहित्य खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.७४६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३६. कुपोषित बालकांवरचे शिबीरासाठीचे औषधे खरेदीस मंजूरी मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.७४७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३७. डोळयांचे तपासणी शिबीरासाठी तातडीचे औषधे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.७४८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३८. धर्मशाळा येथील शौचालय, स्नानगृह व गादी चादर कंत्राटाबाबत.**

**निर्णय क्र.७४९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३९. डॉ.एम.विमला शर्मा व्दारा तेलगू भाषेतून रुपांतरीत केलेले ले.कर्नल मु.ब.निंबाळकर लिखित श्री साईचे सत्यचरित्र प्रकाशित करणे बाबत.**

**निर्णय क्र.७५०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४०. सुमोना बागची कृत रुपांतरीत बंगाली भाषेतून रुपांतरीत श्री साई सगुणोपासना आरती पुस्तक प्रकाशित करणे बाबत.**

**निर्णय क्र.७५१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता खरेदी करावयाच्या संगणकाबाबत.**

**निर्णय क्र.७५२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४२. श्री साईबाबांचे अभ्यंगस्नानाबाबत**

**निर्णय क्र.७५३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४३. श्री समाधी मंदीर व परिसराच्या कडेला असलेल्या कास्टींग आयर्न कम्पाऊंडला आतून सुरक्षीततेसाठी लोखंडी बारीक जाळी बसविणेकामी आलेल्या कोटेशन्स उघडून निर्णय घेणे**

**निर्णय क्र.७५४.** श्री समाधी मंदिर परिसराच्या कडेला असलेल्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेबाबत मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी सूचना दिल्या आहेत.

श्री समाधी मंदिर परिसराच्या कडेला असलेल्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेसाठी रु. ९,५२,१७४.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९-०८-२००६ चे झालेल्या स्थानिक विश्वस्तांचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. या सभेतील विषय क्र.५८ निर्णय क्र. ५८७ अन्वये या प्रस्तावास तसेच येणा-या खर्चास मान्यता मिळाली असून या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेचा निर्णय झालेला होता व त्यअन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०४ टेंडर प्राप्त झाले आहेत. टेंडर तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | निविदा सादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१) | मे. सुयश इंजिनिअरींग, ठाणे |
| ०२) | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०३) | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०४) | मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस्, ॲण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर. |

उपरोक्तप्रमाणे श्री समाधी मंदिर परिसराच्या कडेला असलेल्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेकामी प्राप्त झालेले टेंडरस मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६-०९-२००६ चे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्याचे नांव | टेंडरमधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे. सुयश इंजिनिअरींग, ठाणे | २१,२२,६९५.०० | अनुपस्थित |
| ०२. | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | १६,०७,०००.०० | ११,२४,९००.०० |
| ०३. | मे.साई इंजिनिअर्स , अंबड | १६,९४,२७२.०० | १५,२४,८४५.०० |
| ०४. | मे.रविंद्र रबर प्रॉडक्टस ॲण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर. | ११,८३,८८३.६२ | ९,७०,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, निम्नतम दर दिलेले मे.रविंद्र रबर प्रॉडक्टस ॲण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-विद्युत् विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४४. शिर्डी नगरपंचायत,शिर्डी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर (पथकर)बाबत.**

**निर्णय क्र.७५५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४५. श्री जगदिश दशवाणी व इतर विरुध्द प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग या रिट पिटीशनचे वकील फी बाबत.**

**निर्णय क्र.७५६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४६. हैद्राबाद शहरातील २६ वर्षापूर्वी स्थापन झालेले श्री साई मंदिर संस्थानने ताब्यात घेणेबाबत श्री कु.एम.मणी यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.७५७.** कु. एम. मणी , वय वर्षे - ७६ , राहणार- सदगुरु श्री साईबाबा मंदीर १९-५-४८२/ए/८१ किशन बाग, हैद्राबाद ६४ यांचा दिनांक २१/०८/२००६ रोजीचा अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेला असून त्यांचे वय वर्षे ७६ असून त्या वयाच्या १० व्या वर्षापासून बाबांचे भक्त आहे. त्यांचे वडील कै. एम. सीतारामा राव हे सुध्दा बाबांचे निस्सीम भक्त होते व त्यांच्या प्रेरणेने ते बाबांच्या भक्तीमार्गात रमले. श्री बाबांची सेवा करण्याचे उद्येशाने त्यांनी सर्व आयुष्य घालवावयाचे ठरविले त्या निमित्ताने अनेक वर्ष शिर्डीत वास्तव्य केले. श्री साईसचरित्र ( मराठी ) ग्रंथाचे अनेक पारायणे केले व बाबांच्या लिला त्यांच्या हजारो तेलगू भक्तांनाही अवगत व्हाव्या म्हणून या मराठी ग्रंथाचे तेलगू भाषेत भाषांतर केले. ते संस्थानने छापून प्रसिध्द केले, त्याबद्यल संस्थानचे ऋुणी आहे असे त्यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

त्यांनी बाबांच्या सेवेसाठी हैद्राबाद शहरात १९८४ मध्ये साई मंदिराचे बांधकाम चालू करुन १९८६ मध्ये बाबांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली हया ,मंदिराचा तपशिल खालीलप्रमाणे

१) मंदिराच्या प्लॉटचे वर्णन - १५०० चौ.मीटर

२) बांधकाम मंदिर - ६० x ५० चौ. फुट ( प्लींथ एरिया ) १२ x१२ चौ. फुट - श्री राजा राजेश्वरी देवी, पंचायतन मंदीर

३) पत्ता - श्री सदगुरु साईबाबा मंदीर, १५-५-४८२/ए८१, कीशन बाग हैद्राबाद- ६४

माझ्यानंतर ही सर्व मालमत्ता आपण - श्री साईबाबा संस्थानने - ताब्यात घ्यावी व त्याचे पावित्र्य राखावे व मंदिराची व्यवस्था जतन जपणूक मालक म्हणून करावी. हैद्राबाद शहरातील भक्तांची दर्शनाची सोय करावी. असे त्यांनी प्रस्तुतचे अर्जात नमुद केलेले असून प्रस्तुत मालमत्ता त्यांचे मातुल घराण्यातून मिळालेली आहे. त्या संपत्तीतून उपरोक्त मंदिराची उभारणी केलेली आहे. ते अविवाहीत आहे. कोणी वारसदार नाही, एक भाऊ व एक बहिण असून हया मालमत्तेमध्ये त्यांचा काहीही हक्क,अधिकार वा वाटा नाही. कायदेशीरपणे याबाबत माझ्या भावाचे व बहिणीचे लेखी म्हणणे सोबत जोडीत आहे असे अर्जात म्हटलेले आहे - परंतु या पत्रासोबत त्यांनी त्यांचे कोणतेही लेखी म्हणणे जोडलेले नाही. तसेच मिळकतीची मालकी दर्शविणारे कोणतेही कागदपत्र प्रॉपर्टी उतारा जोडलेला नाही.

हैद्राबाद येथील बाबांचे मंदिर आपण श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था यांनी मालक म्हणून ताब्यात घ्यावी अशी अर्जाव्दारे विनंती केलेली आहे.

तसेच कु.एम. मणी , हैद्राबाद यांचे दिनांक २१/०८/२००६ रोजीचे पत्राबाबत संस्थानचे मा. विश्वस्त डॉ एकनाथराव भा. गोंदकर, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी यांचे दि. २५/०८/२००६ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून त्यात त्यांनी कु. एम. मणी , हैद्राबाद यांनी दिनांक २१/०८/२००६ चे पत्रान्वये हैद्राबाद येथे किसनबाग भागात सदगुरु श्री साईबाबा मंदीर १९८६ मध्ये बांधलेले आहे. सध्या श्रीमती मणी यांचे वय ७६ वर्षे असून त्या अविवाहीत आहेत. त्यांना कुणीही वारसदार नाही. सदर मंदिराचे बांधकाम त्यांनी स्वतःचे पैशातून केलेले आहे .त्यांना कुणीही वारसदार नसल्याने त्यांचे नंतर सदर मंदिराचा ताबा श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी यांनी मालक म्हणून घ्यावा. अशी त्यांनी विनंती केली आहे.

तसेच श्री साईबाबा मंदिराचे पावित्र्य राखणे, तसेच जतन व जपणुक करणे हे संस्थानचे कर्तव्य आहे. त्यासाठी काही विश्वस्तांची त्याकामी पाहणी करणेसाठी कमेटी करुन निर्णय घेण्यास हरकत नाही असे म्हटलेले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कु.एम.मणी यांचे अर्जानुसार हैद्राबाद येथे जाऊन प्रत्यक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४७. महाबळेश्वर मधोत्पादक सोसायटी , महाबळेश्वर यांना देण्यात आलेल्या गाळयास मुदतवाढ देणे बाबत.**

**निर्णय क्र.७५८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४८. "एक गांव एक गणपती" खर्चा बाबत**

**निर्णय क्र.७५९.** अध्यक्ष, वंदेमातरम् संघटना, शिर्डी यांनी दि.०४/०९/२००६ रोजीचे पत्रान्वये शिर्डी शहरातील सर्व मान्यवर, गणेश उत्सव मंडळे व शिर्डी ग्रामस्थ यांची शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये गणेशोत्सवनिमित्त झालेल्या बैठकीत "**एक गांव एक गणपती**" साठी वंदेमातरम् संघटनेची निवड करण्यात आली असून त्यानुसार शिर्डी गणेशोत्सव २००६ चे आयोजन करण्यात आले त्यात विविध सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक प्रबोधनपर कार्यक्रम संपन्न करण्यात आले. याबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी संपर्क साधला होता व झालेल्या कार्यक्रमांसाठी खालील स्वरुपातील सहकार्य मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | खुले नाट्यगृहासमोरील जागेत मंडप, स्टेज, लाईट डेकोरेशन, मॅटीन, कमान,साऊंड सिस्टीम इ.चा खर्च (दि.२७/०८/२००६ ते दि.०६/०९/२००६ अखेर) | ३२,५००.०० |
| ०२ | कीर्तन जुगलबंदी (धार्मिक कार्यक्रम ) | ०९,०००.०० |
| ०३. | हास्य धारा (सामाजिक प्रबोधनपर कार्यक्रम) | ०२,५००.०० |
| ०४. | भारुड कार्यक्रम (सांस्कृतिक कार्यक्रम) | ०२,१००.०० |
| ०५. | नाटक-मालकीण मालकीण दार उघड (सांस्कृतिक कार्यक्रम) | ०२,५००.०० |
| | एकूण रुपये | ४८,६००.०० |

उपरोक्तप्रमाणे विविध कार्यक्रमासाठी रु. ४८,६००/- (अक्षरी रु. अठ्ठेचाळीस हजार सहाशे मात्र ) इतका खर्च झालेला असून सदरचा खर्च संस्थानमार्फत मिळावा, अशी विनंती केलेली आहे.

सदर बैठकीस संस्थानला बोलाविले होते किंवा नाही, याबाबतीत कुठलाही उल्लेख नाही, तसेच संस्थानकडून मदत १०० टक्के मिळणारच असे ग्राह्य धरुन वंदेमातरम् या संघटनेने उपरोक्तप्रमाणे झालेला खर्च संस्थानकडून मागितलेला आहे. संस्थानमार्फत या कार्यक्रमासाठी साऊंड सिस्टीम, लाईट कनेक्शन, लाईटच्या माळा, मिरवणूकीसाठी ट्रॅक्टर, जनरेटर, शोभेच्या कुंड्या, संस्थानचे स्टेज व जीना इ.ची मदत करण्यात आलेली आहे. त्यांनी रकमेची मागणी केलेली आहे, तथापि त्यांची बिले, व्हाऊचर्स इ. सोबत जोडलेले नाहीत. तसेच शिर्डी ग्रामस्थांनी व शिर्डी ग्रामपंचायतीने कोणत्याप्रकारचे सहकार्य केले याबाबत कोणताही उल्लेख नाही. संबंधीतांनी " एक गांव एक गणपती " अंतर्गत आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे मानधनही मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

मागिलवर्षी " एक गांव एक गणपती " अंतर्गत फक्त मंडप बील अदा करण्यात आले होते.

तरी " एक गांव एक गणपती " अंतर्गत उपरोक्तप्रमाणे झालेला रु. ४८,६००/- (अक्षरी रु. अठ्ठेचाळीस हजार सहाशे मात्र) चा खर्च अध्यक्ष, वंदेमातरम् संघटना, शिर्डी यांना देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४९. श्री.संत आसाराम बापू सत्संग कार्यक्रमाबाबत.**

**निर्णय क्र.७६०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५०. शिधा सामुग्री मिळणेबाबत श्री रामप्रसाद दगडू मगर, समस्त गावकरी मंडळी, गोगलगांव यांचे अर्जाबाबत**

**निर्णय क्र.७६१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५१. शिधा सामुग्री मिळणेबाबत श्री पोपट भागवत वाणी,सरपंच ग्रामपंचायत कार्यालय,नांदूर्खी व श्री सुरेश द. ओझा,अध्यक्ष,अध्यक्ष श्री गणेश देवस्थान ट्रस्ट,गणेशखिंड,वांगी ता.श्रीरामपूर यांचे अर्जाबाबत**

**निर्णय क्र.७६२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५२. शिधा सामुग्री मिळणेबाबत श्री बंडू नाना वाबळे,अध्यक्ष मारुतीबाबा भजनी मंडळ ता.राहाता यांचे अर्जाबाबत .**

**निर्णय क्र.७६३.** खालील भजनी मंडळींनी मा.कार्यकारी अधिकारीसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री बंडू नाना वाबळे, अध्यक्ष, मारुतीबाबा भजनी मंडळ, ता. राहाता, जिल्हा-अहमदनगर | ह.भ.प.मारुतीबाबा चव्हाण, यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड भागवत हरिनाम सप्ताह, दि.१२/०९ ते दि.१९/०९/०६ अखेर होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

श्री बंडू नाना वाबळे, अध्यक्ष, मारुतीबाबा भजनी मंडळ, ता. राहाता, जिल्हा-अहमदनगर यांना मागील वर्षी रु. २५,०००/- पर्यंतची शिधास्वरुपाची मदत करण्यात आलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे. त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

तरी श्री बंडू नाना वाबळे, अध्यक्ष, मारुतीबाबा भजनी मंडळ, ता. राहाता, जिल्हा-अहमदनगर यांना ह.भ.प.मारुतीबाबा चव्हाण यांचे पुण्यतिथीनिमित्त अखंड भागवत हरिनाम सप्ताह, दि.१२/०९ ते दि.१९/०९/०६ अखेर होणार असून दि.१९/०९/२००६ रोजीचे महाप्रसादासाठी रु.२५,०००/-मात्र रकमेपर्यंतची शिधास्वरुपातील मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५३. श्रीक्षेत्र पुणतांबा येथे भाविकांच्या सोयीसाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.७६४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५४. श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट,शिर्डी यांना मंदिराचे अपूर्ण बांधकाम व इतर कामास आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.७६५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५५. कु.प्रविण तराचंद मेहेरखांब, रा.सुरेगांव ता.कोपरगांव यांचा उच्च शिक्षणासाठी अर्थिक मदत मिळणेबाबतचा अर्ज**

**निर्णय क्र.७६६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५६. श्री विठ्ठल सखाहरी महाराज ट्रस्ट यांना मंदिर बांधकामासाठी अर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.७६७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५७. लायन्स मूक बधीर व अपंग विद्यालय, कोपरगांव यांना संगणक देणे बाबत.**

**निर्णय क्र.७६८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५८. विद्यालयाचे इमारतीचे बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.७६९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५९. शिबीरासाठी आर्थिक अनुदान मिळणेबाबत, श्री.राजेंद्र ए. विखेपाटील विश्वस्त व सेक्रेटरी प्रवरा मेडिकल ट्रस्ट, प्रवरानगर यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.७७०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६०. श्रीसाईबाबांच्या मंदीराच्या गाभाऱ्यातील श्रींच्या मूर्तीच्या दक्षिण व उत्तर बाजूच्या भिंतीवर चांदीचे नक्षीकाम पत्रा बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.७७१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६१. मौजे पांढूर्ली ता.सिन्नर येथील बक्षिसपत्राने मिळालेल्या जागेत पालखी थांबा उभारणे बाबत.**

**निर्णय क्र.७७२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६२. संस्थान आस्थानेवरील अपंग कर्मचाऱ्यांना सुधारित दराने वाहतूक भत्ता देणे बाबत.**

**निर्णय क्र.७७३.** महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहभ-१००३/प्रक्र.६४/सेवा-५ मंत्रालय,मुंबई ३२ दिनांक २ ऑगस्ट २००४ अन्वये अंध, हातापायाच्या विकलांगतेसहित अस्थीव्यंगामूळे अधू किंवा कण्याच्या विकाराने पिडीत असलेले राज्य शासकीय कायम आस्थापनेवरील (कार्यव्ययी आस्थापनेसह) कर्मचारी व इतारांना विशेष वाहन भत्ता बंद करुन त्याऐवजी क्र.१०९८ दिनांक १४.१२.१९९८ चे शासन निर्णयांत विहित केलेल्या अटीच्या अधीन राहून सर्वसाधारण कर्मचाऱ्यांसाठी विहीत करण्यात आलेल्या दराच्या दुप्पट दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात आला आहे. मात्र कर्तव्यस्थानापासून एक किलो मिटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकच परिसर असेल अशा ठिकाणी राहण्याऱ्या कर्मचाऱ्यांना हा भत्ता सर्वसाधारण कर्मचाऱ्यांसाठी लागू असणाऱ्या दरानेच मंजूर करण्यात आला आहे.

उपरोल्लिखित कर्मचाऱ्यांच्या वाहतूक भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याची मागणी काही काळ शासनाच्या विचाराधिन होती. शासन आता असे आदेश देत आहे की, अंध, हातापायाच्या विकलांगतेसहित अस्थीव्यंगामुळे अधू किंवा कण्याच्या विकाराने पीडत असलेले राज्य शासकीय कायम आस्थापनेवरील (कार्यव्ययी आस्थापनेसह) कर्मचारी व ज्यांना यापूर्वी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना शासन निर्णय क्र.१०९८ दि.१४/१२/१९९८ मध्ये अ.क्र.६ येथील शासन निर्णयातील परिच्छेद २ (पांच) मध्ये विहीत केलेलया दरांऐवजी खालील तक्त्यात दर्शविलेल्या दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात यावा.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर रुपये | |
|---|---|---|---|
| | | अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणी |
| ०१. | रुपये ८०००-१३५०० किंवा त्याहून वरच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी- | १,६००/- | ८००/- |
| ०२. | रुपये ६५००-१०५०० किंवा त्याहून वरच्या परंतू रुपये ८०००-१३५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी- | ८००/- | ५००/- |
| ०३ | रुपये ६५००-१०५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी- | ५००/- | ५००/- |

**०१.** अपंगत्वासंबंधी यापूर्वी विहीत करण्यात आलेल्या अटींसह उर्वरीत अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून वरीलप्रमाणे वाहतूक भत्ता मंजूर करण्यात येईल.

**०२.** कर्तव्यस्थानापासून एक किलोपासून अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहाणाऱ्या कर्मचाऱ्यांना वरील तक्त्यात नमूद केलेल्या दराच्या निम्म्या दराने, मात्र अशा प्रकारे दर निम्मा केल्याने तो रुपये ५००/-पेक्षा कमी होत असल्यास, किमान रुपये ५०० या दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात येईल.

**०३.** ज्या कर्मचाऱ्यांना शासकीय वाहन पुरविले आहे, त्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

**०४.** हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू असतील.

सध्या पुर्वीच्या मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२-३/१२/२००० रोजीचे सभेतील निणय्र क्र.४५७ नुसार शिर्डी नगरपंचायतीचे हद्दीबाहेर राहणाऱ्या संस्थान कर्मचाऱ्यांना तसेच मुंबई येथील कार्यालयात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना दि.१/१/२००१ पासून वाहतूक भत्ता देण्यात येत आहे. शिर्डी नगरपंचायत हद्दीचे आंत राहणाऱ्या कुणाही सामान्य तसेच अपंग कर्मचाऱ्यांना सुद्धा वाहतूक भत्ता देणेत येत नाही.

आता,संस्थान आस्थापनेवर काम करीत असलेल्या अपंग कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: वाहभ-१००३/प्र.क्र.६४/सेवा-५,मंत्रालय,मुंबई-०३२ दि.२ ऑगष्ट,२००४ सुधारित निर्णयानुसार वाहतूक भत्ता देणेकामी जा.नं.एसएसएस-वशी-०१-१७२७-२००६,दि.२६.७.२००६ अन्वये संस्थान आस्थापनेवर असलेल्या अपंग कर्मचाऱ्यांची माहिती मागविण्यात आली असून, ती संख्या व इतर माहिती पुढील प्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **कर्मचारी राहात असलेली ठिकाणे** | **कर्मचारी संख्या** | **प्रत्येकी देय रक्कम रुपये** | **एकूण रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१. | शिर्डी नगरपंचायतीचे हद्दीबाहेर राहाणारे अपंग कर्मचारी (सध्या रु.७५/- प्रमाणे वाहतूक भत्ता देण्यात येता) | ०२ | ५००/- | १,०००/- |
| ०२. | शिर्डी नगरपंचायतीचे आत राहाणारे अपंग कर्मचारी | ०७ | ५००/- | ३,५००/- |

तरी शासन निर्णयाप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील अपंग कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील अपंग कर्मचाऱ्यांना शासकीय निर्णयानुसार वाहतूक भत्ता देण्यात यावा, असें ठरले. (कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६३. रिट पिटीशन नं.३९५१/२००६ श्री उत्तमराव रंभाजी शेळके विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर**

**निर्णय क्र.७७४.** प्रस्तुतचे रिट पिटीशन उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे श्री.उत्तम रंभाजी शेळके विरुध्द स्टेट ऑफ महाराष्ट्र असे दाखल असून सदर रिट पिटीशनमध्ये मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य शिक्षण खाते, मा.कलेक्टर, जिल्हा परिषद, दि डेप्युटी डायरेक्टर एज्युकेशन नाशिक, जिल्हा परिषद अहमदनगर, शिक्षण अधिकारी, प्रथामिक, जिल्हा परिषद, अहदनगर, मा.धर्मादाय आयुक्त मुंबई व श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था करिता मा. कार्यकारी अधिकारी (क्र.०७) यांना सामनेवाले प्रतिवादी सुरुवातीस केलेले आहेत. त्यानंतर मा. विश्वस्तांना प्रतिवादी नं.०९ ते २० अशी दुरुस्ती रिट पिटीशन मध्ये करुन संस्थानचे मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांना प्रतिवादी नं. ०९ ते २० व २३ ते २७ असे पक्षकार करण्यात आलेले आहे. मा.विश्वस्तांना त्याबाबतची नोटीसा पोहच आहेत. नगरपंचायत शिर्डी यांना प्रतिवादी नं.२१ तसेच श्री.सलीम शहा यास प्रतिवादी नं.२२ केलेले आहे.

जिल्हा परिषद शाळा, अतिक्रमित दुकानदारांचे दुकानगाळे बांधकाम, आरक्षण क्र. ९,१०,८ संदर्भातील प्रस्तुतचे रिट पिटीशन असून उपरोक्त रिट पिटीशनमध्ये अर्जदाराने शासन निर्णय क्रमांक
०१) दिनांक- १४.०८.२००२
०२) दिनांक- १२.०४.२००५ तसेच

संस्थानचे दिनांक १.९.२००४ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये जिल्हा परिषद शाळेच्या संदर्भात झालेल्या ठरावास आवाहन दिलेले आहे. सदरचे रिट पिटीशनमध्ये मा.सरकार, नगरपंचायत यांनी त्यांचे शपथपत्र (म्हणणे) दिलेले आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचेकरिता श्री.आर.एन.धोर्डे यांना वकीलपत्र दिले असून ते संस्थान करीता काम पहात आहे. रिट पिटीशनमध्ये संस्थानचे इतर विश्वस्तांनाही सामील केलेले आहे प्रस्तुत प्रकरणी मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा.श्री.विखे पाटील यांचे समितीने अंतिम निर्णय घ्यावा असे व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.८.२००६ चे सभेतील निर्णयस क्र.६६८ अन्वये ठरले आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,अधिनियम-२००४ चे कलम २३ प्रमाणे "संस्थान विश्वस्तव्यवस्था किंवा समिती यांनी दाखल केलेले किंवा त्यांच्याविरुध्द दाखल केलेले सर्व दावे व इतर कायदेशीर कार्यवाही यामध्ये. युक्तिवादाच्या कागदपत्रावर कार्यकारी अधिकारी सही करील व ते सत्यापित करील आणि अशा दाव्यांमधील व कार्यवाहीतील सर्व आदेशिका कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नावे काढण्यात किंवा त्यांच्यावर बजावण्यता येतील" अशी तरतुद आहे.

मात्र सदर प्रकरणांमध्ये संस्थान सदस्य मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री. प्रकाश रामदास काळे, व मा.श्री. शैलेश श्रीहरी कुटे विश्वस्त यांनी आपले म्हणणे इतर वकीलामार्फत दाखल केलेले आहे. रिट पिटीशनमधील मुद्याबाबत संस्थानचे म्हणणे देणेकामी कमिटी स्थापन करणेत आली आहे. संस्थानने यापूर्वी -ॲडव्होकेट यांचे वकील पत्र संस्थानसाठी दाखल केले आहे. कमिटी सदस्य या रिट पिटीशनमध्ये पक्षकार आहेत त्यांचे सहीचे वकीलपत्र आवश्यकतेनुसार त्यांचेमार्फत किंवा त्यांचेशी विचार विनिमय करुन अन्य वकीलामार्फत दाखल करणेचे मान्यतेसाठी सादर.

वकीलांशी चर्चा विनिमय करुन संस्थानचे प्रस्तुत प्रकरणी जे म्हणणे आहे त्याप्रमाणे इतरांचे म्हणणे आहे. त्याप्रमाणे या विश्वस्तांचे म्हणणे आहे अशी बाजू मा. उच्च न्यायालयापुढे मांडता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६४. श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये आयुर्वेद विभागात पंचकर्म तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची नव्याने दोन पदे भरणे बाबत.**

**निर्णय क्र.७७५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६५. अपारंपारिक उर्जेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या पवनचक्की प्रकल्पासाठी तज्ञ नेमणे बाबत.**

**निर्णय क्र.७७६.** अपारंपारिक उर्जेअंतर्गत पवनचक्की प्रकल्प उभारणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार मेडा,पुणे यांचेकडून टेंडर डॉक्युमेंट मागवून टेंडर मागविण्यात आलेले आहेत. येणाऱ्या टेंडरमधील बाबींच्या तपासणीसाठी तसेच प्रोजेक्ट उभारणी होतांना पावनचक्की क्षेत्रातील तज्ञांमार्फत तपासणी होणे गरजेचे आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मिटकॉन ही संस्था प्रोजेक्ट उभारणी तसेच सर्व आर्थिक बाबींची योग्य पडताळणी/तपासणी करते. पावनचक्की प्रकल्पामध्ये गुंतवणूक मोठ्या स्वरुपात असल्याने तज्ञांमार्फत प्रोजेक्टची क्रॉस चेकींग होणे गरजेचे आहे.

तरी मे.मीटकॉन या शासनाच्या संस्थेस पवनचक्की प्रकल्पाकरिता तज्ञ म्हणून नेमण्यास तसेच त्यांना योग्य ती फी आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.मीटकॉन यांना तज्ञ म्हणून नेमण्यात यावे व त्यांना देण्यात यावयाच्या फीबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं. ६६. रेडिओलॉजी विभागातील डॉक्टरांच्या देय मोबदल्याबाबत.**

**निर्णय क्र.७७७.** श्रीसाईबाबा हॉस्पीटल मधील मानद व वेतनावर कार्यरत असलेल्या डॉक्टरांना वेतनाव्यतिरिक्त त्याच्या कामाच्या मोबदल्याच्या विशिष्ट प्रमाणात मोबदला देण्याचे मा.विश्वस्त समितीच्या सभेत दि. १९.०८.२००६ रोजी निर्णय क्रमांक ५५२ अन्वये देण्याचे ठरले आहे. त्यानुसार इतर डॉक्टरांना मंजूर दर पत्रकानुसार दि. १५ मे २००६ पासून देण्यास सुरुवात केली आहे. मंजूर दर पत्रकात रेडीओलॉजी विभागातील डॉक्टरांना मोबदला देण्याचे राहून गेले आहे. रेडीओलॉजीस्ट डॉ. सचिन आनंद व डॉ. अनिशा टंडन यांनी दि. २३.०८.२००६ रोजी डॉ.पी.एल.तिवारी यांची भेट घेऊन त्याबाबत विनंती केली आहे अन्यथा राजीनामा देण्याचे सुध्दा ठरविले होते. मा. वैद्यकिय संचालक यांच्याशी कामाचा अभिप्राय व रेडीओलॉजीस्ट च्या उपलब्धतेबाबत चर्चा करुन दि.२३.०८.२००६ रोजी सी.टी.स्कॅन तसेच पॅथॉलॉजीमधील तपासण्यांवर पुढीलप्रमाणे मोबदला देण्याचे आदेश दिले आहेत.

सी.टी.स्कॅन विभागातील रेडीओलॉजीस्टला- १) सी.टी.स्कॅन प्रति टेस्ट रु.५०/-, २) एक्स-रे च्या एकूण रकमेवर ३%, ३) सोनोग्राफीच्या एकूण रकमेवर ५% याप्रमाणे व जर हा मोबदला प्रति डॉक्टर प्रति महा- रु. २०,०००/- पेक्षा कमी येत असेल तर उर्वरित रक्कम तपासण्यांची टक्केवारी कमीतकमी रु. २०,०००/- होईपर्यंत वाढवत जाऊन मासिक पगार अधिक कमीतकमी मोबदला रु. २०,०००/- असा प्रति महा प्रति डॉक्टरला देण्यात यावा व याचा भार तपासण्याच्या संख्येत वाढ होईपर्यंत हॉस्पिटलने सोसावा, मोबदला रु. २०,०००/- पेक्षा जास्त येत असेल तर तो मोबदला व मासिक पगार अशी एकूण प्रति महा रक्कम प्रत्येकी डॉ. सचिन आनंद व डॉ. अनिशा टंडन यांना देण्यात यावा. एकूण रक्कमेमध्ये एकूण जमा रक्कमेचा व सवलत अथवा मोफत केलेल्या तपासन्यांच्या किमतीचा समावेश राहिल.

तसेच पॅथॉलॉजी विभागात एकूण तपासणी रक्कमेच्या २% मोबदला पॅथॉलॉजीस्टला देण्यात यावा, एकूण तपासणी रकमेमध्ये जमा झालेली रक्कम, शस्त्रक्रिया पॅकेज मधील तपासण्या व मोफत तपासण्यांचा समावेश राहिल.

वरीलप्रमाणे मोबदला दिल्यास सचिन आनंद यांना मासिक वेतन व कमीत कमी मोबदला अशी एकूण रु. ५०,०००/- व डॉ. अनिशा टंडन यांना रु. ४५,०००/- प्रती महा फिक्स वेतन द्यावे लागेल. त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६७. नवीन प्रसादालय इमारत बांधकाम व्यवस्थापन सल्लागार टी.सी.ई कन्सल्टींग इंजिनिअर्स लि.पुणे यांचे मागणी बाबत.**

**निर्णय क्र.७७८.** संस्थानमार्फत मौजे निमगांव-कोऱ्हाळे गट नं. ८०,८५ मधील जागेत बांधण्यात येत असलेल्या नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकामाचे काम मे.आय.व्ही.आर.सी.एल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस लि.पुणे यांना देण्यात आलेले असून सदरचे कामास सुरुवात झालेली आहे.

उपरोक्त प्रकल्पासाठी संस्थानचे वतीने प्रत्यक्ष कामावर दैनंदिन देखरेख ठेवणे, गुणवत्ता व बिले तपासणे, नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करुन घेणे इत्यादी कामे टी.सी.ई कन्सल्टींग इंजिनिअर्स लि,पुणे यांची मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक २४.४.२००६ मधील निर्णय क्र. २६१ नुसार बांधकाम व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जा.नं. ६४१५दिनांक १८.५.२००६ चे पत्रानुसार त्यांना नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे.

बांधकाम व्यवस्थापन सल्लागार मे.टी.सी.ई कन्सल्टींग इंजिनिअर्स यांनी त्यांचे दिनांक ४.५.२००६ चे प्रस्तावानुसार सदर सेवा पुरविणेसाठी प्रती व्यक्ती महिना (man month) रुपये ९२,०००/- मात्र याप्रमाणे एकूण २० महिन्याकरीता (man month) कालावधी रुपये १८,४०,०००.०० इतकी फी अधिक १२.२४% (प्रचलित दराने)सर्व्हिस टॅक्सची मागणी केलेली आहे. सदर फी मध्ये प्रतीपूर्ती व काही आस्थापना खर्चाचा समावेश आहे. वरीलपैकी मेकॅनिकल इंजिनिअर्सची आवश्यकता पडणार नाही. कारण त्यासाठी स्वतंत्र सल्लागार नेमण्यात आलेले आहे. त्यामूळे सदर कामासाठी एकूण १६ व्यक्ती महिने काम होईल

उपरोक्त दर दिनांक ३१.५.२००६ अखेर लागू राहतील व त्यानंतर वार्षिक ८% वाढ मिळणेबाबत कळविले आहे. तसेच सल्लागार यांचे शिर्डी येथील साईटवरील कर्मचारी/अधिकारी यांना संस्थानमार्फत खालील सुविधा मोफत मिळाव्यात असे कळविले आहे.

०१. सल्लागार यांचे कर्मचारी/अधिकारी यांना स्थानिक वाहतूक सुविधा

०२. निवासव्यवस्था

०३. फर्निचरसह कार्यालय (पिण्याचे पाणी, विद्युत व स्वच्छतागृह इ.सुविधा

०४. साईट कार्यालयामध्ये दुरध्वनी, संगणक ई-मेल इंटरनेट,फॅक्स,झेरॉक्स इ.सुविधा

०५. या व्यतिरिक्त संस्थानने बांधकाम व्यवस्थापक यांचे मदतीसाठी पात्र पर्यवेक्षकीय मनुष्यबळ पुरवावे

सदरचा प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झाल्यास त्या कालावधीमध्ये वरील सुविधा वाढीव कालावधीही संस्थानमार्फत पुरविण्यात याव्यत. साईटवरील कर्मचारी/ अधिकारी सदर प्रकल्पाच्या कामाकरीता बाहेरगांवी गेल्यास त्याचा प्रवास खर्च तसेच रहाण्याच्या खर्चाची प्रतिपूर्ती संस्थानने करावी.

मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी दिनांक २७.५.२००६ रोजी दुरध्वनी संदेशाव्दारे सल्लागार यांचे शिर्डी कार्यालयासाठी स्टील कपाट, दोन टेबल, १ कॉन्फरन्स टेबल, संगणक टेबल, संगणक व खुर्च्या इ. खरेदी करणेकामी योग्य तो प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेबाबत कळविले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे सल्लागार मे.टी.सी.ई कन्सल्टींग इंजिनिअर्स,पुणे यांना १६ व्यक्ती महिन्यांसाठी (man month) त्यांचे मागणीप्रमाणे रुपये ९२,०००.०० प्रती व्यक्ती महिना + १२.२४% सर्व्हीस टॅक्स +वर नमूद केलेल्या सुविधा तसेच फर्निचर व संगणक इ. साहित्य सल्लागार यांचे शिर्डी कार्यालयास देणेकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ३.६.२००६ रोजीचे सभेपूढे त्यास सदरहू सभेतील निर्णय क्र. ४०३ अन्वये मान्यता देणेत आली होती. तथापि मा.विश्वस्त सर्वश्री डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, प्रकाश रामदास काळे अशोक भिमाशंकर खांबेकर, सुरेश गोरक्षनाथ वाबळे, पांडुरंग गमाजी अभंग व शैलेश श्रीहरी कुटे यांनी दिनांक ३.६.२००६ रोजीचे सभेच्या इतिवृत्तातील उपरोक्त आयत्या वेळेचा विषय क्र. ३० व निर्णय क्र. ४०५ बद्दल आक्षेप असलेबाबत दिनांक ९.८.२००६ चे पत्र दिले आहे. सदर पत्राबाबत दिनांक १९.८.२००६ रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा करणेत येऊन निर्णय क्र. ५३१(२) नुसार उपरोक्तकामी श्री शक्ती परमार व मे.टी.सी.ई कन्सल्टींग इंजिनिअर्स लि.पुणे यांचेशी मा.अध्यक्ष व व उपाध्यक्ष यांनी चर्चा करुन निर्णय घ्यावा असे ठरले.

मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व इतर यांचे दिनांक ९.८.२००६ चे उपरोक्त पत्रासोबत मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव व मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी एका पत्राव्दारे सविस्तर तपशिल नमूद करुन सदरहू पत्रातील आक्षेपांशी ते सहमत नसल्याचे कळविले आहे. त्याचप्रमाणे मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी दिनांक २५.८.२००६ चे पत्राव्दारे याबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.८.२००६ चे सभेत सविस्तर चर्चा होऊन याबाबतचे निर्णय देण्याचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष मा.उपाध्यक्ष यांना देण्यात आलेले आहेत. त्यामूळे आमचे समाधान झाले असून आमचे दिनांक ९.८.२००६ रोजीचे पत्र कृपया दप्तरी दाखल करण्यात यावे असे कळविले आहे. मा.सदस्यांनी दिलेल्या वरीलप्रमाणे पत्रांची नोंद घेण्यात आली.
तसेच मा.विश्वस्त श्री शैलेश श्रीहरी कूटे व श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनीही याबाबत त्यांचे समाधान झाले असून त्यांचे दिनांक ९.८.२००६ रोजीचे पत्र दप्तरी दाखल करणेत यावे असे आजचे सभेतील चर्चेदरम्यान सांगितले. त्याचीही नोंद घेण्यात आली.

उपरोक्त दिनांक १९.८.२००६ रोजीचे सभेतीलनिर्णय क्र. ५३१(२) अन्वये श्री शक्ती परमार व मे.टी.सी.ई कन्सल्टींग इं.लि. यांचेशी चर्चा करण्यात आली असलेबाबत माहिती देऊन सदरहू चर्चेचा तपशिल मा.अध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेपुढे विशद केला. आर्किटेक्ट यांचे कामामध्ये दैनंदिन देखरेख, बांधकाम व्यवस्थापन (construction management) या सेवांचा समावेश नाही. संस्थानचे सध्या चालू असलेल्या स्टाफ क्वार्टर्स अथवा व्दारावती या प्रकल्पांपेक्षा प्रसादालय प्रकल्पाचा आवाका व स्वरुप मोठे आहे. सध्या संस्थानकडे असलेले तांत्रिक मनुष्यबळ अपूरे आहे.यापूर्वी दिनांक ९.७.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २५३ अन्वये सदर प्रकल्पासाठी तीन अभियंत्यांची कंत्राटी पध्दतीने मासिक वेतनावर नेमणू करावी असे ठरले होते. तथापि या प्रकल्पासाठी कंत्राटी पध्दतीने अभियंत्यांची नेमणूक केल्यास त्यांचे कामाच्या दर्जाबाबत खात्री बाळगता येत नाही.

तसेच त्यामूळे संस्थानवर कायमस्वरुपी दायीत्व निर्माण होण्याची शक्यता आहे. टी.सी.ई ही कंपनी सुमारे ४० वर्षापासुन या क्षेत्रात असून आंतराष्ट्रीय स्तरावरील एक नामांकित कंपनी आहे. अनेक मोठ्या स्वरुपाच्या प्रकल्पांसाठी या कंपनीने अशा प्रकारची सेवा यशस्वीरित्या पुरविलेली आहे. रुपये ९२,०००.०० प्रती महिना हा केवळ एका व्यक्तीचा पगार नसून त्यामागे सदर कंपनीचे तज्ञ पाठबळ व सहाय्य उपलब्ध होणार आहे.

या प्रकल्पाचा आवाका मोठा असून मोठ्या रकमेच्या बिलांचा समावेश असल्याने क्वालिटी व क्वांटीटी यांचेवर अधिक नियंत्रण आवश्यक आहे. टी.सी.ई कंपनीला ठरविण्यात आलेली फी प्रकल्पाच्या किंमतीच्या सुमारे ०.७०% इतकी होते. आर्किटेक्ट फी व ही फी मिळून सुमारे २.७% रक्कम, फी पोटी खर्च होईल. हा खर्च अवास्तव नसून त्यामुळे कामाच्या दर्जात लक्षणियरित्या वाढच होणार असून ही गोष्ट अंतिमत: संस्थानच्या हिताची आहे.

याप्रमाणे सविस्तर चर्चा होऊन,सिव्हील कामासाठी मे.टी.सी.ई कन्सल्टीग इ.लि.पुणे यांना १२ व्यक्ती महिन्यांसाठी (man month) रुपये ९२,०००.००० प्रति व्यक्ती + १२.२४% सर्व्हीस टॅक्स + निवासव्यवस्था, इत्यादी सुविधा देणेकामी येणाऱ्या रक्कम रुपये १२,३९,१२९.०० चे खर्चाचे प्रस्तावास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६८. सीटी ॲण्ड गिल्डस्, लंडन व कॉन्फीडरेशन ऑफ इंडियन इन्स्टिट्युट यांचे वतीने चालविले जाणारे कोर्सेस श्री साईबाबा संस्थानमार्फत शिर्डी परिसरातील शैक्षणिक संस्थांमध्ये सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.७७९.** व्यवस्थापन समितीचे दिनांक ९.७.२००५ चे सभेत निर्णय क्र. ३१० अन्वये सीटी ॲण्ड गिल्डस्, लंडन व कॉन्फीडरेशन ऑफ इंडियन इन्स्टिट्युट यांचे वतीने चालविले जाणारे कोर्सेस श्री साईबाबा संस्थानमार्फत शिर्डी परिसरातील शैक्षणिक संस्थांमध्ये सुरु करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ५९,६८,७५०.०० चे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार इकडील जा.नं. एसएसएस-आयटीआय-आस्था-८२३५-०५ दिनांक ३ ऑगस्ट,२००५ व क्रमांक १०४४६-०५ दिनांक २०.०९.२००५अन्वये प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला होता.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०००५/६९८/(१०९)/का.१६ मंत्रालय, मुंबई -४०००३२ दिनांक ४ सप्टेबर,२००६ चे पत्राने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ढ) मध्ये संस्थान सर्वप्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करेल या तरतूदीस अधिन राहून अहमदनगर जिल्ह्यातील खालील संस्थांमध्ये तंत्रशिक्षणाचे कोर्सेस सुरु करण्याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत येणाऱ्या खर्चाच्या ७५% म्हणजेच रुपये ५९,६८,७५०.०० इतकी रक्कम श्री साईबाबा संस्थानच्या विश्वस्त निधीतून सन २०००६-२००७ या एका शैक्षणिक वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेली आहे..

| अ.नं | **शिक्षण संस्थेचे नांव** | **कोर्स संख्या** |
|---|---|---|
| ०१. | प्रवरा रूरल एज्यु. सोसा. चे आयटीआय, लोणी. | ०३ कोर्सेस |
| ०२. | श्री साईबाबा संस्थान, शिर्डी आयटीआय शिर्डी | ०२ कोर्सेस |
| ०३. | शिर्डी साई रूरल इन्स्टीट्यूट, राहाता | ०२ कोर्सेस |
| ०४. | लक्ष्मीनारायण आयटीआय, राहुरी | ०२ कोर्सेस |
| ०५. | मारूतराव घुले पा. आयटीआय भेंडा | ०१ कोर्स |
| ०६. | सेंट झेवियर आयटीआय, श्रीरामपूर | ०२ कोर्सेस |
| ०७. | विखे पाटील फौंडेशनचे आयटीआय, अहमदनगर | ०३ कोर्सेस |
| ०८ | संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय,कोपरगांव. | ०२ कोर्सेस |
| ०९ | के.बी.पी. तंत्रनिकेतन, कोपरगांव. | ०२ कोर्सेस |
| १० | अमृतवाहिनी औ.प्र. केंद्र, संगमनेर. | ०२ कोर्सेस |
| ११ | प्रवरा कन्या मंदीर,लोणी | ०२ कोर्स |
| १२ | इंजि.कॉलेज, लोणी | ०२ कोर्स |
| १३ | महिला तंत्र निकेतन, लोणी | ०१ कोर्स |
| १४ | तंत्रनिकेतन महाविद्यालय, लोणी | ०१ कोर्स |
| १५ | पी.व्ही.पी. कॉलेज,लोणी | ०३ कोर्स |
| १६ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राहाता | ०३ कोर्स |
| १७ | कॉलेज ऑफ होम सायन्स, लोणी | ०१ कोर्स |
| | एकूण - | १३ कोर्स |

उपरोक्त निधी ज्या कारणाकरीता मंजूर करण्यात आलेला आहे त्याच प्रयोजनार्थ वापरला जाईल याची दक्षता कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांनी घ्यावी.

तसेच सदर निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांच्या सन २००६-२००७ च्या विश्वस्त निधीतून खर्ची टाकण्यात यावा व त्याचा तपशिल सदर वर्षाचे वार्षिक अहवालात देण्यात यावा असे कळविले आहे त्याची नोंद घेण्यात आली, व याबाबत आवश्यक ती कार्यवाही सत्वर सुरु करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय नं. ६९. अहमदनगर-शिर्डी सांस्कृतिक व पर्यटन महोत्सव-२००६ करीता निधी मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.७८०.** अहमदनगर हा जिल्हा राज्याच्या मध्यवर्ती ठिकाणी वसलेला असून अहमदनगर शहर हे मध्यमयुगीन महाराष्ट्राचा इतिहास घडविणारे निजामशाहीतील राजधानीचे ठिकाण होते. निजामशाहीतील अनेक महत्वाच्या वास्तू ५०० वर्षानंतर आजही येथे अस्तित्वात आहेत. अहमदनगर शहरातील भुईकोट किल्ला, चांदबिबी महाल (सलाबतखनची कबर), फराहबक्ष महाल, औरंगजेबाचे मृत्युस्थळ (आलमगीर) इत्यादी ऐतिहासिक स्थळे आहेत. देश-विदेशातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले शिर्डी येथे दररोज भाविक मोठया प्रमाणात येत असतात. त्याचप्रमाणे शनिशिंगणापूर, सिध्दटेक, मोहटादेवी, भगवानगड, वृध्देश्वर, मढी, अगस्ती ऋषीचा आश्रम, अशी अनेक तिर्थक्षेत्र जिल्हयात प्रसिध्द आहेत. अहमदनगर शहरातील मेहेरबाबंचे समाधीस्थान (मेहराबाद,आरणगाव) आणि राष्ट्रसंत आचार्य आनंदऋर्षीचे समाधीस्थान (आनंदधाम) या ठिकाणी देश-विदेशातून हजारो भक्तगण येत असतात.

अशिया खंडातील एकमेव असे रणगाडा संग्रहालय नगर शहरात आहे. जिल्हयात पर्यटनाच्या दृष्टीने भंडारदरा, रंधा धबधबा, मुळा धरण, निघोज कुंड, रेहेकुरी अभयारण्य अशी जिल्हयातील अनेक स्थळे महत्वाची आहेत. जिल्हयातील काही स्थळांचा राज्य/ राष्ट्रीय पातळीवर प्रचार झाल्यास आणि विकसित केल्यास राष्ट्रीय पातळीवरच्या महत्वाच्या स्थळांमध्ये त्यांची गणना होऊ शकेल, याची आम्हाला खात्री आहे. या दृष्टीने अहमदनगर-शिर्डी सांस्कृतिक व पर्यटन महोत्सव आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

स्व.पंडित जवाहरलाल नेहरु आणि इतर ११ राष्ट्रीय नेत्यांना १९४२ मध्ये चले जाव लढयाच्या चळवळीत ३ वर्षे अहमदनगर शहरातील भुईकोट किल्ल्यात स्थानबध्द करण्यात आले होते. येथील वास्तव्यात पंडितजींनी डिस्कव्हरी ऑफ इंडिया या जगप्रसिध्द ग्रंथाचे लिखाण केले. त्याचे अहमदनगर शहरातील वास्तव्य लक्षात घेऊन त्यांच्या जन्मदिनाचे (१४ नोव्हेंबर बालदिन) औचित्य साधून १४ ते १६ नोव्हेंबर, २००६ या कालावधीत महोत्सव आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

महोत्सवाच्या निमित्ताने राज्य व देशभरातून अनेक पर्यटकांना आकर्षित करण्यात येईल व त्यामाध्यमातून श्रीसाईबाबा यांचा आध्यात्मिक व सर्वधर्मसमभावाचा संदेश आणि जिल्हयातील पर्यटन स्थळांविषयी महिती देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवावी अशी अपेक्षा आहे. याकामी आम्हाला आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. तसेच या निमित्ताने जिल्हयातील विविध पर्यटन स्थळांविषयी माहिती असलेली वेबसाईट देखील इंटरनेटवर सुरु करण्याचा मानस आहे.

पर्यटकांना जिल्हयातील ऐतिहासिक, धार्मिक व निसर्गरम्य पर्यटनस्थळांची माहिती करुन देणे, विविध स्थळांना भेटी आणि सांस्कृतिक कार्यक्रम या बाबींचा महोत्सवात समावेश असेल. पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या शहरातील व जिल्हयतील विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. पहिल्या दिवशी महोत्सवाचा उद्घाटन सोहळा अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्यात होईल. दुसऱ्या दिवशी जिल्हयातील विविध पर्यटन स्थळांना भेटींचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच शहरातील प्रसिध्द फराहबक्ष महाल परिसरात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. तिसऱ्या दिवशी चांदबिबी महाल येथे विविध स्पर्धा, स्थानिक कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम, बक्षीस वितरण सोहळा झाल्यानंतर महोत्सवाची सांगता करण्यात येईल. महोत्सवाची प्रारुप रुपरेषा सोबत जोडली आहे.

या महोत्सवाच्या आयोजनासाठी रु.२५लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. राज्य शासनाकडून महोत्सवासाठी रुपये पाच लक्ष इतका निधी प्राप्त होणार असून २० लक्ष निधी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांनी उपलब्ध करुन दिल्यास महोत्सवाचे आयोजन चांगल्या प्रकारे करणे शक्य होईल.

तेव्हा अहमदनगर-शिर्डी सांस्कृतिक व पर्यटन महोत्सव- २००६ या महोत्सवाकरिता रुपये २० लक्ष एवढे अनुदान उपलब्ध करुन द्यावे अशी विनंती केली आहे.

आजचे सभेत श्री प्रदिप पोतदार, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय हे उपस्थित होते. त्यांनी सभेस सविस्तर याबाबत माहिती दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी साईबाबा पर्यटन मोहोत्सव शिर्डी अहमदनगर,नाशिक येथे आयोजित करणेबाबत सविस्तर प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय यांनी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा. सदर महोत्सवासाठी रुपये २० लाखपर्यन्तचे खर्चास मान्यता देण्यात यावी. याकामी शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७०.** **शिर्डी नगरपंचायत यांनी संस्थानला देऊ केलेल्या आरक्षण क्र. १० मधील १६ आर क्षेत्राबाबत**

**निर्णय क्र.७८१.** शिर्डी नगरपंचायत यांनी दिनांक २१/०६/२००६ रोजीचे सर्वसाधरण सभेत ठराव क्रमांक २१अन्वये आरक्षण क्र. १० येथील १६ आर क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना देणेविषयी ठराव मंजूर केला असलेबाबत शिर्डी नगरपंचायत यांनी जा.क्र. न.पं./बांध/कावि-५/६९१/२००६ दिनांक ३१/०८/२००६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

त्यानुसार शिर्डी नगरपंचायत यांनी मंजूर केलेला ठराव क्र. २१ खालीलप्रमाणे आहे.

"महाराष्ट्र नगरपालीका,नगरपंचायती, औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ८१ (१५) अन्वये यापुर्वी झालेल्या ठरावात ३ महिन्यानंतर फेरबदल किंवा रद्द करता येतो. या अनुषंगाने आ.क्र.१० मधील १६ गुंठे जागा (१२ मिटर दक्षिणोत्तर विकास योजना रस्त्याचे क्षेत्र धरुन ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे कंपाउंडलगत देणेत यावी.त्याचप्रमाणे आ.क्र.०९ मध्ये तळमजल्यावर ५ दुकाने, पहील्या मजल्यावर १० दुकाने, दुसऱ्या मजल्यावर ऑडीटोरियम व दर्शन रांगाचे बांधकाम पूर्ण करुन देण्यात यावे. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अंतर्गत कलम ९२ (१) नुसार नगरपालीकेच्या मालमत्ता हस्तांतरणास राज्यशासनाची मंजुरी घेणेत यावी. सदर प्रस्ताव महाराष्ट्र नगरपालीका (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण)नियम १९८३ मधील ४ नुसार व मालमत्तेचे हस्तांतरण नियमातील भाग ३ व कलम ७ मधील सर्वसाधरण तरतुदीनुसार शासनाचे मंजुरीस्तव सादर करणेत यावा. १६ आर जागा संस्थान यांना देताना खालील अटी व शर्ती घालणेत याव्यात.

०१) श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी १६ आर जागेत दुकान केंद्राचे बांधकाम करु नयेत.

०२) श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी सदर जागेचा वापर सार्वजनीक वापरासाठी करावा.

०३) श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांनी विकास योजनेतील पालखी रस्ता ते मंदिर गेट पर्यंतचा १२ मीटर रुंदीचा वहिवाटीचा रस्ता १२ मीटर रुंदीचाच ठेवण्यात यावा. भविष्यात सदर रस्ता कमी करणे अथवा वगळणेबाबत कार्यवाही करु नये.

०४) श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी दर्शन रांगेचा वापर हा कायमस्वरुपी नगरपंचायतीच्या आ.क्र.०९ मधून करण्यात यावा. तसेच यासाठी दर्शन रांगेची व्यवस्था व भक्तांचे सुरक्षीततेकरीता उपाय योजना करावी.

श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी आ.क्र.१० च्या पूर्व बाजुच्या हद्दीवरुन पिंपळवाडी रस्ता ते विकास योजनेच्या १२ मीटर रुंदीच्या पूर्व - पश्चिम रस्त्यापर्यंत ०४ मिटर रुंदीचा रस्ता सार्वजनीक वापरासाठी ठेवण्यात यावा. तसेच नगरपंचायतीने त्यालगत आ.क्र.०९ करीता सामासीक अंतर नियमानुसार कायमस्वरुपी खुले ठेवावे व त्याचा वापर सार्वजनीक रस्त्याकरीता करण्यात यावा. जेणेकरुन आ.क्र.९ व १० च्या हद्दीवरुन श्री साईबाबा संस्थान शिर्डी व नगरपंचायत याचा एकूण ९ मिटर रंदीचा रस्ता नागरीकांसाठी व भक्तासाठी उपलब्ध होऊ शकेल.

आ.क्र.१० च्या पूर्व बाजुच्या हद्दीवरुन पिंपळवाडी रस्ता ते विकास योजनेच्या १२ मिटर रुंदीच्या रस्त्यापर्यंत ४.५० मिटर रंदीचा रस्ता श्री साईबाबा संस्थान यांनी ठेवल्यास आरक्षण क्र. १० मधील १२ मिटर रंदीचा (पिंपळवाडी रस्ता ते मंदिरा समोरुन जाणारा विकास योजनेतील १२ मिटर रुंदीच्या रस्त्यापर्यंत) रस्ता श्री साईबाबा संस्थान यांना आवश्यकता नसल्यास तसा फेरबदल नगरपंचायतीस करुन दयावा लागेल. तसेच श्री साईबाबा संस्थान यांना देण्यात येणाऱ्या जागेचा वापर श्री साईबाबा संस्थान यांच्या प्रस्तावाप्रमाणे करण्यासाठी फेरबदल नगरपंचायतीस करुन द्यावा लागेल. त्यासाठी प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास मंजुरी घ्यावी लागेल.

श्री साईबाबा संस्थान जिल्हा परिषदेस आ.क्र.८ येथे शाळा बांधकाम करुन जागेसह हस्तांतर करुन देण्यार आहे. त्या बदल्यास जिल्हा परिषदेने आ.क्र. ९ व १० येथे सध्याच्या शाळेचा ताबा जागेसह मालकी हक्क सोडणे आवश्यक राहील. जिल्हा परिषदेच्या नावावर असणारे ७/१२ चे उतारे नगरपंचायतीच्या नावाने करुन देणे आवश्यक राहील. "

याप्रमाणे अटी शिर्डी नगरपंचायत यांचे ठरावात नमूद केलेल्या आहेत. यावर सविस्तर चर्चा होऊन शिर्डी नगरपंचायत यांनी वरीलप्रमाणे देऊ केलेली १६ आर जागा स्विकारणेत यावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.७१.** **ज्यु.कॅथ लॅब टेक्निशियन यांना संस्थान सेवेत नियमीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.७८२.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०७/२००६ रोजीचे सभेत झालेल्या निर्णय क्र.४४२ नुसार, जा.नं.एसएसएस/ वशी-१/२४०६/२००६दि.०२/०९/२००६ अन्वये श्री सोनवणे,ज्यु.कॅथ लॅब टेक्निशियन श्री साईबाबा हॉस्पीटल यांना सदर पदावर यापुर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीच्या अधीन राहून त्यांचे कामात सुधारणा व वरिष्ठांशी व्यवहार नम्रतेचा व्हावा अशी समज देवून त्यांचा नेमणूक कलावधी दि.०७/०७/२००६ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आलेला आहे.

आता,श्री सोनवणे यांचे काम समाधानकारक असून त्यांचे वर्तणूकीत सुधारणा दिसून येत आहे. त्यामुळे त्यांना संस्थान सेवेत कायम करण्यात हरकत नाही.असे अभिप्राय वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दिलेले असून त्यावर संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांची संमतीदर्शक स्वाक्षरी आहे.

तरी वैद्यकीय संचालक व प्रशासकीय अधिकारी यांचे उपरोक्त अभिप्राय विचार घेवून श्री सोनवणे यांचे मुदतवाढी संदर्भात पारित करण्यात आलेला आदेश रद्द होवून,श्री सोनवणे यांना प्रधान सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या (श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी/अधिकारी) आकृतीबंधास मंजूरीच्या अधीन राहून दि.०७/०७/२००६ पासून श्री.सोनवणे यांना

श्रीसाईबाबा हॉस्पीटल शिर्डी च्या सेवेत कायम करण्याबाबतचे प्रस्तावावर फेर विचार होऊन, मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रधान सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या (श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी/अधिकारी) आकृतीबंधास मंजूरीच्या अधीन राहून दि.०७/०७/२००६ पासून श्री.सोनवणे यांना श्रीसाईबाबा हॉस्पीटल शिर्डी च्या सेवेत कायम करण्यात यावे, असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.७२.** **भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) येथील खोल्यांचे नुतनीकरण करणेबाबत.**
**निर्णय क्र.७८३.** श्री साईबाबा भक्तनिवास इमारतीचा वापर साईभक्तांसाठी सन १९९३ पासून करण्यात येत आहे. म्हणजे सुमारे १३ वर्षापासून इमारतीचा वापर करण्यात येत आहे. या इमारतीमध्ये एका महिन्यात सरासरी सुमारे ७५ हजार साईभक्तांची निवासाची व्यवस्था करण्यात येते. त्यामुळे इमारतीचे दुरुस्ती व देखभाल करणे आवश्यक आहे. साईबाबा भक्तनिवास कॅंटीन दुरुस्तीचे काम चालू असून याकामाचे प्लॅन व एस्टीमेट आर्किटेक्ट श्री. अरविंद वैद्य, संगमनेर यांनी दिलेले आहे. भक्तनिवास (५०० रुम) नूतनीकरणाचे करावयाच्या कामाची समक्ष पहाणी आर्किटेक्ट अरविंद वैद्य यांनी केली असून याकामाकरीता त्यांनी दुरुस्ती करणेबाबत रुपये ५,११,८५०.००चे एस्टीमेट सादर केले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सर्व खोल्यांना जुन्या पध्दतीची सिमेंट मोझॅक टाईल बसविलेली आहे. कालानुरुप या फरशीचे बाह्य स्वरुप आकर्षक वाटत नाही हया फरशीच्या ऐवजी नविन पध्दतीची पोर्सेलीनो फरशी बसविल्यास खोल्या जास्त आकर्षक व अल्हाददायक वाटतील.

खिडक्या एम.एस. लोखंडी आहे. त्यासर्व पावसाच्या पाण्यामुळे गंजलेल्या आहे. काचा फुटलेल्या आहेत. ब-याचदा खिडक्या निटपणे उघडत नाही. त्यामुळे या खिडक्या काढून त्याठिकाणी मार्बलचे विंडो सिल व जॅम बसवून त्यामध्ये अ‍ॅल्युमिनीअमचे नविन खिडक्या ग्रिलसह बसविल्यास वरील अडचणी दूर होतील.

सर्व दरवाजांचा दर्शनी भाग हा अत्यंत अनाकर्षक आहे. (वेळोवेळी ऑईलपेंट केल्यामुळे त्यावर पोपडे दिसतात) हयाच दरवाजांवर ६ एम.एम. प्लायवूड लावून त्यावर लॅमिनेट (सनमायका) लावल्यास दरवाजे नक्कीच कितीतरी अधिक उठावदार दिसतील तसेच सर्वदरवांच्या कड्या हॅंडल, स्टॉपर, ताडी पट्टी इ. बदलणे गरजचे आहे.

टॉयलेच्या सर्व फ्रेम हया लोखंडी आहेत. पाण्याच्या सततच्या संपर्कामुळे त्या गंजलेल्या आहे. त्या ठिकाणी परत लोखंडी फ्रेम बसविणे संयुक्तीक होणार नाही. त्यासाठी न गंजणाऱ्या व कमीतकमी मेटेनन्स असणाऱ्या मार्बलच्या चौकटी बसविणे योग्य होईल.

तसेच टॉयलेटचे दरवाजे पाण्याच्या संपर्कामुळे एकतर फुगलेले आहेत अथवा सडलेले आहेत. त्याकरीता हे सर्व शर्टस बदलणे आवश्यक आहे. त्यासाठी वॉटरप्रुफ क्वालिटीचे नामवंत कंपनीचे फ्लश डोअर घेऊन त्यावर एफ.आर.पी.चे कोटींग करुन घेतल्यास हे दरवाजे जास्त कालावधी टिकतील.

रुम मधील साफसफाईच्या दृष्टीने भिंतीना ७ फूट उंचीपर्यत पोर्सेलीनो टाईल्स बसविल्यास भिंती घाण होणार नाहीत.

सर्व रुममध्ये एक गोष्ट प्रकर्शाने जाणवली की भक्तांना त्यांचे खाजगी बॅगा व इतर सामान कपडे ठेवण्यासाठी व्यवस्थित कपाट नाही तरी एखादे प्लायवूडचे कपाट कुलूपासहीत हॅंगरची सोय असलेले ठेवणे आवश्यक आहे.

तसेच वरील सर्व काम करताना पुर्वीचा काही रंग काही प्रमाणात खराब होणार आहे. म्हणून कमीत कमी नव्याने परत एक हात (कोट) रंगाचा देणे आवश्यक आहे.

तरी वरील गोष्टींचा अंतर्भाव केल्यास वरील खोल्यांची उपयुक्तता वाढून भक्तांना तेथे राहणे जास्त समाधानकारक व सुखकारक होईल असे आर्किटेक्ट यांनी कळविले आहे.

वरील बाबींचा विचार करुन नूतनीकरण करणेकामी आर्किटेक्ट यांनी खालील प्रमाणे प्राथमिक अपेक्षीत खर्च कळविला आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | अे टाईप रु. | १,२१,४५०.०० |
| ०२ | बी टाईप रु. | २,५७,४५०.०० |
| ०३ | सी टाईप रु. | १,३२,९५०.०० |
| | **एकूण रु.** | **५,११,८५०.००** |

उपरोक्त दिलेल्या तपशीलानुसार नमुना दाखल तीन रुमचे नूतनीकरण करणेकामी रु. ५,११,८५०.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. उपरोक्त कामास व नमुनादाखल तीन रुमचे नुतनीकरण करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन भक्तनिवास (५००) रुम येथील खोल्यांचे नमुना दाखल तीन खोल्यांचे नूतनीकरण सध्या भक्तनिवास येथील कॅन्टीनचे नूतनीकरणाचे काम करणारे ठेकेदार श्री महेंद्र आर टाटीया,श्रीरामपूर यांचेकडून त्यांचे कॅन्टीन नूतनीकरणाचे मंजूर दरात करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

वरील निर्णय क्र. ६७९ ते ७८३ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी